394

भारत परिचय पुस्तक माला :::: ४

# गुजरात

( सांस्कृतिक परिचय )

लेखक :
पं. महादेवशास्त्री जोशी

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २.

REFBK 0012996
REFBK-0012996

मूल्य तीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि: ........



# गु ज रा त

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 33,582 दि: 11-4-91
क्रमांक ३१५ नों: दि:
११९१५

भारत परिचय पुस्तक माला : ४

# गुजरात

## ( सांस्कृतिक परिचय )

लेखक :
पं. महादेवशास्त्री जोशी

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८८६
स्थळप्रत

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २.

REFBK-0012996
REFBK-0012996

मूल्य तीन रुपये

प्रकाशिका :
सौ. सुधा जोशी,
ज्ञानराज प्रकाशन,
४२१, शनिवार पेठ,
पुणें–२.

●

सजावट :
सुधाकर खाजगीवाले
दत्ता महाबळेश्वरकर

●

ठसे :
ब. शं. दाते,
कलाभुवन,
पुणें–२.

●

प्रथमावृत्ति—ऑगस्ट. १९६२

●

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ, पुणें–२.

मुंबईचे दानशूर श्रीमान्

**अरविंदभाई मफतलाल,**

यांच्या विनय–सौजन्यादि गुणांवर लुब्ध होऊन
सप्रेमादर समर्पित

**—महादेवशास्त्री जोशी**

# चार शब्द

भारत परिचय पुस्तकमालेचें हें चौथें पुष्प रसिकांच्या सेवेला सादर करतांना मला फार आनंद होत आहे. या पुस्तकांत गुजरात आणि सौराष्ट्र या दोन प्रदेशांचा सामान्य सांस्कृतिक परिचय वाचकांना होईल. गुजरात आणि महाराष्ट्र हा द्वंद्वसमास असला तरी तो राम-कृष्णासारखा आहे. गुजरात महाराष्ट्राचा शिमशेजारी आहे. किंबहुना गुजरातने महाराष्ट्र हें आपलें दुसरें घरच मानलें आहे असें म्हटलें तरी चालेल. इंग्रजांच्या कारकीर्दींत आपण एका इलाख्यांत होतों. स्वातंत्र्यानंतर आपण कांही वर्षें द्वैभाषिक राज्याचाहि प्रयोग करून पाहिला आहे. आता आपलें 'घर' एक असलें तरी त्रिन्हाडें दोन झालीं आहेत. आता आपण दोघेहि आपापला कारभार स्वतंत्रपणें पाहायला लागलों आहों. असें असलें तरी परस्परांच्या उत्कर्षासाठी यापुढेहि आपल्याला अनेकवार एकत्र यावें लागेल. अशा स्थितींत एकमेकांचा शक्य तेवढा अधिक परिचय करून घेऊन एकत्र येण्याने त्या सहभावाला जाणिवेची कला लाभेल. असा एकेक दुवा घट्ट करीत जाणें म्हणजेच अखिल भारताची एकात्मता साधणें होय.


☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# अनुक्रम

१ ) गुर्जर भूमि १
२ ) गरवी गुजरात १०
३ ) भाषा आणि साहित्य २७
४ ) गर्बा आणि रास ५८
५ ) धर्म आणि पंथ ७२
६ ) स्थलयात्रा ९७

☆ ☆ ☆


गुजरात
पाकिस्तान
अबूरोड
पालनपूर
सरस्वती
मेहसाणा
भूज
कांडला
अहमदाबाद
सुरेंद्रनगर
ओखा
द्वारका
राजकोट
नडियाद
आनंद
बडोदे
भावनगर
जुनागड
गिरनार पर्वत
भडोच
नर्मदा
तापी
सुरत
डांग
धरमपूर
महाराष्ट्र
पश्चिम समुद्र
दमण
डहाणू
पालघर
वसई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांक
अनुक्रम ....३३५०२.... दि: ५-१९५५
क्रमांक ....३२५........ नों. दि. १९५५

# गुर्जर भूमि

## १

गुजरात, सौराष्ट्र आणि कच्छ हे तीन भूप्रदेश मिळून आजचें गुजरात राज्य बनलें आहे. गुर्जरांना आश्रय देणारी भूमि म्हणून प्रथम हिला ' गुर्जर+त्रा ' असें नांव मिळालें. याच शब्दाचें पुढे ' गुजरात ' असें रूप बनलें. दुसरी व्युत्पत्ति ' गुज्र + आत ' अशी आढळते. हा शब्द अलबिरूनीने वापरला आहे. ' आत ' हा अरबी भाषेंत बहुवचनी प्रत्यय आहे. त्यावरून गुज्र ( गुर्जर ) नामक बहुत लोकांची वस्ती असलेला हा प्रदेश गुजरात हें नामाभिधान पावला आहे, असें त्याचें मत.

पूर्वेस मेवाड, माळवा, खानदेश, पश्चिमेस हिंदी महासागर, उत्तरेस पश्चिम पाकिस्तान आणि दक्षिणेस ठाणें जिल्हा, या गुजरातच्या चतु:सीमा आहेत. मुख्य गुजरातचे तीन विभाग पडतात ते असे—

पहिला विभाग किनारपट्टीचा. हा विभाग कच्छच्या आखातापासून दमणगंगेपर्यंत उभा मांडलेला आहे. अहमदाबादच्या दक्षिणेस दलदलीचा प्रदेश लागतो. यांतून पाण्याचे ओहळ खूपच वाहतात. हा भाग रेती आणि लवणें यांनी भरलेला आहे. या भागांत तुरळक टेकड्या दिसतात.

ही टेकड्यांची रांग म्हणजे जणू समुद्राच्या भरतीची सीमारेषाच होय. पाणी सर्वत्र खारें. नद्यांच्या ओहळांमुळे इथल्या जमिनीवर सदैव लवणाचा थर सांचलेला असतो. हें लवण मग मातींत मिसळतें अन् गरम वाऱ्यांसंगें सर्वत्र पसरतें. तें ओल्या पिकांवर पडलें, की त्यांना रोग बाधतो. त्यामुळे या भागांतलें मानवी जीवन सुखावह नसतें. इथे चांगलें तरारून उगवतें तें गवत.

या भागांतला किफायतशीर अन् महत्त्वाचा धंदा म्हणजे मच्छीमारी. खंबायतचें आखात याच भागांत आहे. जुन्या काळचें हें फार मोठें बंदर. एका काळीं इथे खरोखरीचीं मोत्यें पिकत. इथलीं टपोरीं मोत्यें म्हणजे जगांतलें एक आश्चर्य मानीत. तीं देश-विदेशांतल्या राजमहिषींच्या वक्षःस्थळावर रुळायचीं. या बंदरांतून इतिहासकाळांत लक्षावधि रुपयांच्या मालाची आयात निर्यात चालायची. खंबायत म्हणजे विविध प्रकारच्या मालाची मोठी उतारपेठच होती. पण कालांतराने साबरमती अन् मही या दोन नद्यांनी गाळाचे डोंगरच्या डोंगर आणून त्या बंदरांत ओतले अन् त्याला अवकळा आणली. या भागांतल्या मातींत तर मिठाचें भलतेंच मिश्रण आहे. त्यामुळे इकडच्या भागांतलें पाणी फारच मचुळ लागतें. किनारपट्टीच्या या भागांत ऊस अन् कापूस यांचें पीक मात्र भरघोस येतें.

दुसरा विभाग मैदानी प्रदेशाचा. हाहि एक लहान अरुंद पट्टाच असला तरी तो भरती ओहोटीपासून अलग आहे. याची रुंदी दक्षिणेकडे सुरतेच्या बाजूने फक्त पंधरा मैल असली तरी उत्तरेस बडोदा–मेहसाणा या भागाकडे ती वाढत जाते. या भागांतली माती चिकट अन् जमीन सपाट आहे. नर्मदा अन् घघर या दोन नद्या या प्रदेशांत सतत काळा गाळ आणून रिचवीत असतात. हा गाळ तिथल्या पिकांना मानवतो अन् खताप्रमाणे पोषक ठरतो. त्यामुळेच या भागांत पिकांची समृद्धि दिसते. शेढी अन् मही या दोन सरितांच्या दुआबांत तर ही धान्य समृद्धि शिगेला पोंचते. इथे कापूस फुलतो, गळिताचीं धान्यें पोसतात अन् विविध प्रकारचीं फळेंहि विपुल प्रमाणांत निर्माण होतात. या भागांत डोंगर दिसण्याची तर गोष्टच सोडा; पण लहान सहान टेकडीहि योजनांची पायपीट करूनच शोधावी लागेल. हा प्रदेश इतका सपाट आहे, की पावागडावरून अहमदाबादेची जुम्मा

मशीद सहज पाहून घ्यावी.

तिसरा विभाग येतो उत्तर पूर्वेच्या पर्वतश्रेणींचा. या भागांत अरवली, विंध्य, सातपुडा आणि सह्याद्रि यांच्या रांगा उभ्या आहेत. हे डोंगर दख्खनच्या पठारापर्यंत पसरलेले आहेत. या पर्वतांच्या कुशींतून अनेक नद्या उगम पावतात. हा भाग शेवटीं डांगच्या जंगलांत विलीन होतो. रेवाकांठची प्रमुख पर्वतश्रेणी म्हणजे राजपिपाला. या श्रेणींत सातपुड्याचीं पश्चिम शिखरें येतात. या शिखरांवर झाडी विपुल आहे. नर्मदा आणि तापी या दोन्ही नद्यांना हींच शिखरें समृद्ध जलप्रदान करतात. यांपैकी कांही शिखरें तर अति दुर्गम आहेत. अरवलीच्या टेकड्या, महीकांठा अन् कच्छचें रण यांच्यामध्यें सखल जमिनीचा पट्टा आहे. या पट्ट्यांत वाळूच्या खालीं एक प्रकारच्या गाळाचा थर आहे, तो पिकें पोसायला उत्तम ठरतो. याच भागांत पालनपूरची खिंड आहे. प्राचीन काळापासून गुजरातचें उत्तरेकडील प्रदेशांशीं व्यापारी दळणवळण याच खिंडींतल्या मार्गाने चालत आलें आहे. गुजरातवर मुसलमानांचीं आक्रमणें झालीं, तींहि याच पालनपूरच्या खिंडींतून.

## सौराष्ट्र

सौराष्ट्र हा गुजरात राज्याचा दुसरा घटक. त्याचीं वैशिष्ट्यें सांगणारा एक सुप्रसिद्ध श्लोक आहे ---

**सौराष्ट्रे पंच रत्नानि नदी नारी तुरंगमः।**
**चतुर्थं सोमनाथं च पंचमं हरिदर्शनम्॥**

सौराष्ट्रांत पांच रत्नें आहेत. सौराष्ट्रांतल्या सरिता विपुल जलौघाने प्रेक्षणीय वाटतात. सोरठी ललना रूपाने आगळ्या असतात. सौराष्ट्रांतले घोडे देखणे अन् चपळ असतात. सौराष्ट्रांतले अन् त्यांतल्या त्यांत काठी लोकांचे घोडे प्राचीन काळापासून सुप्रसिद्ध आहेत. त्यांच्यांत अरबी घोड्यांचें रक्त असल्याचें सांगतात. ठेंगणा बांधा, आखूड हाडें, पाठीवर कृष्णरेषा, पायावर काळे पट्टे इत्यादि लक्षणांवरून काठी घोडे चटकन् ओळखू येतात. सोमनाथ हें सौराष्ट्रांतले तपःपूत ज्योतिर्लिंग क्षेत्र. आणि द्वारकेच्या रणछोडजीचें दर्शन म्हणजे तर जीवनाची कृतार्थताच !

पश्चिम किनाऱ्यावरचा हा द्वीपकल्प फार प्राचीन आहे. उत्तरेकडे वैराण वाळवंट अन् दक्षिणेकडे निसर्गरम्य कोकण यांच्यामध्यें सौराष्ट्राची भूमि येते. त्यामुळे या प्रदेशाला शेजारच्या दोन्ही प्रदेशांचा ' वाण नाही पण गुण ' लागला आहे. सौराष्ट्राच्या व्युत्पत्ति दोन: सौराष्ट्र म्हणजे चांगलें राष्ट्र किंवा सौर–राष्ट्र अर्थात् सूर्योपासकांचें राष्ट्र. दोन्ही व्युत्पत्तींत थोडा बहुत तथ्यांश आढळतो. युआन च्वांग ( ह्युएन त्संग ) आपल्या भारतभ्रमंतींत या भागांत पोचला होता. तो याला ' सुराट ' म्हणतो. मुसलमानी अमदानींत हें ' सोरठ ' बनलें. ग्रामीण विभागांत आजहि सोरठ याच नांवाने तें प्रसिद्ध आहे. या सोरठाची प्रशस्ति गातांना तिथला एक लोककवि म्हणतो–

**सोरठ धरा न संचर्यो**
**चढयो न गढ गिरनार**
**वणझारुनो बळदियो**
**गियो जन्मारो हार**

जो सोरठच्या भूमींत गेला नाही अन् जो गिरनारपर्वत चढला नाही, तो जन्माला येऊन व्यर्थ ! जसा काही बनजाऱ्याच्या घरचा बैलच !

सौराष्ट्रांतल्या ललनांविषयीं वर उल्लेख आलाच आहे. दुसरा एक लोककवि त्याला दुजोरा देतो—

**भादर आरे जळ भरे**
**तांबा पित्तळ हेल**
**जोबन मदमाती बहू**
**चाले ढळकती ढेल**

या पाहा पणिहारिणी ! यौवनाने मुसमुसलेल्या या रमणी मोरणीप्रमाणे ठुमकत ठुमकत भादर नदीवर येतात अन् तांब्या पितळेच्या घागरी भरून पाणी नेतात.

सौराष्ट्राचा समुद्रकिनारा एकसारखा नाही. कुठे तो रेताड आहे, कुठे खडकाळ आहे, तर कुठे गाळाने भरलेला आहे. पण हिरव्या गार वृक्षराजीने त्याला आलेली शोभा मात्र सर्वत्र सारखीच नयनरम्य आहे. समुद्रांतून

जातांना तर हा किनारा सुभग सुंदर दिसतो. सौराष्ट्रांतले डोंगर एकमेकांना समांतर असे उभे आहेत. उत्तरेकडील डोंगरांच्या रांगेत कनडोल्याचा डोंगर, चोटिल्याचा डोंगर आणि गोपचा डोंगर हे तीन प्रमुख आहेत. दक्षिणेकडच्या पर्वतश्रेणीचा राजा गिरनार ! यालाच प्राचीन काळीं उज्जयंत किंवा रैवतक म्हणत. हा सुटा डोंगर असून दाट झाडीने वेष्टिलेला आहे.



सौराष्ट्रांतला मुरलीवादक

सौराष्ट्रांतल्या बहुतेक नद्या उत्तर-दक्षिणच्या डोंगरांमधून आणि मध्य-भागीं असलेल्या पठारावरून उगम पावलेल्या आहेत. भादर नदी ही या सर्वांतली अग्रगण्य नदी होय. हिची लांबी १२० मैल आहे. हिचा उगम जसदणच्या उत्तरेस माधव डोंगरांत होतो. हिला वाटेंत अनेक नद्या भेटतात आणि आत्मार्पणाने हिचें जळवैभव वाढवतात. नवीबंदराजवळ ही पश्चिम सागराला जवळ करते. शेत्रुंजी नदीचा उगम होतो गीरच्या ढुंडी डोंगरांत. ही १०० मैलांचा प्रवास करून खंबायतच्या आखाताला मिळते. या सरितेने आपल्या उदरांत वाळूचे ढीगच्या ढीग सांठवून ठेवले आहेत. याशिवाय मच्छु नदी आहे तीहि सत्तर मैलांची आहे. हिचें पाणी खारें आहे. आजी या नदीचें पाणी प्रकृतीला मानवणारें म्हणून नांवाजलें जातें.

बवाणिया, जोडिया, धोलेरा, भावनगर, महुवा, नुकतेंच पोर्तुगीजांच्या तावडींतून मुक्त झालेलें दीव, जाफराबाद, वेरावळ, पोरबंदर, नवीबंदर हीं सौराष्ट्रांतलीं महत्त्वाचीं बंदरें होत. सौराष्ट्रांतलीं बेटें एकूण सहा—पहिलें पीरम बेट. हें खंबायतच्या आखातांत घोघा नदीच्या दक्षिणेस सात मैलांवर आहे. या बेटावर गोहिल वंशांतल्या मोखराजी नामक वीर पुरुषाने एक किल्ला

बांधला होता, असें श्री. याज्ञिक सांगतात. दुसरें चांच आणि तिसरें शियाळ. चांच लांबीला चारपांच मैल भरेल. शियाळ बेट जाफराबादच्या पूर्वेस आहे. त्याचा आवाठ जेमतेम एका मैलाचाच भरतो. चौथें दीव बेट. हें सात मैल लांब आणि नारळीच्या बागांनी समृद्ध आहे. पांचवें शंखोद्धार बेट. हें ओखामंडळाच्या पूर्वेस असून त्याची लांबी आठ मैल भरते. ओखा मंडळाचें हें प्रमुख बंदर होय. १३ व्या शतकांत संगण नांवाचा एक मोठा चांचा होऊन गेला. तो आपल्या अनुयायांसह या बेटावर आपला तळ ठोकून राहिला होता अन् इथूनच सागरी वाहतुकीची लूटमार करीत होता. आजहि त्याचे वंशज ओखामंडळांत आहेत. हे लोक मूळचे हिंदु; पण नंतर मुसलमान झाले.



**सौराष्ट्रांतला एक गवळी**

या बेटाला शंखोद्धार म्हणण्याचीं कारणें दोन—पहिलें हें, की इथे श्रीकृष्णाने शंखासुराचा वध करून त्याचा उद्धार केला, ही पौराणिक कथा.

आणि दुसरें हें, की इथे शंख पुष्कळ सांपडतात. कच्छच्या आखातांतला चाणखा, नौरा, बेडा, अंजार आणि चुसडा या बेटांचा संघ हा सौराष्ट्रांतला सातवा द्वीपसमूह होय. खडकावर वाळूचे थर चिकटून हीं बेटें बनलीं आहेत. टपोरीं अन् पाणीदार मोत्यें सांपडतात, तीं याच बेटांच्या नजीक.

सौराष्ट्रांतलें गीरचें जंगल सर्वांना ऐकून तरी ठाऊक असतेंच. कारण वनराजसिंहाचीं घराणीं तिथें आपलें राज्य स्थापून राहिलीं आहेत. विशिष्ट रक्कम फी म्हणून भरली, की सरकारतर्फे त्यांच्या दर्शनाची सोय होऊं शकते. मात्र जंगलांत वस्ती करण्याच्या अन् रात्रभर जागण्याच्या तयारीने तिथे गेलें पाहिजे. राजदर्शनच तें ! त्यासाठी ताटकळत राहणें ओघानेच येतें. वनराज हा सहसा दिवसा संचाराला निघत नाही. दिवस ही त्याची रात्र असते. दिवसभर तो थड छायेंत सुखशय्येवर निद्रासुख अनुभवतो. सूर्य मावळून अंधार पडला, की मग त्याचें उजाडतें. मग तो भुकेच्या तजविजेला लागतो. अशा प्रकारें शिकारीच्या नादांत हिंडतांना किंवा पाणवठ्यावर तृषाशमन करण्यासाठी आला असतांना, तो प्रेक्षकांच्या नजरेस पडतो.

## कच्छ

सौराष्ट्राच्या उत्तरेस अन् सिंधच्या दक्षिणेस कच्छचा प्रदेश येतो. याची पूर्वपश्चिम लांबी १६० मैल अन् दक्षिणोत्तर रुंदी ३५ पासून ७० मैलांपर्यंत आहे. याच्या उत्तरेला अन् पूर्वेला मोठें रण ( वाळवंट ) आहे. दक्षिणेस कच्छचें आखात आहे अन् पश्चिमेस हिंदी महासागर लहरत आहे. हा प्रदेश भारताच्या मुख्य भूभागापासून सुटा अन् एखाद्या बेटासारखा वाटतो. याला लागूनच उत्तरेस पाकिस्तानची सरहद्द येते. त्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने हा प्रदेश महत्त्वाचा ठरला आहे. हा प्रदेश कुठे रुक्ष, कुठे रेताड तर कुठे खडकाळ आहे. कच्छ हें रणाबद्दल तसेंच धरणीकंपाबद्दलहि प्रसिद्ध आहे. कांही वर्षांमागें अंजार येथे झालेल्या भूकंपाने गांवचें गांव गडप करून केवढा अनर्थापात केला होता, तें लोकविश्रुत आहे. १८१९ ते १८६४ सालापर्यंतच्या पंचेचाळीस वर्षांत चार वेळां कच्छला भूकंपाचे तडाखे बसले अन् १८१९ च्या भूकंपात सात हजार घरें अन्

हजारावर माणसें तिथे सीतेप्रमाणें धरणीचा ठाव मागायला गेलीं. पूर्वी तर धिणोधरच्या डोंगरांत ज्वालामुखीच धुमसत होता असें सांगतात.

कच्छ हें एक जनपद म्हणून पाणिनीच्या काळालाहि ज्ञात होतें. पाणिनी तिथल्या लोकांना काच्छक म्हणतो. तिथल्या लोकांचें वैशिष्ट्य तो तीन प्रकारांनी सांगतो. ' काच्छकं हसितम्, काच्छकं जल्पितम् ' आणि ' काच्छिकी चूडा. ' कच्छचे लोक वेगळया प्रकारें हसतात. त्यांच्या जल्पितांत म्हणजे बोलण्यांत वाक्याचा अंतिम वर्ण तरल करण्याची अर्थात् वाक्याच्या शेवटी हेल काढण्याची पद्धत आहे. अर्थात् या दोन हजार वर्षांपूर्वीच्या लकबी आहेत असें समजायचें. डोक्याचे पुढचे अर्धे केस कापून चूडा राखणें, ही ' काच्छिकी चूडा ' आजहि कच्छमध्यें, क्वचित् आढळतेच. कांडाग्नि अन् विभुजाग्नि अशीं कच्छच्या दोन विभागांचीं नांवें काशिका या व्याकरणग्रंथांत आढळतात. कांडाग्नि म्हणजे आजचें कांडला गांव अन् विभुजाग्नि म्हणजे भुज हें सांगायला व्युत्पत्तिशास्त्रज्ञाची गरज नाही. हीं दोन्ही नांवें अग्नि हें उत्तरपद धारण करतात. तीं कच्छच्या छोट्या व मोठ्या रणाचीं सूचक होत.

कच्छच्या रणांत मच्छु, रूपेण अन् बाछडा या तीन नद्यांचीं मुखें आहेत. पावसाळयांत या रणाचा प्रदेश पाण्याने भरून जातो. उन्हाळयांत पुन्हा तें रण कोरडें ठणठणीत होतें. उन्हाळयांत तिथे विपुल प्रमाणांत मृगजळ झुळझुळतें. पण मृगजळ पिऊन कोण तृप्त झाला आहे ! झिंझुवाड्याजवळ तर या मृगजळाचीं मोठमोठीं सरोवरेंच दिसतात. मृगजळाला हरणें फसतात, यांत काही नवल नाही. बोलून चालून ती खुळीच जात ! पण एकदा कच्छच्या प्रवासाला आलेले गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूरहि या मृगजळसरोवरांच्या दर्शनाने भ्रांत झाले, ही खरी नवलकथा आहे.

या रणांतून कच्छ आणि काठेवाडकडे जाणारे रस्ते आहेत. पावसाळयांत ही वाहतुक होडींतून चालते. तसें पाहिलें तर रण म्हणजे समुद्राचा उघडा पडलेला तळ ! पण झिंझुवाड्याजवळ पूर्वी बारमहा समुद्राचें पाणी असे. तिथे जहाजें अन् मचवेहि नांगरले जात. पण बनास, रुपेण, सरस्वती या नद्या अशा खट्याळ, कीं त्यांनी आपल्या पाण्याबरोबर गाळाचेहि लोटच्या लोट आणून तिथला समुद्र भरून टाकला. बिचारा समुद्र ! आपल्या या तीन भार्यांच्या उद्दाम अविनयाला उबगून तो कच्छच्या आखातापर्यंत मागे

हटला ! ‘ अबला यत्र प्रबला ’ होतात, तिथे ‘ जीवना’ची आशाहि दुर्लभ होते म्हणतात, तें कांही खोटें नाही.

कांडला बंदर हें कच्छमध्ये येतें. याच बंदरांतून पूर्वी आफ्रिका, अरबस्थान अन् भूमध्यसमुद्रालगतचे देश, यांच्याशी कच्छचा व्यापार चालत होता. हल्लीं आपलें मध्यवर्ती सरकार त्या बंदराच्या विकासाला बद्धपरिकर झालें आहे. हें बंदर एकदा अद्ययावत् झालें, की मुंबई बंदरावरचा ताण बराच कमी होईल. त्यामुळे गुजरातच्या समृद्धीलाहि मदत होईल. या प्रदेशांत खनिज तेलाचा शोध लागल्यामुळे तिथे आता मोठमोठ्या तेलकंपन्यांनी आपलीं बस्तानें बसवलीं आहेत. कांडलाजवळ जें नवें शहर दिवसेंदिवस वसत, वाढत आहे, त्याचें नांव गांधीधाम. पाकिस्तानांतून आलेल्या बऱ्याच निर्वासितांना या शहराने निवारा दिला आहे. एतावता कच्छ सर्व बाजूंनी विकासाच्या अन् समृद्धीच्या मार्गावर अग्रेसर झालें आहे, असें म्हणायला हरकत नाही.



# गरवी गुजरात

१

जय ! जय गरवी गुजरात ! दीपे अरुणूं परभात !
ध्वज प्रकाशशे झळळळ कसुंबी प्रेम शौर्य अंकित,
तूं भणव भणव निज संतति सहुने प्रेमभक्तिनी रीत,
ऊंची तुज सुंदर जात, जय ! जय ! गरवी गुजरात !

उत्तरमां अंबा मात
पूरवमां काळी मात
छे दक्षिण दिशमां करंत रक्षा कुंतेश्वर महादेव,
सोमनाथाने द्वारकेश ए पश्चिम केरा देव !
छे सहायमां साक्षात्, जय ! जय ! गरवी गुजरात !

नदी तापी, नर्मदा जोय
मही ने बीजी पण जोय
वळी जोय सुभटना जुद्धरमणने, रत्नाकर सागर,
पर्वत उपरथी वीर पूर्वजो दे आशिष जयकर !
संपे स्होहे सहु जात, जय ! जय ! गरवी गुजरात !

ते अन्हिलवाडना रंग
ते सिद्धराज जयसिंग
ते रंग थकी पण अधिक सरस रंग थशे सत्वरे मात,
शुभ शकुन दिसे मध्यान्ह शोभशे वीती गैं छे रात!
जन घूमे नर्मदा साथ, जय ! जय ! गरवी गुजरात !

कविश्रेष्ठ नर्मदचें हें गुर्जरगीत आहे. तें गुजरातीच्या जिव्हाग्रीं नाचत आहे. गुजरातला गरवी=गौरवशाली असें विशेषण त्याने जोडलें आणि ती शब्दजोड आता अविभक्त झाली आहे. या गीताचा अर्थ असा—

गौरवशाली गुजरातचा जय असो ! गुजरातच्या दाही दिशांवर लवकरच केशरी रंगाचा आणि प्रेम व शौर्य यांनी अंकित असा ध्वज फडकेल. हे गुजरात ! तूं आपल्या प्रजेला प्रेम आणि भक्ति दे. गुजरातची ही भूमि श्रेष्ठ आणि सुंदर आहे. उत्तरेस अंबाजी माता असून पूर्वेला कालिका माता आहे. दक्षिणेस कुंतेश्वर महादेव शत्रूंपासून रक्षण करीत आहे. पश्चिमेस सोमनाथ आणि द्वारकेश श्रीकृष्ण असून तो गुजरातच्या साहाय्यार्थ सदैव सिद्ध आहे. तापी, नर्मदा, मही इत्यादि नद्या या गुजरातला न्याहाळीत आहेत. याच्या रणांगणावर सुभटांचीं युद्धगीतें ऐकूं येत आहेत. याच्या पश्चिमेस रत्नांचा महासागर आहे, तर कित्येक पर्वतांवरून गुजरातचे वीर पूर्वज आशीर्वाद देत आहेत. येथील प्रजा ऐक्याने नांदत आहे. आणहिलवाड पाटण येथील शूरांची परंपरा व राजा सिद्धराज जयसिंहाचें औदार्य व त्याग या सर्वांमुळे गुजरातला कांही आगळेच रंग प्राप्त झालेले आहेत. पण या सर्वांहूनहि अधिक सुंदर असा रंग त्याला लवकरच लाभणार आहे. कारण गुलामीची रात्र सरत आली असून स्वातंत्र्याचा मध्यान्ह लवकरच चमकणार, असा शुभ शकुन दिसत आहे. गौरवशाली गुजरातचा जयजयकार असो !

भारताचे सामान्यत: तीन ठळक भाग कल्पितां येतात. पहिला भाग पूर्वेस समुद्रापर्यंत गेलेला गंगा—यमुनांचा तीरस्थ प्रदेश. दुसरा भाग पश्चिम समुद्रापर्यंत विस्तारलेला यमुना आणि गोदावरी यांच्या मधला प्रदेश आणि

तिसरा भाग गोदावरीच्या दक्षिणेकडचा मुलुख. एकच आर्य संस्कृति या तीन प्रदेशांत तितक्याच भिन्न प्रकारांनी अभिव्यक्त होतांना दिसते.

वर उल्लेखिलेल्या तीन भागांपैकी दुसरा भाग राजस्थान, मध्यप्रदेश आणि गुजरात मिळून बनलेला आहे. हा प्रदेश दीर्घकालपर्यंत राजकीय लाग्याबांध्यानीहि एकत्र राहिलेला आहे. त्यामुळे या भागांतल्या रीतीभाती, धार्मिक कल्पना आणि भाषांचें वळण, हें बहुतांशीं एका प्रकारचें राहिलें आहे. इतकेंच नव्हे; तर पुष्कळ वेळां त्यांचें समग्र सांस्कृतिक जीवन एकाच धारेने प्रवाहित झालेलें दिसून येतें.

या सगळ्या विभागांत गुजरातचें व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यानें उठून दिसतें, पृथक् दिसतें अन् मोहकहि दिसतें. एका लेखकाने म्हटलें आहे, कीं जोवर गिरनारचें शिखर गगनाचा वेध घेत राहील आणि जोंवर सागराच्या फेसाळ लाटा त्या प्रदेशाचा किनारा भिजवीत राहतील, तोंवर हा प्रदेश असेंच आपलें आगळें व्यक्तिमत्त्व गाजवीत राहील.

भारताच्या भूमीवर ऋग्वेदांतलीं सूक्तें उद्घोषित झालीं, यज्ञाग्नि प्रज्वलित झाले आणि इंद्राच्या उद्देशाने सोमरस गाळला जाऊं लागला, त्याच्याहि आधी या प्रदेशांत कुश नांवाच्या एका जमातीने आपली वस्ती मांडली होती. हे कुशलोक समर्थ होते, साहसी होते आणि व्यवहारकुशलहि होते. आजची द्वारका ही एका प्राचीन काळीं कुशस्थली होती आणि ती याच कुशांच्या प्रयत्नांतून उभी झाली होती.

ऋग्वेदांत ज्यांच्या बद्दल पुष्कळसे निंदाव्यंजक उल्लेख आहेत, ते पणी लोक म्हणजे याच कुशलोकांची प्रजा होय, असा कांही इतिहासवेत्त्यांचा तर्क आहे. पणी हे याच पश्चिम किनाऱ्यावर आपला मांड घालून वसले होते. ते समुद्रमार्गें परदेशांशीं व्यापार करीत होते, त्यासाठीच सागरावर नौका चालवीत होते आणि धनाचा संग्रहहि करीत होते. वणिग्वृत्ति हा गुजरातचा आत्मा आहे. वणिक् हा शब्द मूळच्या पणि या शब्दावरूनचा बनला आहे. म्हणजे त्या केवळ तर्कगम्य अशा प्राचीन काळापासूनच गुर्जर-सौराष्ट्राची भूमि ही व्यापारी उलाढाली करणारी भूमि होती, असें म्हणावें लागतें.

त्यानंतर शर्यातीच्या कुळगोत्राचे आर्यलोक या प्रदेशांत येऊन वसते

झाले. त्यांनी द्वारकेच्या आसपासच्या प्रदेशाला आनर्त असें नांव दिलें. आनर्तांच्या चतुःसीमा नेमक्या काय होत्या, हें सांगणें आज कठिण आहे. पण त्याचे उत्तर दक्षिण असे दोन भाग निर्माण झाले होते, एवढें मात्र कळतें. आनर्तराज्याचा महाभारत, भागवत, बृत्संहिता इत्यादि ग्रंथांतून उल्लेख मिळतो. हल्लींचें वडनगर तेंच पूर्वीचें आनर्तपुर होय. इथेच आनर्तांची राजधानी होती. दिग्विजययात्रेंत अर्जुनाने या आनर्तांना जिंकलें होतें, असें महाभारत सांगतें.



ग्रामीण गायक

शर्याति आणि उशना भार्गव यांचा च्यवनाशीं संबंध आहे. शर्याति राजा एका आपत्तींत सांपडला अन् त्याला आपली मुलगी सुकन्या ही च्यवनाला समर्पावी लागली होती. च्यवनाचा आश्रम नर्मदेच्या तीरावर होता, असें पुराणांत सांगितलें आहे. च्यवन हा भार्गव म्हणजे भृगुकुलोत्पन्न होता. त्यावरून शर्यातिपुत्रांबरोबरच भृगुहि गुजरातेंत आले असें म्हणावें लागतें. भडोचला भृगुकच्छ असें संस्कृत नांव आहे, तें भृगूंचें त्या ठिकाणचें वास्तव्य दर्शवितें. भृगुकुलांतला उशना किंवा शुक्र हा असुरांचा पुरोहित होता. बृहस्पति अन् उशना हे दोघे जसे सहाध्यायी, तसेच प्रतिस्पर्धीहि होते. बृहस्पतीने देवसमाजाचें पौरोहित्य स्वीकारतांच शुक्राचार्याने असुरसमाजाचें पत्करलें. तो असुरगुरु झाला. त्याच्याच पौरोहित्याने बलिनामक असुरराजाने भृगुकच्छ (भडोच) इथे आपला यज्ञ आरंभिला होता. म्हणजे बलीचें असुरराज्य प्रथम गुजरातेंत प्रस्थापित झालें होतें असें म्हणावें

लागतें. बलि हा पुराणांचा विषय असला, तरी माझ्यामते तो ऐतिहासिक पुरुष आहे. असीरिया मधून जी एक असुरांची टोळी समुद्रमार्गे देशांतराला निघाली, ती भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन उतरली असें दिसतें. या असुरजमातीचा बलि हा पुढारी होता. भार्गवांचें त्याला पाठबळ मिळालें आणि त्यामुळें तो या भारतभूमीवर देवांनाहि दहशत बसेल, असें राज्य निर्माण करूं शकला. बलीचा तो यज्ञ पूर्ण होऊं शकला नाहीं, याचें कारण देवांचें कौटिल्य. बटु वामनाला याचक म्हणून पुढे करून देवांनी कपटाने त्याचें राज्य बळकावलें आणि त्याला तिथून खालीं दक्षिणेकडे हाकललें.

भृगुकुल हें एक प्राचीन ऋषिकुल आहे. अनेक क्षेत्रांत यानें आपलें नांव गाजवलें आहे. विद्या आणि सत्ता या दोन्ही क्षेत्रांत या कुलांतल्या पुरुषांना विलक्षण महत्त्वाकांक्षा होती. अथर्ववेदाच्या निर्मितींत यांचा अर्धा हिस्सा आहे. भारताचें महाभारत बनवलें तें या भृगूंनीच. मनुस्मृतीचे कर्तेहि हेच. शुक्रनीति हा राजकारणावरचा ग्रंथ याच कुळांतून बाहेर पडला. गुजरात आणि नर्मदातीर ही यांची कर्मभूमि. ते अग्निपूजक होते, मंत्रतंत्र करणारे होते आणि या सर्वांच्याहि वर सत्तालोलुप होते. जिथे तिथे आपलें वर्चस्व असावें, सर्वत्र आपलीच पूजा व्हावी, अशा भावनेचें ते जणू बाळ-कडूच प्याले होते.

पुढे या भूमींत अवतरले ते हैहय. ते शौर्य अन् उत्साह यांचे जणू पुतळेच होते. त्यांचे संस्कारहि पंचजन आर्यांप्रमाणे विशुद्ध नव्हते. ते जरा अनगड आणि आडदांडच होते. त्यांच्या पांच शाखा होत्या. वीतिहोत्र, भोज, अवंती, तुंडिकेर व तालजंघ अशीं त्यांचीं नांवें होतीं. त्यांतली माहिष्मती ( आजचें महेश्वर ) या ठिकाणची शाखा बलवत्तर ठरली. या लोकांच्या विजयाकांक्षेला सीमा नव्हती. ते तिथल्या नागांना जिंकून अन् त्यांना हाकलून वरचढ झाले. गुजरातवर त्यांनीच सत्ता मिळवली आणि त्याचें अनूपदेश असें नवें नाम-करणहि केलें.

याच हैहय वंशांत पुढे सहस्रार्जुन जन्माला आला. त्याच्या जातीच्या लढाऊ वृत्तीचे सारे गुण त्याच्या अंतरांत अधिक तीव्र आणि प्रखर झाले होते. त्याने चारी दिशांना आपल्या सत्तेचा विस्तार केला. राज्याचें साम्राज्य बनवलें. त्याच्या युद्धनौका पश्चिम सागरावर लहरत विहरत अनिर्बंधपणें

संचरूं लागल्या. पंजाबपासून तों लंकेपर्यंत त्याने आपला दरारा बसवला. आर्यावर्ताची सत्ता त्याने अवमानित केली. आर्य संस्कारांना तुच्छ लेखलें. अनूप अन् सौराष्ट्र याना आपल्या सत्तेखाली आणलें. त्याच्या राज्यविस्ताराची कल्पना केली, कीं आर्यांचा पहिला चक्रवर्ती सहस्रार्जुन हाच असावा असें वाटतें. यमुना आणि गोदावरी यांच्या मधल्या सागरापर्यंतच्या प्रदेशाचें सांस्कृतिक ऐक्य त्याच्याच काळांत झालें असलें पाहिजे.

पण सहस्रार्जुनाची ही महत्त्वाकांक्षा आर्यावर्ताला मुळीच रुचली नाही. त्याची ही असंस्कृत, आडदांड सत्ता आर्यावर्ताने झुगारून द्यायचें ठरलें. आर्यावर्तातल्या प्रतापी भृगुकुलाने या मोहिमेचें पुढारीपण स्वीकारलें. जामदग्न्यराम म्हणजेच परशुराम, हातीं परशु घेऊन आर्यांचा नेता बनला. त्याला निमित्तहि तसेंच घडलें. सहस्रार्जुन सत्तामदाने इतका उन्मत्त झाला होता, कीं जमदग्नीसारख्या तपोधनाचा निर्घृण शिरच्छेद करायला त्याचा हात मुळीच कचरला नाहीं. आणि इथेंच त्याच्या विनाशाची नांदी म्हटली गेली. परशुरामाच्या नेतृत्त्वाखालीं सारा आर्यावर्त सहस्रार्जुनाच्या विरुद्ध खवळून उठला. त्याच्या विजयघोषणेने आर्यावर्ताचें नभोवितान दुमदुमून गेलें. परशुरामाने सहस्रार्जुनाचे कंद छेदून त्याची माहिष्मती नगरी धुळीस मिळवली. अनूप देशहि पादाक्रांत केला. या घडामोडींत त्याचें अनूप हें नांव जाऊन त्याला शूर्पारक हें नवें नांव मिळालें. त्या समरप्रसंगाच्या द्वारें आर्यसंस्कृति गुजरातेंत प्रविष्ट झाली. परशुरामाने गुजरातेला आर्यसंस्कृतीचें केंद्र बनवलें. परशुरामाच्या वास्तव्याने गुजरात हें जणूं दुसरें आर्यावर्तच बनलें. भृगुवंशांतल्या मार्कंडेयाने तापीतीरावर आश्रम उभारून या प्रदेशांतले आर्यसंस्कार उज्ज्वल केले. आनर्ताचें राज्य मांडून कृष्णबंधु बलराम याने तिथली आर्यभावना सतेज केली. योगेश्वर श्रीकृष्णाने द्वारकेला आपली नवी वसाहत स्थापून आर्यसंस्कृतीचा श्रेष्ठ आदर्श मूर्तिमंत केला. आणि अशा प्रकारें गुजरात हें जणूं नव आर्यावर्तच झालें.

गुजरातच्या अतिप्राचीन इतिहासाचें एक पर्व इथें समाप्त होतें. त्यापुढचीं कांही हजार वर्षें अंधकारांत विलीन झालीं आहेत. भारतीय युद्धानंतर इतिहासपटावरून अदृश्य झालेलें गुजरातचें नांव सनपूर्व पांचव्या शतकाच्या

सुमारास यौधेय गणाच्या नांवाशी निगडित होऊन इतिहासाच्या पृष्ठभागावर तरळूं लागतें.

यौधेय हे प्रथम सतलज नदीच्या खालच्या धारेवर पूर्वपंजाबचे वस्तीकर होते. ते प्रथम मुलतानमध्यें आले अन् तिथून खाली सरकत सरकत भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर दाखल झाले. हा मानवगण पाणिनीच्या कालाइतका तरी प्राचीन आहे. यांचें राज्य हें गणराज्य अर्थात् लोकशाही राज्य होतें. या गणाला पाणिनि आयुधजीवी अर्थात् शस्त्रावर उपजीविका करणारा गण म्हणतो. जो मदतीला बोलावील त्याच्या बाजूने लढायला जायचें आणि त्याच्याकडून जीवनवेतन मिळवायचें हा त्यांचा खाक्या. सिंध आणि सौराष्ट्र या प्रदेशांत त्यांनीं आपलीं अनेक गणराज्यें निर्माण केलीं. हे यौधेय म्हणजे उशीनर राजाचे वंशज होत, असें हरिवंश पुराणांत म्हटलें आहे. या लोकांत व्यापारी साहस अन् व्यवहारी बुद्धि हीं दोन्ही होतीं. अनेक लढाया खेळून ते लोक विजय मिळवीत गेले. कर्तृत्वाच्या गर्वाने तट्ट फुगले. पण त्यांनाहि नियतीने धडा शिकवायला कमी केलें नाही. शक राजा महाक्षत्रप रुद्रादामन् याने त्यांना रणांगणांत लोळवून अपरांत आणि सौराष्ट्र यांवर आपली सत्ता स्थापली. रुद्रदामन या यौधेयांविषयीं म्हणतो, की ' शौर्य अन् पराक्रम यांमुळे यौधेयांची डोकीं फिरलीं होतीं. ते दुर्धर्ष आणि अनाटोप झाले होते. ' पण एक गोष्ट इतिहासाला मान्य करावी लागली आहे. रुद्रदामन्ने यौधेयांना जिंकलें खरें; पण तो त्यांना कायमचे नेस्तनाबूद मात्र करूं शकला नाही.

त्यापुढे गुजरात हा गुप्त साम्राज्याचा एक विभाग बनलेला दिसतो. या प्रदेशांत तेव्हापासून संस्कृत भाषेचें प्राबल्य सुरू झालें. आर्यधर्म आणि आर्य संस्कार यांना बळ धरण्यास तो काळ अत्यंत अनुकूल ठरला. वल्लभी अर्थात् आजचें वडनगर हें गुप्तकाळांतलें गुजरातचें संस्कृतिकेंद्र होतें. गुप्तांच्या पूर्वीपासूनच वल्लभीची कीर्ति शुक्ल पक्षांतल्या चंद्रकलेसारखी वाढत होती. कथासरित्सागरांतल्या जीमूतवाहनाच्या कथेंत वल्लभीचा उल्लेख येतो. ' तिथून द्वीपांतरीं पाठविलें ' असे शब्द तिथे आढळतात. त्यावरून कळतें, की वल्लभी ही समुद्रकांठची व्यापारी पेठ होती. इथे त्या काळीं शंभर लक्षाधीश व्यापारी होते, असें म्हणतात. सातव्या शतकांत इथे विद्यापीठाची स्थापना

झाली. त्या विद्यापीठाला जसा राजांचा, तसाच या व्यापाऱ्यांचाहि आश्रय होता. अंतर्वेदींतले विद्यार्थी अध्ययनासाठी इथे प्रवेश मिळावा म्हणून धडपडत. या वल्लभीचे अवशेष आजहि भावनगरजवळ सांपडतात.

त्यानंतर पुनश्च एकदा इथल्या आर्यसंस्कारांवर परकी संस्कृतीच्या राखेचा थर जमला. इथे अनार्य शकजाति येऊन थडकली. त्याचबरोबर आगें किंवा मागें मग लोक आले, हूण आले, गुर्जर आले अन् मैत्रकहि आले. गुजरातेंत आर्येतर विभिन्न संस्कृतींचा संकर सुरू झाला.

मैत्रक हे कोण, कुठले, याविषयीं विद्वानांत विवाद आहे. कोणी त्यांना परदेशी म्हणतात, तर कोणी सूर्योपासक म्हणतात. कोणी क्षत्रिय मानतात, तर कोणी व्रात्य वैश्य समजतात. निर्विवाद गोष्टी या, की ते पराक्रमी होते अन् धर्मानें शैव होते. त्यांनी वल्लभीचें राज्य केलें आणि शैव असूनहि बौद्धांना उदार आश्रय दिला. त्यांच्या कारकीर्दींत एका वल्लभी नगरांतच शंभर बौद्ध मठ स्थापन झाले. भट्टार्क हा त्यांचा पहिला राजा आणि शिलादित्य (सहावा) हा शेवटचा राजा होय. मैत्रक हे देशी असोत वा परदेशी असोत. आर्य असोत वा अनार्य असोत. पण एक गोष्ट खरी, की ते इथे आले आणि त्यांनी इथल्या आर्यसंस्कारांनी पावन होऊन संपूर्ण आर्यत्व स्वीकारलें.



सरदार वल्लभभाई पटेल

वल्लभीपुरचें राज्य गुर्जरांनी नामशेष केलें. त्याबरोबरच गुजरातचें केंद्रहि बदललें. वल्लभीपुराच्या ऐवजीं भिन्नमाळ हें ठिकाण पुढे आलें. गुर्जर हे

त्याचे शासक बनले. तो समग्र देश गुर्जरांच्या नांवाने ओळखला जाऊं लागला आणि आजतागायत तो त्यांचेंच नांव सांगतो.

गुर्जर हे कोण आणि कुठले याबद्दलहि खूपच मतभेद आहेत. प्राचीन काळीं भारताच्या वायव्य सीमेवरील डोंगराळ भागांत अनेक जमाती टोळ्या राहत होत्या. हे टोळीवाले त्या भागांतून वेळोवेळीं भारतावर आक्रमण करीत. गुर्जर हेहि त्यांतलेच होते. ते वायव्य सीमाप्रदेशांतून पंजाबांत उतरले आणि तिथे त्यांनी आपली वसाहत स्थापली. कांही कालाने ते तिथून पुढे निघाले आणि राजस्थानाच्या ओसाड प्रदेशांत प्रविष्ट झाले. त्यांतल्या कांही टोळ्या पुढें भडोचला येऊन वसल्या, तर कांहींनी भिन्नमाळवर कब्जा केला. त्यांची पहिली सत्ता गुजरातेंत भडोचवर स्थापन झाली. आणि आठव्या शतकांत भिन्नमाळ येथे तिचा विस्तार झाला.

आजहि वायव्य सीमेवर, पंजाबांत, काश्मीरच्या दऱ्याखोऱ्यांत आणि इतरहि कांही ठिकाणीं, या जातीचे लोक राहतात आणि ते गुर्जर याच नांवाने ओळखले जातात. हे लोक मुळांत श्वेतहूण किंवा खर्गर या जमातीच्या एका शाखेचे आहेत असें कित्येक विद्वनाचें मत आहे. अरब इतिहास लेखक सुलेमान याने गुर्झ म्हणजेच गुर्जर हे मूळ जार्जियाचे राहणारे होत, असें म्हटलें आहे.

हूणांप्रमाणेंच गुर्जरहि अनार्य होत, असेंच बहुतेक पंडित सांगतात. पण श्री. चिंतामणराव वैद्य व श्री. मुन्शी यांनी आपलें वेगळें मत दिलें आहे. ते म्हणतात, की गुर्जर हे आर्यांपैकीच आहेत. कांही विद्वानांच्या मतें इथल्या ब्राह्मणांनी गुर्जर लोकांना आर्यधर्माची दीक्षा दिली आणि त्यांना चातुर्वर्ण्यांत समाविष्ट केलें. त्यांतूनच मग 'गुर्जर' पूर्वपद लावणारे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र निर्माण झाले.

गुजरांच्या राज्याचा संस्थापक हरिचंद्र हा होय. इ. स. च्या ६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत त्याने भिन्नमाळ येथे आपलें राज्य निर्माण केलें आणि त्या सगळ्या प्रदेशाला गुर्जर देश या नांवाने ओळखायला लावलें. युआन च्वांग हा चिनी प्रवासीसुद्धा त्याच नांवाने या प्रदेशाचा उल्लेख करतो. १५० वर्षें त्या प्रदेशावर गुर्जरांचें राज्य गाजलें. तेवढ्या कालखंडांत या गुर्जर राजवंशांत महान् योद्धे आणि नामांकित मुत्सद्दी निर्माण झाले. त्यांनी

गुर्जर देशाच्या सीमा वाढवल्या आणि राज्याचें साम्राज्य करण्याइतकी प्रगति केली.

पुढे राष्ट्रकूट हे बलवान् झाले. त्यांनी इ. स. ९१५ मध्ये पहिली व ९४० मध्ये दुसरी अशा दोन स्वाऱ्या गुर्जर साम्राज्यावर केल्या. या आक्रमणांत गुर्जर साम्राज्याचे तुकडे झाले. त्या धामधुमींत अनेक लहान लहान राजे साम्राज्यसत्ता झुगारून देऊन स्वतंत्र झाले आणि आपापले वेगळे चौके मांडून बसले. 'तूं मोठा का मी मोठा' अशा अहमहमिकेने ते आपापला राज्यविस्तार करण्याच्या नादाला लागले.

अशा या पडत्या काळांत एक कर्तबगार अन् भाग्यवंत पुरुष गुजराथच्या क्षितिजावर उगवला! त्याचें नांव मूळराज सोळंकी असें होतें. त्याने महेसाणा, साबरकांठा अन् बनासकांठा हे आजच्या गुजरातचे दक्षिणेकडील जिल्हे आपल्या सत्तेखाली आणले आणि सरस्वतीच्या तीरावर अणहिलवाड येथे आपली राजधानी स्थापली. वनराज चावडा या चापवंशी पुरुषाने इ. स. ७४६ मध्यें हें नगर वसवलें होतें. इ. स. ९४२ मध्यें तिथेच मूळराज हा सिंहासनावर विराजमान झाला. महंमूद गजनीच्या आक्रमणापर्यंत म्हणजे इ. स. च्या ११ व्या शतकापर्यंत ही राजधानी आपल्या प्रकाशमय वैभवाने तळपत राहिली. मूळराज आपल्या बुद्धिमत्तेने मध्ययुगीन गुजरातच्या महत्तेचा विश्वकर्मा ठरला. त्याने पाटणची म्हणजेच अणहिलवाडची राजसत्ता सर्व प्रकारें अजिंक्य केली.

मूळराजाचें हें राज्य लहान होतें; पण त्याची गुणवत्ता मोठी होती. गुप्त साम्राराज्याचा आदर्श त्याने आपल्या डोळ्यांसमोर ठेवला होता. त्याच पद्धतीवर त्याने आपली राज्ययंत्रणा उभारली. तो विद्या–कलांचा भोक्ता अन् कर्णासारखा उदारहि होता. एका दानपत्रांत त्याच्याविषयीं म्हटलें आहे, कीं सतत दानधर्म करीत राहिल्यामुळे त्याचे हात सदैव ओले असत. त्याच्या कारकीर्दीत अणहिलवाड हें पश्चिम भारतांतलें एक विलोभनीय असें संस्कृति-केंद्र बनलें. राज्यांतली विद्यापरंपरा अविच्छिन्न चालावी म्हणून त्याने अनेक विद्वान् ब्राह्मण माळव्यांतून अन् कनौजमधून गुजरातमध्ये आणले व त्यांच्या चरितार्थाचीहि सोय लावून दिली. गुजरातेंत याच विद्वान् ब्राह्मणांचे वंशज सांप्रत औदीच्य ब्राह्मण या नांवाने प्रसिद्ध आहेत. अनेक ब्राह्मण व जैन

विद्वानांनी मूळराजाच्या आश्रयाला राहून विविध ग्रंथांवर टीका, भाष्यें इत्यादि साहित्यरचना केली. अपभ्रंश भाषेंतहि पुष्कळ ग्रंथ या काळांत निर्माण झाले.


याच मूळ राजाने गुजरातचा इष्टदेव म्हणून सोमनाथाची स्थापना केली. जवळच्याच सिद्धपुर या गांवाला धर्मक्षेत्र बनवलें. तिथें रुद्रमहालय नांवाची प्रचंड वास्तु उभारून त्याने आपलें नांव कलेच्या इतिहासांत अमर करून ठेवलें. भिन्नमाळची भग्न झालेली ज्ञानपरंपरा आता अणहिलवाड येथे पुनरुज्जीवित होऊन प्रकाशूं लागली.

सम्राट् जयसिंह सिद्धराज हा याच मूळराजाचा पणतू होय. हा सोळंकी वंशाचा कुलदीपक ठरला. याने गुजरातची सीमा थेट कार्तवीर्याच्या साम्राज्यसीमेपर्यंत नेऊन भिडवली. उज्जैन आणि अजमेर गुजरातचीं अंकित झालीं. बुंदेलखंडांतहि त्याची विजयघोषणा दुमदुमली. जयसिंह हा लहानपणींच सिंहासनावर आरुढ झाला असें सांगतात. याच्याविषयीं अनेक दंतकथा गुजरातमध्ये प्रचलित आहेत. त्यांतली बाबरा भुताची कथा सांगण्याजोगी आहे—

जयसिंहाला बाबरा नामक भूत वश होतें, असें सांगतात. खरें म्हणजे बाबरा हा एक माणूसच होता. सिद्धपूरच्या ईशान्येस ज्या बर्बर टोळयांची वस्ती होती, तिचा तो राजा. तो आजूबाजूच्या प्रदेशावर अचानक धाड घाली आणि अन् लूटमार करी. त्याच्या या धूमकेतूसारख्या अकस्मात् येण्या-जाण्यामुळे लोक त्याला ‘ बाबरियो भूत ’ म्हणत. एकदा असाच जबरदस्त हल्ला करून त्याने रुद्रमहालय हें मंदिर उद्ध्वस्त केलें अन् लुटून फस्त केलें. जयसिंहाला तें सहन झालें नाही. त्याचा क्रोधाग्नि खवळला आणि तो बाबऱ्यावर चालून गेला. दोघांचें द्वंद्वयुद्ध जुंपलें. त्यांत अखेर जयसिंह बाबऱ्याच्या छाताडावर बसला. भीमाने बकासुराला बुकलावें तसें त्याने बाबऱ्याला बुकलून काढलें. बाबऱ्या रक्त ओकूं लागला. त्याचें प्राणोत्क्रमण व्हायची वेळ आली. पण एवढ्यांत बाबऱ्याची बायको पिंगलिका हात जोडून डबडबत्या डोळयांनी पुढे आली. तिने जयसिंहाकडे पतीला जीवदान मागितलें. त्यामुळे जयसिंहाचें हृदय द्रवलें. बाबरा जिवानिशी सुटला अन् पुढे हयातभर तो जयसिंहाचा विश्वासु अंगरक्षक म्हणून राहिला.

जयसिंहाने दक्षिण गुजरात, सौराष्ट्र, कच्छ, हे प्रदेश जिंकून गुजरातचें तिसरें साम्राज्य उभें केलें. पाटणचा जुना शत्रु म्हणजे माळवा. तो जिंकण्यासाठी जयसिंहाने सतत एक तप युद्धाग्नि प्रज्वलित ठेवला. अखेर मालवाधिपति यशोवर्मा याने शरणागति स्वीकारली. उज्जयिनी आणि धारा या नगरींचें पतन झालें.

इ. स. ११३६ मधली ही घटना आहे. माळवा जिंकून परत येतांना त्याने यशोवर्म्यालाच कैदी करून आणलें नाही; तर त्याचें समग्र ग्रंथालयहि उचलून आणलें. त्यावरून त्याची जयिष्णु वृत्ति जशी दिसून येते, तशी त्याची ज्ञानलालसाहि कळते. पुढे ठाण्यापासून वढवाणपर्यंत चाळीस किल्ले बांधून आणि त्यांच्यावर शिबंदी ठेवून त्याने आपल्या साम्राज्याला भक्कमपणा



पाटण—सहस्रलिंग सरोवर

आणला. बाबऱ्या भुताने भग्न केलेलें रुद्रमहालय हें मंदिरहि त्याने पुनश्च उभारलें व कलावैभवाने नटवलें.

जयसिंह स्वतः विद्वान् नव्हता; पण विद्येची चव असणारा होता. विद्वा-

नांना आश्रय देण्यांत त्याने कधीहि कसूर केली नाही. त्याचें साम्राज्य वृद्धिंगत होतांच भिन्नमाळ, कनौज व उज्जयिनी, येथील राजाश्रित विद्वान् जयसिंहाचा दरबार शोधीत तिथे आले. त्याने या विद्वज्जनांसाठीं पाटणच्या सहस्रलिंग सरोवराच्या कांठी सत्रशाला व मठ बांधून दिले. तिथे मग अध्ययन–अध्यापन सुरू झालें. शास्त्रार्थाच्या चर्चा होऊं लागल्या. तिथे होणाऱ्या दार्शनिक वादविवादांच्या प्रसगीं जयसिंह स्वतः हजर राही आणि आपले कर्णसंपुट ज्ञानामृताने भरून घेई.

जयसिंह हा परम शिवभक्त होता. त्याने केलेली प्रत्येक गोष्ट त्याच्या मोठेपणाची साक्ष देत होती. शारीरिक सामर्थ्यांत तो भीमबळी होता. 'धैर्येच हिमवानिव ' हेंच वर्णन त्याच्या धीरवृत्तीला साजून दिसणारें होतें. त्याची लष्करी संघटना शिस्तबद्ध होती. मुत्सद्दीपण जणूं कौटिल्याकडून सरळ त्याच्याकडेच आलें होतें. गुर्जर देशाची गौरवगाथा त्याने बंदी-भाट जनांना शतसहस्र मुखांनी गायला लावली.

त्याच्या सर्व कामना पूर्ण झाल्या खऱ्या; पण एक न्यून तेवढें, शेवटपर्यंत पुरें झालें नाही. या सम्राट् पुरुषाला पोटीं संतान नव्हतें. तेवढ्या बाबतींत तो परम दुःखी होता. शांत वेळीं याच एका दुर्भाग्यामुळे त्याचे प्रदीर्घ निःश्वास बाहेर पडत. त्याने शिवाची आराधना, व्रत-वैकल्यें, दान-धर्म या गोष्टी कांही कमी केल्या नाहीत. पण आयुष्यांत पुत्रफळ त्याच्या पदरांत पडलें नाहीं. त्यामुळेच त्याच्या मृत्यूनंतर कुमारपाल हा त्याचा एक दूरचा पुतण्या पाटणच्या गादीवर बसला. एकाच्या दुर्भाग्यांत दुसऱ्याचें भाग्य फळफळलें.

कुमारपालाला गादीवर आणण्यांत हेमचंद्र या जैन पंडिताचा बराच हात होता असें दिसतें. कुमारपालाने कांही लढाया मारल्या आहेत, ही गोष्ट सत्य आहे. पण जैनांनी त्याच्या पराक्रमाचीं जीं वर्णनें पौराणिक थाटाने केलीं आहेत, तीं मात्र अतिरंजित वाटतात. जयसिंह सूरी नामक एका जैन कवीने त्याच्यावर एक काव्य रचलें आहे. ' कुमारपाल चरित ' हें त्याचें नांव होय. जैनपरंपरा त्याच्याविषयीं असें आग्रहाने प्रतिपादिते, की त्याने शैव पंथ टाकून जिनदीक्षा घेतली होती. जैन लोक त्याला ' परम् अर्हत् ' या उपाधीने

गौरवीत होते. पण श्री. याज्ञिक यांना हें मत मान्य नाही. ते सांगतात, कीं जैन धर्माची त्याला आवड होती एवढेंच !

या कालखंडांत गुजरातचें व्यक्तिमत्त्व अधिक सुस्पष्ट झालें. सोळंकी राजघराण्याचें माळव्याच्या परमारांशीं बहुतकाळ वैर चाललें होतें. त्यामुळे माळवा व गुजरात हे कायमचे वेगळे झाले. सपादलक्ष व राजस्थान हे तर आधीच वेगळे झाले होते. पाटणच्या राजांनी पुढे जैनधर्म स्वीकारला. स्वतःच्या मताच्या विजयासाटीं किंवा स्वतःचें महत्त्व सांभाळण्यासाटीं जैन मताच्या मंत्री–पुरोहितांनी शेजारच्या हिंदु राजांपासून वेगळेपणा पत्करला. त्यामुळे गुजरातचे संस्कार अधिक निराळे आणि अधिक ठळक झाले. कार्तवीर्याचा अनूप व सौराष्ट्र, तसेंच परशुरामाचा शूर्पारक आणि अपरान्त हे प्रदेश प्राचीन काळीं स्पष्ट असें वेगळें व्यक्तिमत्त्व मिळवून बसले होते; पण जयसिंह सिद्धराजाचें गुर्जरसाम्राज्य मोठें झालें, समर्थ झालें आणि त्या सर्व प्रदेशाला अनंतकाळासाटीं गुजरात ही एकमेव संज्ञा प्राप्त झाली.त्यावेळेपासून गुजरातची प्रजा आणि संस्कृति, भाषा आणि अस्मिता हींएक आणि अविभाज्य होऊन राहिलीं.

त्यानंतर बारावें शतक संपायला आलें आणि गुजरातच्या भूमीवर एक निराळीच आरोळी उठली. ‘ अल्ला हु अकबर ’ ही ती आरोळी होती. तिने गुजरातच्या कानठळया बसवल्या अन् जनतेच्या हृदयांत चळकंप निर्माण केला. ही गर्जना करणारे लोक अरबस्तानांतून पैगंबराचा संदेश घेऊन आले होते आणि भारतावर तुटून पडले होते. अल्लाउद्दिन खिलजी हा त्यांचा पुढारी होता. त्याने आपल्या वृद्ध चुलत्याचा विश्वासघाताने खून केला होता. यावरून तो काय जातीचा नरपुंगव असेल, त्याची कल्पना करावी. त्यावेळीं कर्णदेव वाघेला हा नुकताच गुजरातच्या गादीवर बसला होता. अल्लाउद्दिनाने माळवा पादाक्रांत करून पाटणवर धाड घातली. लूटमार, जाळपोळ आणि उच्छेद करीत मुसलमानी लष्कर पाटणच्या रोखाने आगेकूच करूं लागलें. कर्णदेव घाबरला. त्याने पाटण सोडून पलायन केलें. अल्लाउद्दिनाचा सेनापति अलपखान याने धडाक्यासरशीं पाटणवर कबजा केला. बोल बोल म्हणतां सगळें गाडें उलटलें. मंदिरांच्या मशीदी बनल्या. जिथे वैदिकांचा मंत्रघोष चाले, तिथे मशीदींतल्या मुल्ला–मौलवींची बांग उठूं लागली.

अल्लाउद्दिनाचा दुसरा सेनापती उलुफखान याने थेट समुद्रापर्यंत मुसंडी मारली. हिंदूंचें पवित्र ज्योतिर्लिंग सोमनाथ हें पुन्हा एकदा यवनांच्या तावडींत सांपडून छिन्नविछिन्न झालें. या यवन लष्कराने गुजरातेंतले अनेक किल्ले घेतले व अनेक जमीनदोस्त केले. शहरें लुटलीं, खेडीं जाळलीं, प्रदेशच्या प्रदेश बेचिराख केले. हिंदूंना मारलें, झोडलें, बाटवलें आणि अनेकांना परदेशच्या बाजारपेठांत नेऊन गुलाम म्हणून विकलें. अल्लाउद्दिनानें हें सारें इस्लामचा आदेश म्हणून केलें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

एक नवा धर्म, एक नवी (अ) संस्कृति, एक नवें अकल्पित आणि दुस्सह राजकारण गुजरातच्या भूमीवर हैदोस दुल्ला खेळूं लागलें. या आगींत गुजरातचे जुने संस्कार जळून भस्म होण्याची वेळ आली. मोठा आणीबाणीचा प्रसंग प्राप्त झाला. पण अशाहि परिस्थितींत आपला धर्म, आपली संस्कृति आपलें शील–चारित्र्य, यांचें रक्षण करण्याकरितां कित्येक वीरपुरुष पुढे सरसावले. निधड्या छातीच्या तरुणांनी धर्मासाठी आत्मबलिदान केलें. वीरांगनांनी सतीत्वाच्या रक्षणासाठीं चिता रचल्या. धडाधड जळणारा आणि कोसळूं पाहणारा हिंदु संकृतीचा महाल उभा ठेवण्यासाठीं कित्येक संस्कृति संरक्षकांनी आपल्या छातीचे चिरे केले. आपण मरून गुजरातच्या आत्मतेजाची ज्योत तेवत ठेवणाऱ्या अशा या स्त्री–पुरुषांच्या पुढे कहाण्या निर्माण झाल्या· त्यांच्यावर पोवाडे रचले गेले. त्यांच्या वीरगाथा गायिल्या गेल्या. 'कान्हडदे प्रबंध' ही अशाच पैकीं एक ओजस्वी वीरगाथा आहे.

इ. स. १२९७ मध्यें अणहिलवाड पडलें. इ. स. १३०६ सालीं साऱ्या गुजरातनेच आंग टाकलें. इ. स. १४०३ सालीं महंमद शाहा हा स्वतंत्र मुसलमान राजा म्हणून गुजरातच्या गादीवर बसला. हिंदुसमाजाची आक्रमणशीलता संपली. त्यापुढे संरक्षक असहकरितेचें युग सुरू झालें. हिंदूंनी आपले जुनेपुराणे संस्कार कसेबसे राखून धरण्यासाठीं कूर्मवृत्ति स्वीकारली. मुसलमानी सत्ताधाऱ्यांशी कमीतकमी संबंध ठेवण्याची वृत्ति त्यांच्यामध्यें निर्माण झाली. राज्यांतली व्यापारी सत्ता श्रेष्ठी आणि महाजन यांनी आपल्या हातांत घेतली. गांवकीचे अधिकार पंचायतींनी स्वीकारले. सामाजिक आणि नैतिक सत्ता जातीजातींच्या ताब्यांत गेली. एखादा महत्त्वाकांक्षी पुरुष मोठा अधिकारी होऊन सुलतानाशीं कानगोष्टी करी; पण घरीं आल्यावर सचैल

स्नान केल्याशिवाय त्याला भोजन मिळत नसे. तो बाहेर खुशाल हवी तेवढी सुलतानाची कृपा मिळवो; पण त्याचें सामाजिक जीवन मात्र त्याच्या जात-भाईंच्या हातीं असे. सर्व जातींवर ब्राह्मणांचेंच वर्चस्व होतें. त्यामुळे परसंस्कृति केवळ राजसिंहासनाभोवतीच घोटाळत राहिली. सामाजिक जीवनांत तिला स्थान मिळालें नाही. त्याहि काळांत समाजाचें शिक्षण पूर्वीप्रमाणेच ब्राह्मणांच्या हातीं राहिलें होतें. घरघुश्या परसंस्कारांना आपल्या सामाजिक जीवनापासून अलग ठेवण्याचें मानसिक वातावरण या ब्राह्मणांनीच निर्माण केलें.

पुढे पुढे मुसलमान सत्ताधाऱ्यांचीहि मनोवृत्ति बदलली. आपण परक्या देशाचे नसून याच देशाचे आहों, हेंच आपलें ' वतन ' आहे, असें त्यांना वाटूं लागलें. इ. स. १४०३ मध्ये गुजरातचा सुलतान बनलेल्या महंमद शाहाने दिल्लीशी असलेला आपला संबंध तोडून टाकला. त्याने गुजरात स्वतंत्र केली. तो गुजरातचा जेता म्हणून नव्हे; तर वतनी म्हणून राज्य करूं लागला. त्यामुळे हिंदूंचा छळ हळूहळू कमी झाला. धार्मिक असहिष्णुता नांवापुरतीच राहिली. बाटलेले हिंदु लोक धर्माने मुसलमान झाले, तरी संस्कारांनी गुजरातीच राहिले. आजहि गुजरातमधले बोहरे, मोलासलेम, खोजा, कच्छी मेमण हे नांवापुरतेच मुसलमान आहेत. त्यांनी उर्दूचा स्वीकार न करतां आपली गुजराती भाषा कायम ठेवली. त्यांच्यांत हिंदूंविषयीं तिरस्काराची भावना नाही आणि धार्मिक कडवेपणाहि नाही. गुजरातच्या संस्कृतीची खुबी ती ही ! विजेत्यांवरहि या संस्कृतीने विजय मिळविला. अहमदाबाद वसविणाऱ्या अहमदशाहाच्या अंतःकरणांत मुसलमानी अहंकारापेक्षांहि राजपुतांची तेजस्विताच अधिक होती, असें दिसतें.

याच काळांत गुजरातच्या आत्म्याने एका नव्या प्रवृत्तीचा स्वीकार केला. जीवनाचा प्रवाह गोठूं नये, हृदयांतला उत्साह मावळूं नये आणि संस्कार क्षीण होऊं नयेत, यासाठी गुजरातने एक वेगळें वळण घेतलें. एकाच महान् विभूतीच्या भोवती त्याने आपल्या भक्तिभावाचें मखर उभें केलें. द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्ण ही, ती महान् विभूति होय. भारताच्या कथावाङ्मयांत या श्रीकृष्णाने पाणिनीच्या कालापासूनच प्रेमादराचें स्थान मिळविलें होतें. ऐतिहासिक दृष्टीने श्रीकृष्ण हा केवळ यादवांचा एक नायक होता. पण


गुप्त सम्राट् हे वैष्णव असल्यामुळे त्यांच्या काळांत श्रीकृष्ण हा सर्व दैवी लक्षणांनी अलंकृत झाला. महाभारतांत श्रीकृष्ण हा थोर मुत्सद्दी अन् राजकारणी म्हणून आपल्याला दिसतो. पण पुढच्या वैष्णव पुराणांत तो श्रेष्ठ देव बनला. भागवताने तर देवाधिदेव, योगेश्वर आणि पुरुषोत्तम अशा महान् बिरुदांनी त्याचें माहात्म्य वृद्धिंगत केलें.

गुजरातमध्ये भालण नांवाच्या कवीने भागवताची प्रेरणा घेऊन कृष्ण-भक्तीचा मार्ग अनुसरला. गुजराती साहित्यांत त्याने नवें भक्तियुग सुरू केलें, पुढे मीरा व नरसी यानी आपल्या भावमधुर काव्यांनी भालणाचीच परंपरा समृद्ध केली. प्रेमानंदाने त्याचींच गीतें गायिलीं. दयाराम हा तर त्या युगाचा कळसच होय. या सर्व भक्त कवींच्या श्रवणाने आणि पठनाने सारी गुजरात कृष्णमय बनली.

या कृष्णभक्ति संप्रदायाने गुजरातेंत कित्येक महत्त्वाचे फेरबदल घडवून आणले. जैन व शैव या उभय मतांत मध्यंतरी कांही काळ विरोध निर्माण झाला होता, तो या वैष्णव संप्रदायाने मिटवून टाकला. त्याने शैव मताचें अवडंबर कमी केलें. पाशुपत मताच्या नांवावर चालणारें पाखंड उधळून लावलें. त्याने जैनांची शुष्कता दूर केली आणि आपण कोणीतरी वेगळे आहों, हा त्यांचा पृथक्पणा त्यांना विसरायला लावला. कृष्णभक्तीच्या या रसाने शैवमतांत सरलता आणि जैनमतांत सरसता आणली. तिने जणू या दोन शकलांना सांधूनच टाकलें.

काव्यात्मता, रसिकता आणि प्रेमपूजा हीं गुजरातच्या संस्कारांचीं मुख्य अंगं होत. मीरा व नरसी यांनी त्यांचें पोषण करून गुजरातच्या समाज-जीवनांत त्यांचें स्थान कायम करून टाकलें. गुजरातच्या पौरुषांत उत्साह आहे, तसाच त्यागहि आहे. व्यवहारकौशल्य आहे, तशीच उच्च अभिला-षाहि आहे. दूरदर्शीपणा आहे, तसाच निर्धारहि आहे. गुजरात भावनाशील आहे, खऱ्या अर्थाने गृहस्थ आहे आणि सेवाधर्माला जागणाराहि आहे. गुजरातची अस्मिता प्रखर चटके देणारी नसून ती शारदीयेच्या चंद्रकले-प्रमाणें सौम्य—शीतल आणि संजीवक आहे.

* * *



# भाषा आणि साहित्य

सांप्रत काळीं गुजराती भाषा ज्या प्रदेशांत बोलली जाते, त्याच्या चतु:सीमा अशा: पूर्वेस माळवा आणि खानदेश, पश्चिमेस समुद्र, दक्षिणेस ठाणे जिल्हा आणि उत्तरेस कच्छ, मेवाड अन् मारवाड. गुजराती भाषा ही बाहेरून कुठून आलेली भाषा नसून मराठी, हिंदी, बंगाली इत्यादि भाषांप्रमाणें आर्य कुळांतलीच एक भाषा आहे. वेदकालांतील प्राकृत जनांच्या बोलभाषेंतून पुढे प्राचीन पाली, अर्धमागधी आणि अशोकाच्या शिलालेखांतील भाषा यांचा प्रादुर्भाव झाला. हा काळ सनपूर्व ६०० ते इ. स. १०० पर्यंत धरतात. याला अपभ्रंश भाषांचा काळ म्हणतात. प्राकृत भाषांच्या स्वाभाविक विकासक्रमांतून बनलेलें अपभ्रंश भाषा हें अंतिम स्वरूप आहे. नवव्या, दहाव्या शतकांत आणि त्यापुढच्याहि काळांत शौरसेनी किंवा पश्चिमी अपभ्रंश ही भाषा उत्तर भारत, गुजरात, पंजाब, इथपासून तों बंगालपर्यंत काव्यक्षम अशी मोठी भाषा होती. याच शौरसेनी अपभ्रंशांतून गुजराती भाषा निर्माण झाली. त्यामुळे शौरसेनी आणि गुजराती यांचा संबंध माय–लेकींसारखा आहे. त्या बरोबरच प्राकृत आणि संस्कृत यांच्याशींहि तिचा संबंध असल्यामुळें तिच्या शब्दभांडारांत तत्सम आणि तद्भव शब्दांचा पुष्कळच भरणा आहे. याशिवाय

गुजरातींत कित्येक शब्द असे आढळतात, की त्यांचें मूळ किंवा व्युत्पत्ति सांगतां येत नाही. मात्र ते शब्द जनतेंत चलनी नाण्यासारखे प्रचलित आहेत. उदाहरणार्थ 'झडी', 'ढिंगली', 'डुंगर', 'लाकडूं' इत्यादि शब्द स्थानिक किंवा देश्य जातींचे म्हणजेच मूळच्या आर्येतर भाषांतले असण्याचा जितका संभव आहे, तितकाच ते बाहेरून आलेल्या जातींच्या बोलींतलेहि असण्याच्या संभव आहे.

महागुजरातला विस्तृत समुद्रकिनारा असल्यामुळे पुरातन कालापासून इथे अरब व्यापारी आणि इतर दर्यावर्दी यांचा बराच पायरव होता. गुजरातेंतले व्यापारीहि अरबस्तान, आफ्रिका वगैरे देशांशीं व्यापार करीत होते. अशा या दर्यावर्दीपणांतून बरेच परकी शब्द गुजरातींत आले आहेत. याखेरीज पश्चिम किनाऱ्यावर दीव आणि दमण या ठिकाणीं पोर्तुगीज लोकांनी अंमल केल्यामुळे त्यांच्या भाषेंतूनहि पुष्कळ शब्द गुजरातींत घुसले आहेत. मराठी आणि कानडी या भाषांतूनहि कित्येक शब्द गुजरातीने उचलले आहेत.

गुजराती भाषेला तिथल्या जुन्या कवींनी प्राकृत किंवा अपभ्रंश असेंच म्हटलें आहे. आतापर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीप्रमाणे महाकवि प्रेमानंदानेच आपल्या 'दशम स्कंध' या ग्रंथांत 'बांधुं नागदमण गुजराती भाषा', असा 'गुजराती' या नांवाने तिचा प्रथम उल्लेख केलेला दिसतो. गुजराती भाषा ही सामान्यतः दोन कोटी लोकांची मातृभाषा आहे. इ. स. च्या १० व्या शतकापासून तों आजतागायत या भाषेचा क्रमविकास सुस्पष्ट आहे. या भाषेंत प्रत्येक शतकाच्या भाषेचे नमुने उपलब्ध आहेत. अर्वाचीन गुजरातीचें मूळ कोणत्या शताब्दीपर्यंत गेलेलें दिसतें, त्याविषयीं विद्वानांत मतैक्य नाही. पण तरीहि गेल्या हजार वर्षांचा तिचा इतिहास पुढील प्रकारें विभागून दाखवतां येतो––

( १ ) गौर्जर अपभ्रंश– ( अथवा प्राचीन गुजराती ) इ. स. ११ व्या शतकापासून १४ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत.

( २ ) गुर्जर भाषा – ( अथवा मध्यकालीन गुजराती ) १४ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत.

( ३ ) अर्वाचीन गुजराती–१६५० ते चालू काळापर्यंत.

संक्षेपांत असें म्हणतां येतें, की इ. स. च्या ११ व्या शतकापर्यंत गुजरा-

तेंत अपभ्रंश भाषा प्रचलित होती. त्यानंतर २०० वर्षें पर्यंत गुजरातेंत अपभ्रंश व मध्ययुगीन गुजराती या दोहोंच्या मधलें भाषास्वरूप प्रचलित झालें. यालाच 'गौर्जर अपभ्रंश' म्हणतात. त्यानंतर ज्या भाषेचा प्रादुर्भाव झाला, तिला 'टेसिटेरी पश्चिम राजस्थानी' म्हणतात. १७ व्या शतकापासून मात्र अर्वाचीन गुजरातीचीं पदचिह्नें स्पष्ट दिसूं लागतात.

गुजराती लिपी देवनागरीचेंच एक वेगळें रूप आहे. पण तिने नागरीची शिरोरेखा झुगारून दिली आहे आणि कांही अक्षरांच्या आकृत्याहि बदलल्या आहेत. त्यांच्या उच्चारांत विवृत, अॅ आणि ऑ यांचा प्रयोग चांगल्या प्रकारें होतो. लेखनांत विशिष्ट चिह्नांनीं तो दाखवीत नाहीत; पण बोलतांना त्यांचा उपयोग आवर्जून करतात. 'बैठो,' 'छे,' 'गोर,' 'कोयल' इत्यादि शब्दांत विवृत, अॅ आणि ऑ दिसतात. गुजरातींत कंठ्य 'ह' च्या नंतर औरस्य 'ह' चा प्रयोग कधी कधी होतांना दिसतो. उदा० ब्राह्मण, आह्वान. इथें 'ह' हा ध्वनि छातींतून काढतात. कांही तद्भव शब्दांतहि 'ह' ध्वनि अल्पमात्रेने कानावर पडतो. उदा० अमे, तमे, ज्यारे, त्यारे, इत्यादि शब्द. या उच्चारणाला 'ह' श्रुति म्हणतात. याच प्रकारें कांही शब्दांत 'य' ध्वनिहि ऐकूं येतो. उदाहरणार्थ आंसला–आंस्य-लावला–लाव्य, दोरड्ला– दोयडु. याला 'य' श्रुति म्हणतात. कोमल चंद्र-बिंदु ( ँ ) चा लिहिण्यांत उपयोग करीत नाहीत; पण उच्चारणांत तो व्यवस्थित उच्चारतात. गुजरातींत कुठे कुठे च, छ, ज, झ चें उच्चारण प्राकृतांतून आलें आहे. पण साहित्यिक भाषेंत त्यांचा शुद्ध तालव्य उच्चार होतो. 'ज्ञ' चें उच्चारण मराठींत 'ज्ञ' होतें. हिंदींत 'ग्य' होतें, तर गुजरातींत 'ग्न' होतें. गुजरातींत विभक्तिप्रत्यय शब्दाच्या बरोबरीनेच लागतो. संस्कृताप्रमाणें लिंगेंहि तीन आहेत. सामान्यतः ओकारान्त शब्द पुंलिंगी, इकारान्त शब्द स्त्रीलिंगी आणि उकारान्त नपुसकलिंगी असतात. वचनें दोनच आहेत. 'ओ' लावला, की एकवचनाचें अनेकवचन बनतें.

गुजरातीचें प्राचीन साहित्य पुराणें आणि महाकाव्यें यांच्यावर आधारलेलें आहे. त्याचबरोबर धर्मकथा, प्रेमकथा आणि साहसकथा अशा स्वरूपांतहि पुष्कळ साहित्य उपलब्ध आहे. या कथा कांही अंशीं धार्मिक अन् नैतिक स्वरूपाच्या आहेत. अशा प्रकारच्या या कथासमूहांत 'तरंगलोला' या

कथेला महत्त्व दिलें पाहिजे. हिचा जनक ' पदलिप्ताचार्य ' हा आहे. त्याचा संबंध सौराष्ट्रांतील पालिताणा या शहराशीं लागतो. ' तरंगलोला ' ही एक प्रेमकथा आहे. त्याच बरोबर ती जैनधर्माश्रितहि आहे—

एका श्रीमंत सावकाराची एक सुंदर कन्या होती. तिचें नांव तरंगवती. तिने एके दिवशीं एका पुष्करणींत हंस आणि हंसी या दोघांची रतिक्रीडा पाहिली. त्या दर्शनाने एकाएकीं ती मूर्च्छित झाली. सावध झाल्यावर तिला आठवलें, की आपणाहि कोण्या एका काळीं हंसी होतों आणि आपल्या प्रिय हंसाचा पारध्याने वध केल्यानंतर आपण पतिविरह असह्य होऊन त्याच्यासह अग्निकाष्ठें भक्षण केलीं होतीं.

पुढल्या जन्मांत तीं दोघें मानवयोनींत आलीं. त्या दोघांचा फिरून परिचय झाला. पुढे त्यांना कांही डाकूंनी पकडलें आणि त्यांचा बळी द्यायचें ठरवलें; पण सुदैवाने तीं दोघें त्या प्रसंगांतून वचावलीं. नंतर त्या दोघांचा विवाहहि झाला. त्यानंतर त्यांच्याकडे एक जैन मुनि आला. त्याच्या उपदेशाने तरंगवतीला वैराग्य प्राप्त झालें. मग तिने सुव्रतेकडून जिनदीक्षा घेतली.

इ. स. च्या सहाव्या शतकापासून तों आठव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या काळांत गुजरातेंत दोन महान् संस्कृत कवी होऊन गेले. पहिला भट्टी आणि दुसरा माघ. भट्टी हा सौराष्ट्रांतला होता. त्याचें भट्टि–काव्य सुप्रसिद्ध आहे. माघ हा ' शिशुपालवधा 'चा कर्ता. तो अबूच्या प्रदेशांत राहत असे. या दोघांच्या नंतर गुजराती साहित्यांत हरिभद्राचा उदय झाला. हा साहित्यशौंड चितोडचा एक ब्राह्मण होता. पण पुढे त्याने जैनदीक्षा घेतली. तो मुनि बनला. ' सुदर्शन समुच्चय ' आणि ' धर्मकथा ' हे त्याचे तत्त्वज्ञानावरचे दोन ग्रंथ होत. त्याने आणखी एक ग्रंथ रचला, त्याचें नांव ' धूर्ताख्यान. ' हा ग्रंथ म्हणजे इरसाल चावटपणाचा अस्सल नमुना आहे. त्यांत हिंदूंच्या पुराणांचें मनसोक्त विडंबन आहे. हिंदुधर्मांतल्या भोंदूगिरीची टर आहे. त्याच्या उपरोधकौशल्याशीं इंग्रजी लेखक स्विफ्ट किंवा फ्रेंच लेखक व्हॉल्टेर यांच्याच उपरोधाची तुलना करावी लागेल, असें श्री. कन्हैयालाल मुन्शी म्हणतात.

दहा ते बारा हीं तीन शतकें गुजरात प्रदेशांत वाङ्मयसमृद्धीचीं ठरलीं. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आणि इतर बोली या सर्व भाषांत विपुल साहित्य

आकाराला आलें. वाङ्मयगंगेला जणूं आषाढाचा पूर आला. त्या काळीं दक्षिण गुजरातला लाटदेश असें म्हणत. या देशाची लाटी नामक एक वेगळी बोली होती. या कालांत या बोलीचेहि पुष्कळ कवी निपजले. त्यांनी लाटीला साहित्याचीं लेणीं चढवलीं. विनोदप्रधान शैलीने लिहिणें हें लाट कवींचें एक वैशिष्ट्य होतें.

त्या काळीं विक्रमाची उज्जयिनी आणि भोजाची धारा हीं माळव्यांतलीं दोन नगरें साहित्याचीं नांवाजतीं केंद्रें बनलीं होतीं. माळवा हा त्या काळांत परमार राजांच्या सत्तेखालीं होता. परमार राजे कवींचे पोशिंदे होते. कांही राजे स्वतः कवीहि होते. भोजराजा हा त्यांतला मुकुटमणि होय. विद्वत्त्व आणि नृपत्त्व हे दोन्ही गुण त्याच्या अंगीं संमिलित होऊन कृतार्थ झाले होते. मम्मटासारख्या पट्टीच्या साहित्यशास्त्रज्ञाने गौरवावें, असें त्याचें कवियश होतें. संस्कृत आणि प्राकृत या दोन्ही भाषा त्याच्या जिव्हाग्रीं खेळत होत्या. त्याने लिहिलेले किंवा त्याच्या नांवावर चढवलेले असे ३७ ग्रंथ आढळतात. त्याच्या दरबारांत विद्वज्जनांना सिंहासन आणि राजच्छत्रच तेवढें कमी असे. भोज राजा स्वर्गाला गेला आणि त्याच्या आख्यायिकांतून भोजाचा आश्रित असलेला कालिदास ( अर्थात् कोणीतरी ) शोकावेगाने उद्गारला—

**अद्य धारा निराधारा निरालंबा सरस्वती ।**
**पंडित खंडिताः सर्वे भोजराजे दिवं गते ।।**

त्यानंतर गुजरातेंत अणहिलवाड येथे सोळंकी राजांची सत्ता प्रस्थापित झाली. हे राजे आधुनिक गुजरातचे निर्माते मानले जातात. जयसिंह सिद्धराज हा त्या राजवंशांतला धुरंधर महापुरुष होय. गुर्जर देशाची कीर्ति आणि शक्ति त्याने वाढविली. त्याने माळव्यावर स्वारी करून तो प्रदेश जिंकून घेतला.

सिद्धराजाच्या दरबारांतहि अनेक विद्वद्रत्नें झळकलीं. हेमचंद्र हा त्या सर्व राजाश्रित पंडितांत अग्रगण्य समजला जातो. त्याने सिद्धराजाच्या आश्रयाला राहून अनेक शास्त्रांवर ग्रंथरचना केली. त्यानें व्याकरण लिहिलें, शब्दकोश लिहिला आणि ऐतिहासिक काव्येंहि रचलीं. त्याचा शिष्यवर्गहि वाङ्मयनिर्मितींत पुढें आला. काव्यें आणि नाटकें लिहून त्या शिष्यवर्गाने

संस्कृत भाषा श्रीमंत केली. जवळ जवळ सहाशें संस्कृत नाटकें हेमचंद्राच्या शिष्य–प्रशिष्यांनी गीर्वाणभारतीला सादर केलीं आहेत.

अर्थात् हें झालें सगळें संस्कृत जाणणाऱ्या रसिकांसाठी अन् पंडितांसाठी. पण आम जनतेला काय मिळालें, हा खरा प्रश्न आहे. सामान्य रसिकता उपाशीच राहिली काय, असाहि कोणी प्रश्न विचारील. पण त्याचें उत्तर 'नाही' असेंच दिलें पाहिजे. सामान्य जनतेच्या रंजनासाठीं सोळंकी राजांच्या काळांत कित्येक लोककवी लेखण्या घेऊन सरसावले. कोणी गद्यांत तर कोणी पद्यांत रोमहर्षक कथा लिहिल्या. सर्वांचा आवडता शृंगार रसहि अनेकांनी आळवला, घोळवला.

गुजरातच्या या मध्ययुगीन साहित्यांत रास नांवाचा एक नवाच प्रकार जन्माला आला आणि बोल बोल म्हणतां लोकप्रियहि झाला. संस्कृत आणि प्राकृत अशा दोन्ही भाषांत रासरचनांचें अमाप पीक आलें. हें साहित्य विदग्ध होतें, चतुर होतें आणि रसाळहि होतें; पण तें केवळ पंडितजनांना कल्पनेच्या साम्राज्यांतच आस्वादितां येत होतें. त्याला जनजीवनाचा स्पर्श नव्हता. कारण ज्यांनीं तें रचलें, ते लोक जनतेपासून बारा कोस दूर होते.

पण १२९९ सालीं अल्लाउद्दिन खिलजीनें गुजरातचा पाडाव केला आणि चालुक्यांच्या कृपाछत्राखाली आरामांत कालक्रमणा करणाऱ्या पंडितांना आणि कवींना पळता भुई थोडी झाली. ते प्राणभयानें अणहिलवाडची राजधानी सोडून पळत सुटले आणि खेड्यापाड्यांच्या वळचणीला येऊन उभे राहिले. तेल्याच्या आखाडांत पंडित आणि नांगऱ्याच्या पडळींत कवी आसरा मागत आहेत अशीं दृश्यें दिसूं लागलीं. त्या राज्यक्रांतीच्या अशनिपातानें तत्कालीन पंडितांना आणि कवींना खूप शिकवलें. कितीतरी काळ जनसागराच्या पोटांत बुडी मारून त्यांना राहावें लागलें. आणि त्यामुळेंच त्यांना जनहृदयाची ओळख पटली. लोकांच्या आकांक्षा, भावना, श्रद्धा त्यांना कळून आल्या. ते पंडित-कवी मग त्यांची भाषा शिकले. त्यांच्या काळजांतलें बोलूं, लिहूं लागले. पूर्वीच्या कल्पितापेक्षां सांप्रतच्या वास्तवांतच त्यांना खुमासदार काव्यविषय मिळूं लागले. आणि त्यांच्या या वेगळ्या अनुभूतींतून गुजराती साहित्यांत नव्या युगाची प्रभात झाली.

रास, फागु, बारमासी, कक्का, प्रबंध, आख्यान इत्यादि साहित्यप्रकार याच

अनुक्रम ...33202... दि: ...
क्रमांक ...391... नों: दि: ...

युगाची संतति होय. रास म्हणजे गानयोग्य काव्यप्रबंध. त्याची रचना आटो-पशीर आणि भावप्रधान असते. सर्वांत प्राचीन रासकृति उपलब्ध आहे, तिचें नांव ' भरतेश्वर–बाहुबलि रास. ' यांत भरत आणि बाहुबलि या दोघां राजपुत्रांचा अन्योन्य युद्ध प्रसंग, त्यांत बाहुबलीला झालेलें वैराग्य आणि अखेर त्याला झालेली केवलज्ञानाची प्राप्ति हे विषय वर्णिलेले आहेत. अशा प्रकारचे विविध रास निर्माण करण्यांत जैन कवींनी विक्रम केला आहे. रासावर जैनांचीच छाप आहे, म्हटलें तरी चालेल. याशिवाय, माळव्याच्या परमार राजावरचा मुंजरास, रेवंतगिरिरास, कच्छुलिरास, गौतमरास, पंचपांडव-चरित्ररास अशा विविध रासांची, जैनांनीं जणू रासच घातली. आपल्या धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी हा रासोद्योग जिवाच्या तळमळीने केला. नरसी महेत्याच्या पूर्वीचीं अडीचशें वर्षे एवढ्या कालखंडाला रासयुग म्हणतात, त्याचें कारण हेंच.

फागु काव्यें म्हणजे फाल्गुन महिन्यांत गायचीं गीतें. त्या गीतांतून वसंतोत्सवाचें आणि त्यांत विहार करणाऱ्या नर-नारींचें विलासमय वर्णन असतें. नायक–नायिकेचा शृंगार हा त्यांतला मुख्य विषय आणि निसर्गवर्णन हा आनुषंगिक विषय होय. स्थूलिभद्र फागु ही फागु काव्यांतली पहिली कृति मानतात. मात्र, त्या काव्यांतला वर्ण्य ऋतु वसंत हा नसून वर्षा हा आहे. याच्या कथेचा सारांश असा–

स्थूलिभद्र नांवाचा एक जैन साधु असतो. तो चातुर्मासासाठी पाटलिपुत्र नगरांत येतो. तिथे त्याला त्याची पूर्वाश्रमींची प्रेयसी भेटते. ती असते एक वारयोषिता. तिचें नांव कोशा. स्थूलिभद्र अजाणतां तिच्या दारीं भिक्षेसाठी जातो. त्याला अचानक पाहतांच तिचा जीव उचंबळून येतो. त्याच्यासह विलासांत घालवलेल्या मधुमती रात्रींचें तिला स्मरण होतें. मग तिला वाटतें, की पुन्हा एकादा तसेंच घडावें. स्मरणांतलें तें सुख पुनश्च अनुभूतींत उतरावें. म्हणून मग ती गणिका स्थूलिभद्राला नाना प्रकारचीं प्रलोभनें दाखवते. त्याला अनंगाच्या राज्यांत ओढायचा प्रयत्न करते. पण स्थूलिभद्र निर्धाराचा पक्का असतो. तो तिला बधत नाही. त्याचा मन:संयम अढळ राहतो.

ही एक वानगी झाली. अशीं अनेक फागुकाव्यें आहेत. **नेमिनाथ**

फागु, जंबुस्वामी फागु, अशीं त्यांचीं नांवें आहेत. फागुकाव्येंसुद्धा मुख्यत्वें जैनांनीच रचलीं आहेत. या सर्व काव्यांचा मुकुटमणि शोभेल, असें फागु-काव्य म्हणजे वसंतविलास ! त्याला त्या युगांतलें सर्वश्रेष्ठ काव्य समजतात. पण इतक्या सुंदर काव्याचा कवि मात्र अज्ञात आहे. विद्वानांच्या मतें तो कोणीतरी जैनेतर असावा. कारण जैनांनी फागु काव्यांत स्वखुषीने पाळलेला शृंगारवर्णनांतला संयम या काव्यांत स्वीकारलेला नाही. इथे कवि मोकळा आहे. रसलुब्ध प्रणयी युगुलांचा वसंतकालीन विहार त्याने मुक्तपणें वर्णिला आहे.

बारमासी म्हणजे वर्षाच्या मासचक्राचें नायिकेच्या विरहातुर भावनेंतून केलेलें चित्रण. ही एक नायिका पहा : तिचा प्रियकर परदेशीं गेलेला आहे. प्रत्येक मासांत ती त्याच्या प्रतीक्षेसाठीं नेत्रांच्या पणत्या करून बसते. तिला वाटतें, की तो चैत्रांत येईल. चैत्र गेला तर वैशाखांत उगवेल ....... पण तो येत नाही. वर्षाच्या शेवटच्या महिन्यांत तो येतो आणि उभयतांच्या उपासाचें पारणें फिटतें म्हणून बरें ! अन्यथा आद्यंतीं अश्रू अन् उसासे असेंच त्या काव्याचें स्वरूप राहिलें असतें. पण अखेरीस मीलन घडवूनच तें काव्य विराम पावतें. हाहि एक ऋतुगीताचाच प्रकार आहे. दयाराम, दलपतराम, नर्मदाशंकर वगैरे उत्तर युगांतल्या कवींनीहि बारमासीचा प्रकार हाताळला आहे.

प्रबंध म्हणजे ऐतिहासिक आणि चरित्रात्मक आख्यान काव्य. गुजराती भाषेंत असे अनेक प्रबंध आहेत. पण त्या सर्वांत ओजस्वी आणि वीररसाने भरलेला ग्रंथ म्हणजे ‘ कान्हडदे प्रबंध. ’ याचा कर्ता झालोरचा पद्मनाभ नांवाचा कोणी राजकवि आहे. १४५६ सालीं त्याने ही वीरगाथा रचून गुजराती शारदेला एक रत्नजडित अलंकार बहाल केला. श्री. साकर-लाल याज्ञिक यांच्या लेखावरून त्या काव्याचा पुढील प्रमाणे सारांश देत आहें—

करण वाघेला नांवाचा एक पुरुष इ. स. १२९३ सालीं गुजरातच्या गादीवर आला. माधव नांवाचा त्याचा मुख्यमंत्री होता. त्याने आपल्या राजाशीं दगाबाजी करून दिल्लीच्या अल्लाउद्दिन खिलजीला गुजरातेवर स्वारी करण्यासाठीं बोलावून आणलें. अल्लाउद्दिनाचा सरदार अलफखान

गुजरातवर चालून आला, त्यावेळीं झालोर येथें कान्हडदे (कृष्णदेव) नांवाचा राजा राज्य करीत होता. तो आपल्या राज्यांतून मुसलमानी सैन्याला मार्ग देईना. त्यामुळे अलफखानाला मोडासाच्या रस्त्याने वळसा घेऊन जावें लागलें. अलफखानानें त्या मोहिमेंत गुजरातेंतलीं अनेक शहरें विध्वंसिलीं. सगळीकडे हलकल्लोळ माजवून शेवटीं अलफखान झालोरकडे वळला. पण कान्हडदे सावध होता. त्याने अलफखानाच्या हल्ल्याला निकराने तोंड देऊन त्या मुसलमान सर-दाराला यथेच्छ खडे चारले. अलफखान शेपूट घालून पसार झाला. त्याचा धनी अल्लाउद्दिन खिलजी. त्याने कान्हडदेचा तो दंश मनांत ठेवला. कांही वर्षांनंतर अल्लाउद्दिन खिलजी स्वतःच मोठें सैन्य घेऊन झालोर गडावर धावून आला. त्याने प्रथम किल्ला वेढला. पण तेवढ्याने काम भागेना. गडावरचा बंदोबस्त पक्का होता. गडाच्या तटांत अल्लाउद्दिनाचें बोटहि शिरकेना. पण शेवटी फंद-फितुरी त्याच्या कामीं आली. एक देशद्रोही त्याच्या गळाला अडकला. त्यामुळे अल्लाउद्दिनाचें कार्य साधलें. कान्हडदे आणि अल्लाउद्दिन यांच्यामध्यें उठाव-लेल्या त्या रणधुमाळींत झालोर गडाचा पाडाव झाला. कान्हडदे तर लढतां लढतां मेलाच; शिवाय त्याचा पुत्र वीरमदे हाहि कामीं आला. अल्लाउद्दिन विजयाचा जल्लोष करीत गडाची वाट चढूं लागला. गडावर कान्हडदेची राणी होती. तिने तो बाका प्रसंग ओळखला. आतां आपल्या अब्रूवर घाला येणार हें जाणून त्या साध्वीने तात्काळ जोहाराची तयारी केली. तिने आपला ‘ सकळै शृंगार ’ केला. तिच्या नोकरांनी चंदनाची चिता रचली. राणी धीरोदात्त मनाने त्या चितेवर चढली. सगळयांनी तिला अभिवादन केलें. पाठोपाठ अग्निनारायण भडकला. त्याच्या उफाळत्या ज्वाळांत ती महासाध्वी विलीन झाली. तिच्या मागोमाग इतरहि अनेक राजपूत स्त्रिया अग्निस्नान करून पावन झाल्या. आणि तें रोमहर्षक दृश्य पाहून त्यांच्या आप्त-स्वज-नांनीं हंबरडा फोडला.

कान्हडदे प्रबंध हें एक अतुलनीय वीरकाव्य आहे. तें वाचतांना, ऐकतांना गुजराती माणसाची काया शहारते, थरारते. जयसिंह सिद्धराजाच्या वेळचें एक पराक्रमी युग काळाच्या ओघांत लुप्त होऊं घातलें होतें; पण या कवि-श्रेष्ठाने तें या काव्याच्या रूपाने चिरंजीव करून ठेवलें. जयसिंहाने गुजरात-च्या भूमींत जें पराक्रमाचें, पुरुषार्थाचें बीजारोपण केलें होतें, त्याला या

काव्याच्या रूपाने भरघोस फळ धरलें. गुजरातवर चालून आलेल्या परकीय आक्रमकांविरुद्ध छातीचा कोट करून ते वीरपुरुष लढले होते. त्यांनी त्या भूमीवर अक्षरशः रक्ताचा सडा शिंपला होता. तें युद्ध परिणामीं महागच पडलें होतें. पण त्यांतूनच पुढच्या अनेक पिढ्यांना चैतन्याचें स्फुरण देणारें हें वीरकाव्य जन्माला आलें, हाहि मोठाच लाभ समजला पाहिजे.

इथून पुढें गुजराती साहित्यांत भक्तियुगाचा प्रारंभ होतो. नरसी महेता, मीरा, प्रेमानंद, अखो, दयाराम हे या युगाचे उद्गाते होत. भक्तिरसाची ही गंगोत्री नरसी महेत्याच्या अंतरांतून झुळझुळूं लागते. तो गुजराती भक्त-कवींचा सम्राट् आहे. त्याच्या काव्यांतल्या अंतर्गत पुराव्यांवरून त्याचा काळ इ. स. १४१४ ते १४८० हा निश्चित केला गेला आहे. हा सौराष्ट्राचा सुपुत्र आहे. जुनागडाजवळच्या तळाजा या गांवीं याचा जन्म झाला. केवळ गुजरातेंतच नव्हे तर सबंध पश्चिम राजस्थानांतहि त्याच्या विषयींचा भक्तिभाव आजतागायत जागृत आहे.

बाळपणांतच त्याचे आईबाप निवर्तले. पोर अनाथ झालेलें पाहून त्याच्या चुलतभावाने मग त्याला जुनागडला आणलें आणि त्याचें पालनपोषण केलें. नरसीचें घराणें मूळ शिवोपासक होतें. नरसीलाहि लहानपणीं शिवभक्तीचेंच बाळकडू मिळालें होतें. त्याने विद्याभ्यास कधीं मन लावून केलाच नाही. भावाच्या उद्योगधंद्यांत आणि भावजयीच्या घरकामांतहि त्याने कधी इकडची काडी तिकडे केली नाही. त्यामुळें भावजय त्याच्यावर डूख धरून होती. ती प्रसंगाची वाट पाहत राहिली होती. नरसीला मनापासून आवडे तो साधुसमागम ! एकाद्या फडांत भजन–कीर्तनाचा रंग जमला, की नरसीची ब्रह्मानंदीं टाळी लागे. त्याला मग तहानभुकेचीहि शुद्ध उरत नसे. एक दिवस असाच कुठेतरी भजन–पूजन करून दुपारच्या वेळीं तो घरीं आला आणि भावजयीने त्याला धारेवर धरलें.

" दिवसभर भटकतोस. घरादाराची तुला शुद्ध नसते. कशाला तुला पोसायचं ? तूं म्हणजे केवळ अन्नाला काळ अन् धरणीला भार ! या घरांतून आत्ताच्या आत्ता तोंड काळं करून निघून जा ! "

नरसीला आपल्या भावजयीचे ते विषारी फूत्कार असह्य झाले. तो त्याच क्षणीं घर सोडून बाहेर पडला. आपलें जीवन परमेश्वराच्या कृपेवर झोकून देऊन तो

रणरणत्या उन्हांत वाट फुटेल तिकडे चालूं लागला. जातां जातां एका रानांत पोंचला. तिथें त्याला एक जुनाट शिवमंदिर दिसलें. त्या मंदिराचा आश्रय घेऊन तो म्हणाला, 'देवा विश्वनाथा, तूंच आता माझा मायबाप !'

आणि त्याने मार्कंडेयाप्रमाणे त्या शिवलिंगाला दृढ मिठी घातली. सात दिवस तो तिथे होता. सारखा नामजप, सारखी प्रार्थना, करीत होता. सात दिवसानंतर शिवाने त्याला दर्शन दिलें. शिव भुजा उभारून त्याला म्हणाला.

" माझ्या लाडक्या भक्ता, तुला जें आवडत असेल, तें तूं माझ्याकडून मागून घे. "

नरसी म्हणाला.

" मी तर बोलूनचालून अज्ञान बालक. आवडतं अन् नावडतं हें मला अजून कांहीच कळत नाही. तेव्हा देवा, तुला आवडत असेल तें तूं मला दे. "

शिवाने नरसीचें मुख कुरवाळलें आणि त्याला म्हटलें.

" मला गोपाळकृष्ण आवडतो. त्याची वृंदावनलीला, त्याची रासक्रीडा आवडते. "

" मग देवा तेंच मला दे. "

शिवाने 'तथास्तु' म्हटलें. तो त्याला घेऊन यमुनातीरीं वृंदावनांत आला. तिथे त्याने श्रीकृष्णाची गोपीसंगें चाललेली रासक्रीडा नरसीला दाखवली. अद्भुत, अननुभूत असें कांही तरी नरसीला पाहायला मिळालें. तें पाहून तो परत आपल्या जागीं आला. त्याला मग त्या कृष्णकन्हय्याचें, त्याच्या मुरलीचें, त्याच्या गोप-गोपींचें आणि त्याच्या गोधनाचें वेडच लागलें. तो सर्वांगीं कृष्णमय बनला.

त्यांतूनच त्याला कवित्वाची स्फूर्ति झाली. तो बोल बोल म्हणतां हरि-प्रेमाचीं पदें रचून गाऊं लागला. बाळगोपाळ त्याच्या त्या प्रेमळ अन् मधुर भजनाने तल्लीन होऊं लागले. नरसीला आता दुसरा कसला नादच उरला नाही. भावाने मग त्याचा पत्ता काढला. 'बाबापुता' करून त्याला परत घरीं आणलें. पण तरीहि नरसीच्या वृत्तींत कांहीच बदल झाला नाही.

भावाला वाटलें, की नरसी वेडा झाला आहे. त्याने मग नरसीचें वेड घालवण्यासाठी आपल्या परीने विचार सुरू केला. त्याचे दोहोंचे चार हात

करून टाकले. संसाराचा गुंता त्याच्या मागे लावून दिला. त्याला बायको चांगली मिळाली. पण नरसीचें भक्तिप्रेमाचें वेड कमी करण्याच्या कामीं तिचा कांहीच उपयोग झाला नाही. त्याला प्रसंगीं बायकोचा विसर पडे; पण श्रीहरी मात्र त्याच्या स्मरणांत ठसून बसला होता.

त्याला एक मुलगा अन् एक मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं. त्यांच्याहि आधी त्या घरांत दारिद्र्य येऊन बसलें होतें. खातीं तोंडें वाढल्यावर तें अधिकच त्रासदायक झालें. पण त्यामुळेहि त्याची मनःशांति ढळली नाही. तो सचोटीनें वागत होता. अडल्यापडल्यांना उपयोगी पडत होता. आणि हरिभजनांत दंग राहत होता. त्याला कांही प्रेमळ भक्त भेटले, तसे खळ-निंदकहि भेटले.

कांही कालाने त्याचा मुलगा एकाएकीं निवर्तला. पुढे एक दिवस त्याची पत्नीहि स्वर्गवासी झाली. नरसी एकटा पडला. उघडा पडला. खरें म्हणजे तो त्याच्या संसारावर मोठाच घाला होता; पण नरसीने तसें कांही मानलेंच नाही. तो वेगळेंच कांही बोलला—

**भलुं थयुं ने भांगी जंजाळ**
**सुखे भजीशुं श्रीगोपाळ**

‘ फार चांगलें झालें. सुटलों एकदाचा या जंजाळांतून ! आता सुखाने हरिभजन करीन. ’

थेट तुकोबांच्या वृत्तीचे हे उद्‌गार होते—

**बरें झालें देवा निघालें दिवाळें**
**बरी या दुष्काळें पीडा केली।**
**बरें झालें देवा बाईल कर्कशा**
**बरी हे दुर्दशा जनामध्यें।**
**बरें जालें जगीं पावलों अपमान**
**बरें गेलें धन ढोरें गुरें।**

तुकाराम आणि नरसी. दोघेहि परम भागवत. दोघेहि संसारांत अपेशी ठरले; पण परमार्थांत ध्वजपताका फडकावून गेले. दोघेहि अभिजात कवि.

दोघेहि आपापल्या प्रदेशांत अजून लोकांच्या जिव्हाग्रीं नाचत आहेत. मात्र, दोघांची थोडी अधिक तुलना करायची, तर नरसी हा तुकोबांच्या पेक्षा अधिक एकमार्गी आहे, अधिक भोळाभावार्थी आहे. त्या दृष्टीने तो तुकोबांच्यापेक्षा नामदेवाला अधिक जवळचा वाटतो.

शामळ दासनो विवाह, हार, हुंडी, मामेरूं, राससहस्रपदी, शृंगारमाला, असें त्याचें विपुल काव्यसाहित्य आहे. गुजराती आख्यानकाव्यांचा तो जनकच म्हटला पाहिजे. त्याची कविता मवाळ साखरेसारखी आहे. ती भक्तिरसाची जणूं मंदाकिनी आहे. 'वैष्णवजन तो तेने कहिये' हें नरसीचें एक पद. त्यांत वैष्णवाचीं म्हणजेच हरिभक्ताचीं कांही लक्षणें सांगितली आहेत. हें पद म. गांधींनी आल्या दैनिक प्रार्थनेंत समाविष्ट करून जगाला सुपरिचित केलें. त्याचीं आध्यात्मिक पदें गुजरातेंत आजहि प्रभातकाळीं प्रातःस्मरणासारखीं म्हटलीं जातात. त्या गीतांना 'प्रभातियां' अशी संज्ञा आहे.

नरसीनंतरचा काळ येतो मीराबाईचा. तिचीं पदें व्रज, राजस्थानी आणि गुजराती अशा तीन्ही भाषांत आढतात. राजस्थानी ही मीरेची मातृभाषा. पण द्वारकेंत बराच काल वास्तव्य केल्यामुळे तिला गुजराती भाषेचेंहि चांगलेंच ज्ञान झालें होतें. ती विनासायास गुजराती भाषेंतहि भाक्तिपर पद्यरचना करूं लागली होती.

मीरेच्या नंतर नांव घेण्याजोगा गुजराती कवि म्हणजे अखो भगत. याचा काळ इ. स. १५९१ ते १६५४ हा आहे. हा जातीचा सोनार होता. काठेवाडांतलें जेतलसर हें याचें गांव. तिथून तो व्यवसायासाठीं अहमदाबादेस आला; पण ऐन तारुण्यांतच संसाराला विटला. या घटनेला दोन तीन कारणें घडलीं. एकीमागून एक त्याच्या दोन्ही बायका मरण पावल्या. त्यामुळें त्याचा गृहस्थाश्रमच उद्ध्वस्त झाला. दुसरी गोष्ट म्हणजे, ज्या सरकारी टांकसाळीवर वरिष्ठ अधिकारी म्हणून त्याची नेमणूक झाली होती, तिथें त्याच्यावर धातूंत भेसळ केल्याचा आरोप आला. तिसरें कारण असें, की त्याच्या एका धर्मभगिनीने त्याच्याकडे एक दागिना घडवायला दिला होता. तो घेतांना तिला शंका आली, की अखोने त्यांत कांहीतरी हातचलाखी केली असावी. हे दोन्ही आरोप शेवटीं खोटे ठरले; पण त्यामुळे अखोच्या मनांत

मात्र जगाच्या भलेपणाविषयीं कायमची अढी बसली.

त्यासरशीं त्याने आप्त–स्वजनांचा संपर्क तोडून टाकला. पूर्वीचीं माणसें संसाराला विटलीं, की तीर्थयात्रेला निघून जात. अखोनेहि तोच रस्ता धरला. त्याला यात्रा तर करायच्या होत्याच; पण त्याहिपेक्षा मोक्षमार्ग दाखवणारा एखादा सद्गुरुहि शोधायचा होता. अखोला तसा एक गुरु भेटलाहि. गोकुळनाथ असें त्याचें नांव होतें. अखो त्याची मनोभावें सेवाचाकरी करूं लागला; पण तो गुरु, समर्थांनी 'अडक्याचे तीन' म्हटले, त्यापैकींच निघाला. अखोच्या जिज्ञासेला तो पुरा पडूं शकला नाही. अखोने त्याच्या-बद्दल म्हटलें आहे —

**गुरु कीधा में गोकुळनाथ**
**धरडा बळदने घाली नाथ**

'गोकुळनाथ नांवाच्या माणसाला मी गुरु केलें खरें; पण म्हाताऱ्या बैलाच्या नाकांत वेसण घालण्यासारखा तो प्रकार होता.'

पुढे त्याला खरा गुरु भेटला तो काशींत. तो 'शाब्दे परेच निष्णात' होता. अखोने त्याच्याकडे वेदान्ताचें अध्ययन केलें. गुरुकडून जें मिळालें तें सगळें त्यानें थेट आत्म्याला नेऊन भेटवलें. तो निःस्पृह वेदान्ती बनून आणि 'गुरुगम्य ठाव' शोधून परत अहमदाबादला आला. एवढ्या अवधींत त्याची पन्नाशी उलटून गेली होती. त्यानंतर त्याची प्रतिभा जागृत झाली. तो जें बोलेल तें कवित्व होऊं लागलें. पुढें सतत पंधरा वर्षें त्याची काव्यगंगा अविच्छिन्न वाहत राहिली. पंचीकरण, गुरुशिष्य–संवाद, चित्त-विचारसंवाद, अनुभवबिंदु, अखेगीता, असे अनेक ग्रंथ त्याने रचले. फुटकळ काव्यहि पुष्कळच लिहिलें.

अखोची कविता ग्वालच्या मानेने हृदयांत शिरून तिथे गुंजारव करणारी नाही. ती ओल्या वादीचे फटके लगावीत जाणारी कडकलक्ष्मी आहे. अखोने जगाचा बडिवार कधीच मानला नाही. जिथे जिथे दंभ, मिथ्याचार, भोंदूगिरी, हे दुर्गुण त्याला दिसले, तिथे तिथे उपहासाचा एखादा धारदार कटाक्ष फेकल्यावांचून तो पुढे गेलाच नाही. त्याचे शब्द मोजकेच खरे; पण ते मवाळ मात्र नाहीत–

**ज्यां ज्योईए त्यां कूड कूड**
**सामेसामा बेठो घूड**

'जगांत जिथे पहावें तिथे लांडी-लबाडीच दिसते. जणू काही घुबडेंच एकमेकांसमोर बसलीं आहेत.'

**एक मूर्खने एवी टेव**
**पत्थर एटला पूजे देव**

'एका मूर्खाला अशी खोड जडली होती, कीं तो दिसेल त्या दगडाला देव मानून त्याच्यावर गंध-फूल वाहायचा.'

**मारकणो सांड ने चोमासुं महाल्यो**
**करडकणा कुतराने हडकवा हाल्यो**

'आधीच मारका वळू आणि त्यांतच पावसाळाभर मोकाट सुटलेला. मग त्याच्या मस्तीबद्दल काय बोलावें! आधीच कुत्रें चावरें; त्यांतून तें पिसाळलें, मग त्याची अवस्था काय विचारावी!'

अखोच्या खड्या बोलांची ही केवळ वानगी आहे. त्याने स्वतःला कवि म्हणवून घेतलें नाही. कवीपेक्षा त्याला ज्ञानी म्हणवून घेणें फार आवडे. त्याच्या या सडेतोड कवित्वापुढे त्याच्या आगचे मागचे इतर कवी बापुडवाणे वाटतात. अखोच्या काळांत गुजरातमध्ये राधा-कृष्णाच्या भक्तीला उधाण आलें होतें. शृंगाराचे नसते रंगढंग तिच्यांत शिरले होते. अखोला तें बिल्कुल आवडलें नाही. त्याने या रंगेल कृष्णभक्तीचें स्तोम घटवलें आणि गुजराती कवितेला वेगळें वळण लावलें.

हें सगळें खरें असलें तरी गुजराती साहित्याला उच्च दर्जाचें स्थान कोणी मिळवून दिलें असेल, तर तें प्रेमानंद या कवीने. गहन अर्थाच्या अभिव्यक्तीला संस्कृताइकीच गुजराती भाषाहि समर्थ ठरूं शकते, हें प्रेमानंदाने पटवून दिलें. त्याच्या काळांत गुजरातीची किंमत ठरवणारा एक दोहा प्रसिद्ध होता—

**अबे तबे का सोलहि आना**
**अठे कठे का बार।**

इकडं तिकडं आठहि आना
सुं सा पैसा चार ॥

अवे तवे म्हणजे हिंदुस्थानी. तिची किंमत सोळा आणे म्हणजे रुपया. अठे कठे म्हणजे मारवाडी. तिची किंमत बारा आणे. इकडं तिकडं म्हणजे मराठी, हें सांगायला नकोच. तिची किंमत गुजरातने आठ आणे धरली आहे, हें विशेषच म्हटलें पाहिजे. आणि सुं सा म्हणजे गुजराती. तिची किंमत अवघी चार पैसे.

पण प्रेमानंदाने हें मूल्यमापन पार बदलून टाकलें.

१६३६ ते १७३४ हा प्रेमानंदाचा काळ होय. हा बडोद्याचा राहणारा. बाळपणींच आईबाप निवर्तल्यामुळे मावशीने त्याला लहानाचें मोठें केलें. त्याने पुराणांचें विस्तृत अध्ययन केलें होतें. गुजराती आख्यानकवीहि अभ्यासले होते. तो. पट्टीचा कीर्तनकार होता. त्याला अठ्याण्णव वर्षांचें दीर्घायुष्य लाभलें आणि तें सगळें त्याने कवितादेवीच्या सेवेला वाहिलें.

सुमारें ५० काव्यग्रंथ त्याच्या नांवावर आहेत. तीं बहुतेक सगळीं आख्यानकाव्येंच आहेत. रामायण आणि महाभारत या दोन महान् ग्रंथांच्या खाणींतून त्यानें आपलीं आख्यानरत्नें निवडलीं आणि स्वतःच्या प्रतिभेने त्यांना नवे पैलू पाडून तीं गुजराती जनतेला सादर केलीं. तो पुराणांत वावरत असूनहि वर्तमानाला पारखा नव्हता. त्याचीं पौराणिक पात्रें त्याच्या काळातलीं गुजराती माणसेंच वाटतात. त्यांच्याच आवडी निवडी आणि स्वभावधर्म घेऊन तीं आकाराला आलीं आहेत. वसुदेव, देवकी, कृष्ण, यशोदा, उषा, अनिरुद्ध, या सर्वांना त्याने गुजराती बनवून टाकलें आहे. त्याची भाषा साधी, सरळ अन् स्पष्ट असल्यामुळें सामान्य माणसालाहि तिचा रसास्वाद घेतां येतो. प्रेमानंद हा रससिद्ध कवीश्वर तर खराच, पण त्याहून तो गुजरातच्या संस्कारी कौटुंबिक जीवनाचा भाष्यकार आहे.

यानंतर तितक्याच तोलामोलाचा दुसरा एक वरेण्य कवि भेटतो तो म्हणजे दयाराम. जसे मध्ययुगीन मराठीचे मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, जसे कन्नडचे पंप, रन्न, पोन्न, तसेच गुजरातचे त्रिमूर्ती कवी म्हणजे नरसी, प्रेमानंद, दयाराम हे होत. दयाराम हा मध्ययुगांतला शेवटचा गुर्जर कवि ठरतो. इ. स. १७१७ मध्ये तो जन्मला आणि १८५२ मध्यें स्वर्गवासी झाला. गुजरातमध्ये ब्रिटिश

राजवट स्थिरस्थावर होत असतांना त्याने पाहिली.

त्याचें मूळचें नांव दयाशंकर, पण वयाच्या चौदाव्या वर्षी त्यानें वल्लभसंप्रदायाची दीक्षा घेतली आणि आपलें नांव अर्धं बदलून तें दयाराम केलें. प्रेमानंदाप्रमाणेच याचेहि आईबाप याच्या लहानपणींच वारले. प्रेमानंदाला त्याच्या मावशीने तर याला त्याच्या चुलत बहिणीने सांभाळलें.

दयाराम हा अभिजात प्रणयकवि आहे. ज्यांना प्रेमाचे ' चाळे ' म्हणतां येईल, अशा बऱ्याच गोष्टी लहानपणींच त्याच्या जीवनाच्या रोजकीर्दींत जमा झाल्या होत्या. गोकुळांतल्या नटखट कृष्णाप्रमाणे यानेहि एका नखरेल नारीची भरली घागर खडा मारून फोडली होती. तो आपलें डभोई हें जन्मगांव सोडून डाकोरला आला, वल्लभ संप्रदायांत दाखल झाला, गुरूच्या प्रेरणेने कृष्ण भक्तीकडे वळला, अनेकदा अनेक तीर्थांत न्हाऊन आला आणि तरीहि वयाची चाळिशी उलटेपर्यंत त्याची प्रणयसाधना कांही सुटली नाही.

दिसायला गोरागोमटा, कपड्यांच्या बाबतींत चोखंदळ, बोलण्यांत मिठ्ठास अन् वागण्यांत रंगेल असा हा गडी होता. त्यामुळे त्याच्यावर बायका चटकन् भाळत. कवित्व हें अंगींचें अन् संगीतांतहि उत्तम गति; त्यामुळे त्याच्या रसीलेपणाला नाना कळा चढल्या होत्या. आणि म्हणूनच त्याचें हें सगळें ' लीलाचरित्र ' आलोडून गुर्जरसाहित्यकार त्याला इंग्रज कवि बायरन् याच्या पंगतीला बसवितात.

दयारामाची ही शृंगारवृत्ति त्याच्या कित्येक गरब्यांमधूनहि चमकून जाते—

**कामण दीसे छे अलबेला**
**तारी आंखमां रे**

' प्रियकरा, आज तुझ्या नयनांत अजब जादू दिसत आहे. '

**ऊभा रहो तो कहुं**
**वातडी विहारीलाल**

' बिहारीलाला, तूं जरा थांबलास, तर मनांतलं एक गुपित मी तुला सांगणार आहें. '

**माणीगर आवो मारे**
**म्होले माणीगार**

'रसिक सजणा, तूं माझ्या रंगमहालांत ये ना !'

दयारामाने श्रीकृष्णाच्या बासरीला उद्देशून एक कविता लिहिली आहे. ती भावरम्य कविता म्हणजे गुजराती साहित्याचा एक चमकता रत्नालंकार आहे. जशी गोविंदाग्रजांची मुरली तशी, ही दयारामाची बासरी. पण त्याहूनहि दयानंद गुजराती जनतेचा कंठमणि कशाने झाला असेल, तर तो त्याच्या गरब्यांनी. त्या गरब्यांत त्याने राधा-कृष्णांना लक्षून शृंगाररसाची अमृतनिर्झरिणी वाहविली आहे. 'शृंगारीं सुरेखता' अन् 'माधुर्यों मधुरता' हें त्याच्या गरब्यांचें शोभन लक्षण आहे. दयाराम अमर झाला तो अशा गरब्या रचूनच !

नरसी महेत्याच्या रूपाने गुजरातेंत भक्तियुगाचा प्रादुर्भाव झाला. त्या युगाचा अंतिम श्रेष्ठ कवि म्हणजे दयाराम. त्याच्या काळांत भारताची परिस्थिति एकदम बदलूं लागली होती. भारतांत इंग्रज आले होते अन् राज्यकर्ते म्हणून स्थिरपदहि झाले होते. ही नवी गोरी राजवट आपल्या देशांतले नवे वारे घेऊन आली होती. युरोपीय साहित्याच्या द्वारें भारतांत एका नव्या विचारप्रधान संस्कृतीचा उदय होऊं लागला होता. आता देवांचें युग संपून मानवांचें युग सुरू झालें होतें. नवे लेखक, नवे कवी, नव्या विचारांचें उपायन घेऊन पुढे सरसावूं लागले होते. त्यामागचें गुजराती साहित्याचें युग दयारामाच्या मृत्यूने संपत होतें आणि कवि नर्मदाशंकर यांच्या रूपाने एक नवें युग अवतीर्ण होतें.

नर्मदाशंकर दवे ऊर्फ नर्मद याच्यापासून गुजराती साहित्याच्या आधुनिक युगाला प्रारंभ होतो. तोच या मन्वंतराचा प्रवर्तक होय. याचा जन्म इ. स. १८३३ मध्ये झाला. हा जातीने नागर ब्राह्मण. लहानपणीं अतिशय लाजाळू म्हणून याची प्रसिद्धि होती. प्राथमिक शिक्षण सुरतेस झाल्यावर पुढील शिक्षणासाठी तो मुंबईस आला. मुंबईच्या एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें त्याचें इंग्रजी शिक्षण झालें. १८१८ सालच्या खडकीच्या लढाईनंतर गुजरात ब्रिटिशांच्या सत्तेखालीं आला. या सत्तेने गुजरातच्या मुलखांत शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित केली. त्यासाठीच गुजराती लोकांनी या नव्या सत्तेचें स्वागत केलें. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या गुजराती तरुणांना शाला—प्रशालांतून शिक्षकांच्या जागा मिळूं लागल्या. त्या शिक्षणाने अव्वल इंग्रजींतल्या तरुणांची

दृष्टि फांकली. त्यांना युरोपियन संस्कृतीबद्दल वाजवीहून अधिक प्रेम वाटूं लागलें. त्यांचे डोळे दिपले. जें त्या काळीं महाराष्ट्रांत झालें, तेंच गुजरात-मध्येंहि घडलें. पश्चिमेकडून आलेल्या या प्रकाशझोतांत त्यांना आपल्या समाजांतल्या कित्येक गोष्टी गर्हणीय वाटूं लागल्या. हिंदु लोकांचा कर्मठपणा, त्यांच्यांतला उच्चनीच भाव, स्त्रियांचा कोंडमारा, विधवांना मिळणारी निर्दय आणि अन्याय्य वागणूक, हिंदु धर्मावरील अस्पश्यतेचा काळाकुट्ट कलंक, लोकभ्रमावरची अंधश्रद्धा, इत्यादि गोष्टी इंग्रजी ज्ञानाच्या झगमगाटांत त्यांना हिडिस दिसूं लागल्या. समाजजीवनांतली ही घाण दूर व्हावी, नव्या शिक्षणानें समाज विज्ञानाधिष्ठित व्हावा आणि तो आजच्या सुधारलेल्या जगांत माणूस म्हणून जगायला लायक व्हावा, अशा आकांक्षेनें त्यावेळचे कित्येक सुशिक्षित तरुण भारून गेले. या समाजशिक्षणाच्या कामीं इंग्रजी सत्तेशीं त्यांनी मनो-भावें सहकार्य केलें. त्याचबरोबर कांही विशाल दृष्टिकोनाचे ब्रिटिश अधि-कारीहि या देशांत सांस्कृतिक संस्था उभारण्यासाठीं प्रेरणा देऊं लागले.

सुधारणांच्या पहिल्या अवस्थेंत युरोपियन संस्कृतीशीं संबंध आलेला दलपतराम हा पहिला कवि होय. यांचें संपूर्ण नांव दलपतराम डाह्याभाई त्रवाडी असें आहे. ते एक पट्टीचे छंदःशास्त्रज्ञ आणि हुशार शिक्षक होते. त्यांनी गुजराती काव्यांत लोकप्रिय केलेलीं संस्कृत वृत्तें आज देखील टिकून राहिलीं आहेत. त्यांची पुष्कळशी कविता विनोदी वृत्तीची आहे. अल्पाव-धींतच गुजरातमध्यें ते कवि म्हणून ख्यातनाम झाले. त्यांना ‘ कवीश्वर ’ अशी उपाधि लाभली. त्यांनी प्राचीन पद्धतीचीं काव्यें लिहिलीं; तशींच अर्वाचीन पद्धतीचींहि लिहिलीं. ते वृत्तीनें सुधारणावादी होते. त्यांचें ‘ वेन चरित्र ’ हें एक दीर्घकाव्य असून त्यांत त्यांनी विधवाविवाहाचा पुरस्कार केला आहे. ‘ हुन्नरखाननी चढाई या ’ काव्यांत त्यांनी इंग्रजांच्या आक्रमक प्रवृत्तीमुळें देशी उद्योगधंदे आणि हस्तव्यवसाय यांना कसे वाईट दिवस आले, त्यांचें वर्णन करून त्याबद्दल दुःखहि व्यक्त केलें आहे. श्री. फोरबस या गोऱ्या साहेबानें गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटींत काम करण्यासाठी कवि दलपतराम यांना पाचारण केलें. त्या संस्थेचे सेक्रेटरी म्हणूनच त्यांची नेमणूक झाली. त्या संस्थेतर्फे निघणाऱ्या ‘ बुद्धिप्रकाश ’ नांवाच्या मासिकाचे संपादक म्हणूनहि त्यांचीच योजना झाली. ही संस्था अहमदाबाद शहरांत

१८४८ सालीं स्थापित झाली होती. दलपतराम तिथे काम करूं लागले.

दलपतराम हे गुजरातीचे निस्सीम भक्त होते. ते एकादा बडोद्याच्या खंडेराव महाराजांकडे गेले होते, त्यावेळचा किस्सा ऐकण्याजोगा आहे. ते मुद्दामच तिथे गेले होते. महाराजांनीं त्यांना ' कोण, कुठून आलांत, काय पाहिजे ? ' असें विचारलें असतां दलपतरामांनी त्यांना कवितेंतच उत्तर दिलें, तें असें—

**गीरा गुजराती तणा पीयरनी गादी पामी ।**
**मुख्य तो मराठी मानी देखी दुखी दिल छुं ।**
**अरजीतो आपी दीठी भरजी तथापि नही ।**
**आव्यो आप आगळ उच्चारवा अपिल छुं ।**

' महाराज, गुजराती भाषेच्या माहेरघरीं बडोद्याची गादी आपणास मिळाली आहे. पण आपण इथें मराठी भाषेला प्रमुख मानून तिला मानाच्या जागीं बसवलें. मला या गोष्टीचें दुःख होतें. मी गुजराती भाषारूपी राणीचा वकील म्हणून आपणाकडे आलों आहें. महाराणी गुजराती भाषा भर बाजारांत लुटली गेली आहे. आपण मोठे महाराज; तेंव्हा मी आपणांकडे याबाबतींत न्याय मागतों आहें...'

समाजांतल्या अनिष्ट चालींचा निषेध, विविध सुधारणांची तरफदारी, आणि शिक्षणाच्या प्रसाराला उत्तेजन, एवढ्याच माफक गोष्टी दलपतराम आणि त्यांच्या बरोबरीचे इतर सुधारक करूं शकत होते. यापुढचें पाऊल त्यांना उचलतां आलें नाही.

त्यामुळे पाश्चिमात्य संस्कृतीचीं निश्चित मूल्यें कोणतीं, हें स्वतःच्या बुद्धीने विचारून विवंचून त्यांवर भर देण्याची कामगिरी नर्मदासारख्या तरुण लेखकाला पार पाडावी लागली. युरोपियन राष्ट्रांची शक्ति त्यांच्या राष्ट्रीय ऐक्यांत आहे, हें नर्मदाच्या शोधक बुद्धीला अगदीं कोवळ्या वयांतच कळून चुकलें. नर्मदाशंकरांनी पहिली कोणती गोष्ट केली असेल, तर ती मानवी स्वातंत्र्याविषयीं आणि मानवी आत्म्याविषयीं आदरभाव दाखविण्याची. वैयक्तिक प्रेम आणि स्वातंत्र्य यांचें त्यांनी मुक्तकंठाने गुणगान केलें. गुजरातच्या भूमीचे आणि तिथल्या निसर्गाचे त्यांनीं अनेक पवाडे गाइले. मातृभूमीवरील त्यांच्या

आवेशयुक्त कविता प्रभावी अन् प्रमाणिक आहेत. त्यांच्या गद्यलेखनांतहि नवजीवनाचें ओज रसरसतें आहे. ते सुधारणेच्या वेगाचे चाहते होते. ‘ धीरे धीरे सुधार ’ हा दलपतरामांचा इशारा त्यांना मान्य नव्हता. कांहीतरी नवीन करावें, भरघोस करावें, अशी त्यांची पहिल्यापासून वृत्ति होती. आपल्या कवित्वाचा त्यांना विलक्षण अभिमान होता. स्वाभिमान, सत्यप्रियता, अन्यायाची चीड आणि वेछूटपणा या गुणांच्या मिश्रणाने त्यांचा स्वभाव बनला होता. श्री. उमाशंकर जोशी त्यांच्याविषयीं म्हणतात—

“ एकंदर पाहिलें, तर उच्च व्यक्तिमत्त्वाच्या या कवीचा उत्साह त्याला कलानिर्मितीकडे प्रवृत्त करणारा नव्हता, असें कष्टाने म्हणावें लागतें. पण तरीहि आधुनिक गुजराती गद्याचा जनक आणि नवनव्या साहित्यक्षेत्रांचा उद्‌घाटक या नात्यांनी त्यांची स्मृति गुजरातेंत अजरामर राहील. कोणाचीहि आर्थिक मदत नसतांना त्यांनी केवळ आत्मबळावर गुजराती शब्दकोशाची रचना केली. तसें पाहिलें, तर एकाहि क्षेत्रांत परिपूर्णता मिळविण्याचें श्रेय त्यांच्या नशिबीं लिहिलेलें नव्हतें; पण तरीहि एक हिम्मतवान् माणूस आणि गुजरातच्या नवजीवनाचें एक प्रतीक म्हणून गुजरात देश त्यांच्याकडे पाहतो. ”

नर्मदांनी आपल्या तरुण वयांत सामाजिक आणि धार्मिक संस्थांवर बेडरपणें हल्ले चढवले होते. पण जीवनाच्या उत्तरार्धांत ती त्यांची बेडर वृत्ति मलूम पडली. त्यांची भूमिका बदलली, विचारहि उलटले.

## भूल्यारे भाई भूल्या पाछा हटो

‘ भाई, आपली चूक झाली. आता मागे फिरूं या ’ अशी अनुतापाची भावना ते आळवूं लागले. उतारवयांत त्यांचें असें मतपरिवर्तन व्हायला अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या. असें म्हणतात, कीं मित्र आणि सुधारणांचे पुढारी यांचे ढोंगीपणा, भित्रेपणा इत्यादि दुर्गुण पाहून ते आपल्या सुधारापंथाच्या आग्रहीपणाला विटले आणि त्यामुळेच प्रथम जितक्या वेगाने पुढे गेले, तितक्याच वेगाने मागे आले.

१८५७ सालीं मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठांत शिकणारे तरुण युरोपचा इतिहास, तत्त्वज्ञान आणि साहित्य यांचें अध्ययन करीत. संस्कृतमधले धार्मिक ग्रंथ आणि काव्य नाटकादि साहित्य त्यांना

युरोपियन पंडित शिकवीत. त्यामुळे त्यांच्या मनांत राष्ट्रीय स्वत्वाची भावना जागृत झाली. आणि म्हणूनच पाश्चात्य संस्कृतीच्या भपक्याने न दिपतां ते भारतीय परंपरेलाच अधिक चिकटले. १९ व्या शतकांत युरोपांत मानवतावादाची एक नवी हवा पसरली. त्या मानवतावादाशीं हे तरुण तादात्म्य पावले आणि युरोपांतून भारतांत येणाऱ्या नवीन शक्तींचें त्यांनी आपल्या लेखनांतून आवाहन मांडलें. त्यांनी इंग्रजी कवितेचें सखोल परिशीलन केलें. तत्कालीन अद्‌भुतरम्यतावादी कवींचाहि अभ्यास केला. या १९ व्या शतकांतल्या नवीन लेखकांत नरसिंहराय दिवेटिया यांनी भावकवितेचा आश्रय करून आपलें काव्यलेखन सुरू केलें. विशाल वाचन, सूक्ष्म दृष्टि, स्पष्ट विचार आणि प्रामाणिक मतप्रदर्शन, हे त्यांचे विशेष गुण म्हणून सांगतां येतील. कुसुममाला, हृदयवीणा, नूपुरझंकार इत्यादि त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. एक टीकाकार म्हणतो त्याप्रमाणे ते त्यांच्या जमान्यांतले साहित्यक्षेत्रांतले अतिरथी होते.

वर्डस्वर्थचे निसर्गवादी अनुयायीहि गुजरातेंत बरेच निर्माण झाले. कलापी या कवीने आपल्या कवितेला खूपच लोकप्रियता मिळवून दिली. सौराष्ट्रांतल्या ‘ लाठी ’ नांवाच्या एका संस्थानाचे ते ठाकोर होते. कलापीचीं सर्व काव्यें ‘ कलापीनो केकारव ’ या पुस्तकांत प्रसिद्ध झालीं आहेत. गुजराती जनता त्यांना ‘ प्रेमाचा कवि ’ म्हणूनच ओळखते. एका काळीं तर ‘ केकारवा’ला ‘ तरुणांची प्रणयगीता ’ असा भाव आला होता. कलापीने गुर्जर रसिकांना भारून टाकलें, वेड लावलें. दलपतराम आणि झवेरजंद मेघाणी यांच्या खेरीज दुसऱ्या कोणत्याहि अर्वाचीन कवीला कलापीइतकी लोकप्रियता मिळाली नाही. कलापीचें प्रणयकाव्य हें स्वानुभवांतून प्रकटलें आहे. त्याची रमा नांवाची राणी, तिची दासी शोभना आणि स्वतः कलापी या त्रिपुटीच्या मानसमंथ-नांतून कलापीचा काव्यकुंभ वर आला आहे. शोभना दासीला त्याने पुढे आपल्या राज्ञीपदावर चढवलें. दोन्ही राण्यांवर एकाच वेळीं सारखें प्रेम कर-ण्याचा त्याने प्रयत्न केला; पण अखेर तो अयशस्वीच ठरला. कलापीच्या काव्यांत किंवा आयुष्यांत प्रेमकलह आणि प्रेमनिराशा; याशिवाय दुसरें कांही सांपडत नाही तें यामुळेंच ! कलापी हे गज़ला लिहिण्यांतहि मोठे पटाईत होते. ‘ गज़ल ’ हा अरबी शब्द आहे. प्रेमळ आणि काव्यमय भाषेंत बोलणें

असा त्याचा अर्थ आहे. त्याच्या 'आपनी यादी 'च्या गज़लाचा नमुना पाहा–

**ज्यां ज्यां नज़र मारी ठरे**
**यादी भरी त्यां आपनी**
**आंसु महीं ए आंखथी**
**यादी झरे छे आपनी**
**माशुकोना गालनी लाली**
**महीं लाली अने**
**ज्यां ज्यां चमन ज्यां ज्यां गुलो**
**त्यां त्यां निशानी आपनी**
**तारा उपर तारा तणां**
**झूमी रह्यां जे झूमखाँ**
**ते याद आपे आंखने**
**गेबी कचेरी आपनी**
**भूली जवाती छो बधी**
**लाखो किताबो सामटी**
**जोयुं न जोयुं छो बने**
**जो एक यादी आपनी**

'जिथे जिथे माझी दृष्टि जाते, तिथे तिथे मला तुमचें स्मरण होतें. डोळयांतून अश्रू गळत असते, तर त्यांतूनहि तुमचेंच स्मरण झिरपलें असतें. माशुकाच्या गालाच्या लालींतहि मला तुमच्याच स्मरणाची लाली दिसते. जिथे जिथे उद्यानें आणि फुलें आहेत, तिथे तिथे सर्वत्र मला तुमच्या स्मरणाच्या खुणा दिसतात. नभोवितानांत तारकांचे अनेक पुंज पाहतांना माझ्या डोळयांना तुमच्या भव्य–दिव्य दरबाराचें स्मरण होतें. आतापर्यंत वाचलेलीं आणि अभ्यासलेलीं पुस्तकें विसरलीं गेलीं तरी चालतील; पण तुमचें स्मरण मात्र कायम राहायला हवें.'

कलापीप्रमाणेच बालशंकर आणि मणिलाल यांनींहि पर्शियन गजलांचा मोठ्या परिणामकारकपणे उपयोग केला. नंदलालांची कविता लोकगीतांच्या धर्तीवर होती. त्या कवितेनेहि लोकमानसावर प्रभाव गाजवला. आणखी एक

त्या काळांतले प्रथितयश कवि म्हणजे मणिशंकर भट्ट अर्थात् ‘ कांत. ’ या गृहस्थाने सात खंडकाव्यें लिहिलीं आहेत. तसाच दुसरा एक कवि म्हणजे ‘ खबरदार. ’ याचेहि कित्येक काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. कवि नर्मदचें जसें ‘ गरवी गुजरात ’ हें गुर्जर राष्ट्रगीत, तसेंच ‘ खबरदार ’ कवीचें हें दुसरें—

**गुणवंती गुजरात**
**अमारी गुणवंती गुजरात**

गुजरातला तिसरेंहि एक राष्ट्रगीत लाभलें आहे आणि तें महाकवि न्हानालाल यांनी दिलें आहे.

**अमारो गुणियल गुर्जर देश**

गोवर्धनराम त्रिपाठी हा एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीचा महान् गद्यलेखक होय. यांच्या जन्माची शतसांवत्सरी गुजरातेंत १९५५ सालीं सर्वत्र साजरी झाली. ‘ सरस्वतीचंद्र ’ ही त्यांची चार खंडांत विस्तारलेली महाकाव्याच्या तोडीची कादंबरी आहे. भारतीय पुनर्जीवनवादाविषयींची ही सर्वोच्च कलाकृति मानली जाते. ही कादंबरी लिहून पुरी करायला त्यांना श्रीरामाच्या वनवासाइतकीं वर्षें लागलीं. १९०१ सालीं ती पुरी झाली. ते पेशाने वकील होते; पण या महाकृतीच्या छंदापायीं त्यांना वकिलीवर पाणी सोडावें लागलें. ‘ सरस्वतीचंद्रा ’ सारखी कादंबरी गुजराती साहित्यांत अद्यापि निर्माण झालेली नाही. प्रेमभंगावर आधारलेली ही एक अद्भुतरम्य कलाकृति आहे. तिचें थोडक्यांत कथानक श्री. साकरलाल याज्ञिक यांनी पुढील प्रमाणे सांगितलें आहे—

‘ सरस्वतीचंद्र हा या कादंबरीचा नायक. तो तरुण आहे, सुशिक्षित आहे, तसाच धनकनकसंपन्नहि आहे. कुमुदसुंदरी नांवाच्या एका लावण्यवती सुशील कन्येशीं त्याची सोयरीक ठरते; पण कांही कारणामुळे सरस्वतीचंद्र गृहत्याग करून पळून जातो. तें लग्न फिसकटतें. कुमुदसुंदरी प्रमादधन नांवाच्या एका असंस्कृत तरुणाला माळ घालते. त्यानंतर तिला जगरहाटीचे नाना प्रकारचे अनुभव येतात. पुढे तिचा पति मरतो. आणि नंतर ती सुंदरगिरी नांवाच्या एका डोंगरावर जाते. तिथल्या आश्रमांत तिला सरस्वती-

मराठी १२९९६

चंद्र भेटतो. तिथे तीं दोघेंहि आजन्म देशसेवेचें व्रत घेऊन राहतात. कुमुदसुंदरीबरोबर आपण राहतों, म्हणून लोकांनी आपली कूट खाऊं नये, यासाठी सरस्वतीचंद्र, तिची धाकटी बहीण कुसुमसुंदरी हिच्याशीं लग्न करतो.'

ही कादंबरी गुजराती जनतेला फार आवडली. ती तिच्या हृदयालाच जाऊन भिडली. ती केवळ कादंबरीच नाही; तर एका द्रष्ट्या मानस-शास्त्रज्ञाने रचलेला तो एक विश्वकोशच आहे, असा श्री. उमाशंकर जोशी हे तिच्याविषयीं आपला अभिप्राय व्यक्त करतात.

या पुराणतुल्य कादंबरीचा गर्भित आशय म्हणजे राष्ट्रीय सत्त्वाचा शोध हा होय. मराठीच्या तुलनेने बोलायचें, तर श्री. त्रिपाठी हे गुजरातचे प्रा. वामन मल्हार जोशी आहेत. त्यांचीं स्त्रीपात्रें—विशेषतः दुर्दैवी कुमुद, आधुनिक वृत्तीची कुसुम, नटवी अलककिशोरी, गृहिणीधर्माची गुणसुंदरी आणि शांत स्वभावी चंद्रावती, या कादंबरींतल्या स्त्रियांनी सुशिक्षित गुजराती समाजजीव-नावर वज्रलेप ठसा उमटविला आहे. तिचें तंत्र विस्कळित असलें तरी स्वभाव-रेखन कांटेकोर आहे. तिची भाषाशैली आधुनिकांच्या तुलनेने आर्ष वाटते; पण त्या बाबतींत लेखकाला दोष देतां येणार नाही. कारण, त्रिपाठींच्या कालीं गुजराती गद्य बाल्यावस्थेंत होतें. लेखकांना योग्य अर्थवाहक शब्द गुजरातींत सापडले नाहीत, कीं ते सरळ संस्कृताच्या सागराकडे धाव घेत आणि बाण-भट्टाच्या धर्तीवर वाक्यरचना करीत. त्यांच्याच बरोबरीचे कित्येक लेखक रस्किन आणि कार्लाइल यांच्या धर्तीवर लयबद्ध वाक्यरचना करण्याचा बुद्धि-पुरस्सर प्रयत्न करीत. मराठींतहि त्या काळांत असेंच घडलें आहे. निबंध-मालेचा थाट आणि घाटहि असाच विलायती वळणाचा आहे. श्री. विष्णु-शास्त्री चिपळूणकर जॉन्सनच्या शैलीनेच भरदस्त वाक्यें लिहीत.

गुजरातेंत त्रिपाठींचें अनुकरणहि बरेंच झालें. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून कित्येक लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांतून धार्मिक अन् नैतिक उपदे शाची झोड उठवली. समकालीन आणि पुढच्या वाचकवर्गावरहि त्रिपाठींच्या या सरस्वतीचंद्राचा विलक्षण प्रभाव गाजला.


याच काळांतील आणखी एक मोठा कवि म्हणजे नंदलाल. यांनी संस्कृत वृत्तें आणि छंद यांच्या विरुद्ध रणशिंग फुंकून आपल्या कवितेला मुक्तच्छंद

दिला. यांच्या रसवंतींतून अनेक प्रासादिक भावकाव्यें निघालीं आहेत. ते अद्‌भुतरम्यतावादी आहेत. आपल्या काव्यांत ते उत्कंठेचा चरम बिंदु गांठतात.' नरसी आणि मीरा यांच्यानंतर सर्वश्रेष्ठ आणि प्रतिभावान् अशा भावकवीचें नांव सांगायचें, तर तें नंदलालांचेंच सांगावें लागेल. नंदलाल हे दलपतरामांचे सुपुत्र होत. या दोघांहि पिता-पुत्रांनी गुजराती शारदेची ११३ वर्षें सेवा केली. असें उदाहरण अन्यत्र दुर्लभ !

पंडित आणि विचारवंत लेखकांच्या भारदस्त गद्यानंतर श्री. कन्हैयालाल मुन्शी हे आपली रसाळ आणि प्रसन्न लेखणी घेऊन पुढे आले. त्यांनी कादंबरीलेखनासाठी इतिहासाच्या तीर्थांत अवगाहन केलें. त्यांच्यापूर्वी ' कारण घेलो ' ही एकच ऐतिहासिक कादंबरी गुजराती साहित्यांत विलसत होती. पण श्री. मुन्शींनी त्या क्षेत्रांत डोंगराएवढा पराक्रम करून दाखविला. ' वेरनी वसूलात ' ही त्यांची पहिली ऐतिहासिक कादंबरी ' गुजराती ' या साप्ताहिकांत क्रमशः प्रसिद्ध झाली. तिथून पुढे त्यांचें कादंबरीलेखन अव्याहत सुरू झालें, तें आजतागायत चालू आहे. मुन्शींच्या कादंबऱ्यांचा आवांका फार मोठा आहे. त्यांच्या कादंबऱ्यांत इतिहासापेक्षां कल्पकतेलाच अधिक वाव मिळाला आहे. मुन्शी हे गुजरातचे हरीभाऊ आपटे म्हणायला हरकत नाही. अद्‌भुतरम्यता, सौंदर्याची अभिरुचि, उत्कटता आणि मानवी स्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण, या गुणांनी त्यांच्या साहित्यांत अनेक तेजस्वी पात्रांची मालिकाच निर्माण झाली आहे. ते नाटककारहि आहेत. विशेषतः प्रहसनें लिहिण्यांत ते सिद्धहस्त आहेत. त्यांचें प्राचीन आणि मध्ययुगीन कालाचें चित्रण वाचकाच्या मनाला हुरहुर लावतें. वर्तमानकाळाची ते जणूं थट्टाच करतात. उपरोधाचें शस्त्र वर्तमानकाळाच्या बरगडींत खुपसतांना त्यांना विलक्षण आनंद होतो. पण तें कांहींहि असलें, तरी ते गुजरातचे एक महान् कादंबरीकार म्हणून नांवाजले आहेत, यांत शंका नाही.

याच कालखंडाला म. गांधींचें युग असें म्हणतात. १९१४ सालीं गांधीजी भारतांत आले आणि कांही वर्षें अहमदाबादेंत राहिले. ते बॅरिस्टर होते तरी गुजरातींत बोलत आणि गुजरातींतच लिहीत, याचा लोकांना अचंबा वाटे. त्यांनी ' नवजीवन ' नांवाचें एक गुजराती साप्ताहिक जन्माला घातलें. या साप्ताहिकांत गांधीजी पुष्कळसें लिहीत. गांधीयुगांतील मुख्य

साहित्यकार गांधीजी हेच आहेत! बाकी सारी त्यांची प्रभावळ! याच नवजीवनमध्यें बापूजींचे ‘ सत्याचे प्रयोग ’ सुरू झाले. त्यांनीं ‘ हिंद स्वराज्य ’, ‘ दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा इतिहास ’, ‘ आरोग्याची गुरुकिल्ली ’, व ‘ सत्याचे प्रयोग किंवा आत्मकथा ’ हीं पुस्तकें गुजरातींतूनच लिहिलीं.



महात्मा गांधी

‘ मोट हाकणाऱ्या माणसालासुद्धा जें समजूं शकेल, तेंच खरें साहित्य ’ असें गांधीजींचें मत होतें. ही कसोटी त्यांच्या लिखाणालाहि लावतां येते. पंडितयुगांतलें शब्दपांडित्य आणि वाक्यरचनेचा बोजडपणा त्यांच्या लिखाणांत औषधालाहि आढळणार नाही. त्यांची दृष्टि गुजरात किंवा गुजराती वाचक यांच्यापुरतीच मर्यादित नव्हती. सबंध भारत किंवा सगळें जगच डोळ्यांपुढे ठेवून ते लिहीत. त्यांची शैली साधी आहे खरी; पण तींत त्यांच्या हृदयाची श्रीमंती भरून ओसंडत आहे. प्रेम, दया, सचोटी आणि दृढनिश्चय या गुणांचा त्यांच्या वाङ्मयांत ढळढळीत साक्षात्कार घडतो. श्री. साकरलाल यांच्या शब्दांत सांगायचें, तर ‘ त्यांच्या लिखाणांत धर्मप्रेषिताचा आत्मविश्वास दिसून येतो. ’

गांधीजींनी लिहिलेल्या लहानमोठ्या लेखांची संख्या हजारोंनी मोजावी लागेल. लेखांपेक्षांहि त्यांच्या पत्रांची संख्या फार मोठी आहे. ‘ नवजीवन, ’ ‘ यंग इंडिया ’ किंवा ‘ हरिजन बंधु ’ या नियतकालिकांतल्या लेखांपेक्षां या पत्रांची भाषा अधिक सोपी, अधिक स्पष्ट, व अधिक वैयक्तिक आहे. या

पत्रांतून त्यांच्या निर्मळ अंतःकरणाचा ठायीं ठायीं साक्षात्कार घडतो. जीवनाशीं संबद्ध असलेल्या अनेक विषयांवर गांधीजींनी मुक्त हस्ताने लिहिलें आहे. १९२० नंतर गुजरातेंत निर्माण झालेल्या सर्व लहान मोठ्या लेखकांवर गांधीजींच्या विचारसरणीची किंवा तत्त्वज्ञानाची स्पष्ट–अस्पष्ट अशी छाप आहे. आपली वाणी आणि लेखणी यांच्याद्वारें गांधीजींनीं जीवनभर सत्य व अहिंसा यांचेंच स्तोत्र केलें.

त्यांच्या कांही सहकाऱ्यांचेंहि वाङ्मयऋण गुजराती भाषेला कधीहि फेडतां येणार नाहीं. कारण तें फार मोठें आहे. श्री. काकासाहेब कालेलकर हे जन्माने वेळगांवकडचे आणि भाषेने मराठी; पण त्यांनी गुजरात ही आपली कर्मभूमि केली. गुजराती भाषेवर असामान्य प्रभुत्व मिळवून ते लेखनकर्माला प्रवृत्त झाले. गुजराती साहित्यांतले ते एक सिद्धहस्त लेखक आहेत. त्यांची शैली स्वतंत्र आहे, अभिजात आहे. ती भारदस्त आहे, तिला पांडित्याचाहि थोडा वास आहे, तरीहि तिला अपूर्व रमणीयत्व लाभलें आहे. जीवनाला मध्यबिंदु करून त्यांनी धर्म, साहित्य, कला, शिक्षण, राजकारण इत्यादि अनेक प्रश्नांवर आपले सहज-सुंदर विचार मांडले आहेत. निसर्गवर्णनाची एक नवीनच धाटणी त्यांनीं निर्माण केली. संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांतले रस, विदग्ध वृत्तीने त्यांनी चाखले आणि वाचकांना ते अधिक आस्वाद्य करून चाखायला दिले. प्रवास हा त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव. या प्रवासामुळे त्यांची दृष्टि व्यापक आणि अनुभव घेण्याची बुद्धि सूक्ष्म, तरल झाली आहे. ‘ हिमालयनो प्रवास, ’ ‘ स्मरणयात्रा ’ ‘ लोकमाता, ’ ‘ जीवननो आनंद ’ इत्यादि त्यांचीं पुस्तकें रसिकाला एका निराळ्याच रसभूमींत विहार करायला नेतात.

श्री. किशोरीलाल मश्रुवाला हेहि एक यांच युगांतले लेखक होत. ते स्वतंत्र प्रज्ञेचे तत्त्वविवेचक होते. त्यांची भाषाशैली जितकी शुद्ध, तितकीच सरळ आहे. ‘ राम अने कृष्ण, ’ ‘ बुद्ध अने महावीर ’ इत्यादि त्यांचीं पुस्तकें स्वतंत्र दृष्टिकोनांतून लिहिलेलीं आहेत. श्री. महादेवभाई देसाई हे तर गांधीजींचे उजवे हातच! त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. गांधीजींच्या बरोबर तुरुंगांत असतांना त्यांनीं लिहिलेल्या डायऱ्यांचे बरेच भाग प्रसिद्ध झाले आहेत. विशेषतः त्या डायरीचा पहिला भाग तर एक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५४२०२ दि: ...
क्रमांक ... नों दि: १९५५

अजरामर असा दस्तऐवज आहे.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या पादांत 'धूमकेतु' पुढे आले. त्यांचा जमाना असहकारितेच्या युगाचा होता. खेडोपाडीं पसरलेली सामान्य, दलित आणि पीडित अशी जनता, तसेंच उपेक्षित आणि भरडले गेलेले असे हरिजन, यांना त्या काळीं वाङ्मयक्षेत्रांत मानाची जागा मिळूं लागली होती. त्याच वातावरणांत धूमकेतूंची प्रतिभा बहरली. ग्रामीण जीवनावर विशेषतः अस्पृश्यांच्या जीवनावर त्यांनी एकाहून एक सरस अशा कित्येक लघुकथा लिहिल्या. त्यांच्या जोडीचे दुसरे लघुकथा लेखक म्हणजे रामनारायण पाठक! 'द्विरेफनी वातो' या नांवाने त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. गुजराती कथासाहित्यांतले हे धुरंधर लेखक समजले जातात.

१९३० सालीं गांधीजींच्या प्रभावांत वाढलेल्या नव्या पिढीच्या कवींनी स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व यांची गाणीं मुक्त कंठाने गायला सुरुवात केली. प्रा. ठाकोर यांच्या नवीन काव्यतंत्राचा त्यांनीं मागोवा घेतला. त्यांची गद्य-भाषा जोमदार होती व काव्यवाणी नाजूक होती. पुरोगामित्व हा वाद गुजराती साहित्यांत फार लवकर प्रवेशला. ज्या कवींनी झाडूवाल्या स्त्रीवर कविता रचण्यास सुरुवात केली होती, त्यांना हा पुरोगामीवाद पोषक ठरला. या काळांत चंद्र-सूर्य-तारे बिचारे उपेक्षित होऊन काव्याच्या नभांतून बहिष्कृत झाले. त्यांच्याऐवजी आता गिरणीकामगारांची पिळवणूक आणि वेश्यांचें अधःपतित जीवन, यांचा काव्याच्या बाजारांत भाव वधारला. पण १९४० साल उजाडतें न उजाडतें तोंच हें पुरोगामित्व खालीं घसरलें. त्याचा वेगडी रंग उडून गेला. कवींना जणू उपरति झाली आणि ते पुनश्च निर्भेळ सौंदर्यवादाकडे वळले.

याच कालांत अनेक प्रकारें साहित्यनिर्मितीला वसंत ऋतु आला. रमणलाल देसाई, चुनिलाल शहा, गुणवंत राय, मेघाणी, पन्नालाल हे कादंबरीकार, बोकर, पेटलीकर, वगैरे कथाकार, चंद्रवदनसारखा नाटककार, ज्योतिंद्र दवे सारखा विनोदी लेखक, दुर्गेश, चंदावरकर, दलाल यांसारखे एकांकिका-लेखक, पाठक, विजयराय वैद्य, विष्णुप्रसाद त्रिवेदी, आनंदराय रावळ यांसारखे टीकाकार, चंद्रवदन, स्नेहरश्मी, मनसुखलाल, माणेक, देशलजी, परमार इत्यादि कवी, हे सर्व १९४० नंतरचे थोर साहित्यिक होत.

यांच्याच जोडीने श्री. झवेरचंद मेघाणी यांचाहि उल्लेख करायला हवा. त्यांच्याविषयीं चार आदराचे शब्द लिहिणेंहि आवश्यक आहे. कारण ती आसामीच तशी आहे. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या नाटकें आणि काव्येंहि लिहिलीं. पण सौराष्ट्रच्या लोकसाहित्याचा उद्धारक आणि विवेचक म्हणूनच त्यांची ख्याति गायली जाते आणि जाईल. ‘ सौराष्ट्रनी रसधार ’ या नावाने सोरठी प्रेमगाथा आणि वीरगाथा यांचे पांच संग्रह त्यांनी प्रकाशित केले आहेत. सोरठी संतांच्या लोककथाहि त्यांनी उजेडांत आणल्या आहेत. ते ग्रामजनांत रमले. रंगले. ते त्यांच्या मुक्त हास्याने हसले अन् त्यांच्या सुख-दुःखाने द्रवले.

ते भावनगरमध्ये जन्मले अन् डोंगरदऱ्यांत वाढले. बी. ए. झाल्यावर कलकत्त्याच्या एका कारखान्यांत नोकरीला गेले. तिथे गुरुदेव रवींद्रांच्या काव्याने प्रभावित झाले. तिथेच त्यांना साहित्याची प्रेरणा मिळाली. १९३० सालच्या सत्याग्रहांत ते बंदिवान् झाले. वॉरंट होतें कोण्या जोधाणी नावाच्या माणसासाठी. पण जोधाणीच्या ऐवजी पोलिसने वाचलें मेघाणी अन् यांच्या हातांत हातकड्या घातल्या. ही पोलिसखात्याची घोडचूक आहे, हें त्यांनी साधार सप्रमाण सांगितलें, तरी कोर्टाने त्यांचें ऐकलें नाही. ते जेलखान्यांत प्रविष्ट होतां होतां काव्यवाणीने बोलले—

**हजारो वर्षनी जूनी अमारी वेदनाओ**
**कलेजा चीरती कंपावती अम भय कथा ओ**

त्यांची ही आर्त रसवंती ऐकतांना मॅजिस्ट्रेटच्या डोळयांत सुद्धा पाणी आलें असें सांगतात.

लोकजीवन आणि लोकसाहित्य यांचा उपासक असलेल्या या राष्ट्रीय कवीला त्यांच्या वाङ्मयतपस्येने गुजराती साहित्यांत मानाचें स्थान मिळालें आहे.

श्री. उमाशंकर जोशी हे महाराष्ट्राला अधिक परिचित असलेले कवि अन् नाटककार आहेत. ‘ सापना भारा ’ ही त्यांची लोकप्रिय नाटिका होय. ते कवि म्हणून विशेष प्रसिद्ध आहेत. ‘ गंगोत्री ’ ‘ निशीथ ,’ ‘ आतिथ्य ’ इत्यादि यांचे काव्यसंग्रह आहेत. त्यांचें व्यक्तिमत्त्व सौम्य , अन् शीतल आहे. ते हृदयाने कवि अन् बुद्धीने तत्त्वज्ञ आहेत.

१९४७ सालीं भारताचें स्वातंत्र्य आलें. जें अभीप्सित तें पूर्ण झालें. स्वातंत्र्योत्तर काळांत देशामध्ये अनेक नवनवीन उद्योगक्षेत्रें निर्माण झालीं. खरें म्हणजे या काळांत निर्माण झालेलें साहित्य प्रेरक, स्फूर्तिप्रद नि आत्मविश्वासाने रसरसलेलें असें असायला हवें होतें. पण तसें घडलें नाही. जें घडलें तें याच्या उलटच घडलें. महाराष्ट्रांत तसेंच गुजरातेंतहि ! विफलता, भग्नता, क्षुद्रता, नीरसता या कृष्णवर्णी आकाबाईनी साहित्यिकांच्या हृदयांत नवें ठाणें वसवलें. विशेषत: तरुणवर्गांत ही लागण अधिक प्रमाणांत झाली, हें आश्चर्य म्हटलें पाहिजे. गुजरातहि या सांथींतून सुटला नाही. पण हा विफलतावाद गुजरातेंतून आता हळूहळू ओसरूं लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत. कारण राजेंद्र शहा, निरंजन भगत अशांसारखे मनोरथांचे रहंवर कवी आता गुजरातच्या साहित्यक्षितिजावर चढत आहेत.



# गर्बा आणि रास

नंदाच्या घरीं नवलाख गायी दुभत आहेत.
दही घुसळण्याचा आवाज उठत आहे.
सातां समुद्राचा डेरा
मेरु पर्वताची रवी
नवकुलांच्या नागांची दोरी
पूर्णचंद्राचें निवणें
दोरीचा एक पदर ओढतो सांवळा कृष्ण
दुसरा पदर ओढते गोरी राधा
हळू ओढ माझ्या छबुल्या
दह्याचा डेरा फुटेल
ओहोळ वाहतील, तुषार उडतील
माझी नवरंग चुनडी भिजेल !

कृष्णाला राग येतो. राधेने आपल्याला ‘ हळू ओढ ’ म्हणावें म्हणजे काय ? रागाने तो वृंदावनांत जाऊन बसतो. मग सोळाशे गोपिका एकत्र जमतात. कृष्णाला समजावून आणण्यासाठी वृंदावनांत निघतात.

'हे कृष्णा, असा कसा रे तूं नटखट? सोड हा रुसवा अन् चल गोकुळांत.'

गोपींच्या मनधरणीने कृष्णकन्हैया खुलतो आणि त्यामुळे गोपींना महासुख लाभतें.

एका गुजराती गीताचा हा अनुवाद आहे. गुर्जरी स्त्रियांचें हें लाडकें गीत आहे. युगयुगांतरें लोटलीं, तरी अजून त्यांचा कृष्ण रुसतोच आहे आणि गोपी त्याच्या समजावणीसाठी शरदांतल्या चांदण्या रात्रीं वृंदावनांत जातच आहेत. गुजरातेंत कुठेहि चला; हें दृश्य तुम्हांला दिसेल, हे स्वर तुमच्या कानीं पडतील.



गरबा नृत्य

शरदागम झाला, नवरात्रांचा घट बसला, की गुर्जर नारींच्या ओठांत गीतांचे शब्द जमूं लागतात. पायांत नृत्याची लचक भरते. हृदयांत नवा रसमय प्राण जागा होतो. तिन्हीसांजा केव्हा होतील, चांदण्या केव्हा उगवतील, रात्र केव्हा पडेल, गल्लींतल्या रस्त्यावर आणि अंगणाअंगणांतून चंद्रिकेचे

घडे केव्हा लवंडतील अन् आपण केव्हा एकदा घराबाहेर पडूं, अशा उत्कंठेंत त्या दिवसाचे चार प्रहर कसे तरी घालवतात.

कुठल्याहि गल्लींत पाहा; सामान्यतः एकच दृश्य दिसतें. चांदण्यांत पंधरावीस बायकांनी मिळून फेर धरला आहे. त्यांत तरण्या पोरी आहेत, तशा वृद्धा नारीहि आहेत. टाळीला टाळी मिळत आहे. पावलासंगें पाऊल पडत आहे. कंकणाच्या किणकिणींत पैंजणाची रुमझुम मिसळत आहे. मुखाने गीत चालू आहे. जिला बरेचसें पाठांतर आहे, ती त्या मेळाव्यांतली सरदारीण. प्रत्येक कडव्याचा चरण तिने आधी सांगायचा अन् बाकीच्या सगळ्यांनी आपल्या किन्नर कंठाने त्याची द्विरुक्ति करायची. हळूहळू स्वरांच्या छताखाली नृत्याला लावण्य चढतें. गीतांत जसा भाव असेल, त्याप्रमाणे त्याला गांभीर्य किंवा लालित्य येतें.

एका घटाच्या भोवती हा फेर धरलेला असतो. त्याला पांढरे पट्टे ओढलेले असतात आणि मधून मधून तांबडे ठिपकेहि दिलेले असतात. तो घडा रिकामा नसतो. पाण्यानेहि भरलेला नसतो. त्यांत तेवत असते एक धाकुटी दीपकळी. अशा या सदीप घटाचेंच नांव ' गरबो. ' नवरात्राचा घट तसा गरब्याचाहि घटच. गरबा हें देवी जगदंबेचें प्रतीक. नवरात्र दसऱ्याला संपतें, तर गरबा कोजागरीपर्यंत निनादत राहतो. महाराष्ट्रांतल्या भोंडल्याप्रमाणे गरब्याच्या फेरालाहि खिरापत असतेच. या खिरापतीचें नांव ल्हाणी. बहुधा बत्तासेच वांटतात. या खिरापतीसाठी पैसा खर्च करणें म्हणजे पुण्य जोडणें, अशी तिकडे समजूत आहे. पंधरा दिवस अशा प्रकारें गाणें–नाचणें झाल्यावर पौर्णिमेच्या दिवशीं एखाद्या नदींत अथवा सरोवरांत गरब्याचें विसर्जन होतें.

' दीपगर्भः ' यांतलें पूर्वपद लुप्त होऊन आणि गर्भः याचा अपभ्रंश होऊन गर्बा शब्द बनला आहे. गरबा म्हणजे ज्याच्या आंत दीपज्योत आहे असा घट. हा पांढऱ्या मातीचा घडवतात अन् फूल–पत्रीने सजवतात. त्याला बारीक बारीक छिद्रं असतात आणि त्यांतून त्या अंतर्गत दीपज्योतीचा प्रकाश बाहेर निघत असतो. नवरात्राच्या पहिल्या रात्रीं याची स्थापना करतात. त्याच्यावर दुसरा एक लहान घडा बसवतात. वरच्या घटावर चार वाती चारी बाजूंना तेववतात. त्या चार दिशांच्या प्रतीकरूप असतात.

गरबा हें स्त्रियांच्या सौभाग्याचें तेजागळें प्रतीक आहे. ती कल्याणाची

प्रतिमा आहे. गरब्याची स्थापना झाली, की गुर्जर नारी टाळ्या वाजवीत त्यांच्याभोंवती फेर धरतात. गरब्याचें उत्थापन होईपर्यंत प्रत्येक रात्रीं कमींत कमी पांच गीतें तरी गायलाच हवीं, असा दंडक आहे.

गरबा–गरबी असे त्याचे दोन प्रकार आहेत. दोहोंची देवताहि भिन्न आहे. सामान्यतः गरबी वैष्णवांची अन् गरबा शाक्त–शैवांचा. गरबा हें दुर्गेचें प्रतीक आहे. त्याचीं गीतें अंबाजी, बहुचरा, काली, या दुर्गारूपांच्या स्तवनाचीं असतात. गरबा हा केवळ गुजरातेंतच राहिला नसून, तो माळवा आणि राजस्थान या प्रदेशांतहि पोचला आहे. गरबी हा शब्द १७ व्या शतकांत भाणदास याने वापरला. नरसी महेताचीं पदें गरबी या सदरांत मोडतात. सामान्यतः राधा–कृष्ण हा गरबीच्या गीतांचा विषय असतो. दयाराम या कविश्रेष्ठाने बहुसंख्य गरब्या लिहिल्या आहेत. त्याला ‘ गरबीसम्राट् ’ असेंच म्हणतात.

गरबा–गरबी यांच्या अंतःस्वरूपांत तसाच गानपद्धतींतहि भेद आहे. कित्येक वेळां स्त्री–पुरुष एकत्र जमून सुरांत सूर मिसळून गरबे म्हणतात. गरबा नृत्य गुजरातेंत केवळ बायकाच नाचतात; तर काठेवाडांत तें पुरुषांचें नृत्य आहे. काठेवाडांतला गरबा मर्दानी असतो, तर गुजरातेंतला जनानी असतो.

प्रथम गरब्याची स्थापना, मग त्याचें ध्यान धरतां धरतां भावनांचा उद्रेक होऊन तो गरबा डोक्यावर उचलून घेणें, गरबा मस्तकावर अधिष्ठित झाला, की भावना उचंबळून पदन्यास वेगळ्या प्रकारें पडणें, त्या ठेक्यावर गीताचे चरण स्फुरणें, मग त्याला संगीताची साथ मिळणें, अशा क्रमाने गरबा नृत्याचा विकास झाला आहे.

गरबा हें गुर्जर सौराष्ट्राचें सर्वप्रिय नृत्यगीत आहे. गरबा नृत्य खेड्या-पाड्यांत चालतें, तसेंच तें मोठमोठ्या शहरांतहि मांडलें जातें. समाजाच्या प्रत्येक थरांत गरब्याचीं वेगवेगळीं गाणीं आहेत. शिष्ट समाजानेहि गरब्याचा तिरस्कार केलेला नाही. शाळा आणि महाविद्यालयें यांतल्या समारंभांतूनहि गरब्याचे प्रयोग आवर्जून केले जातात. गरबा हा केवळ गुजरातच्या जिभे-वरच नाही, तो केवळ फेरांतच नाही; तर तो गुजरातच्या जीवनांतच प्रविष्ट झालेला आहे. तो त्यांचा सामूहिक उल्लास आहे. लोकजीवनाचें प्रत्येक अंग

या गीतांतून मुखरित झालें आहे. सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, पौराणिक असे अनेक विषय त्यांत शब्दांचीं लेणीं लेवून झंकारले आहेत. त्यांतून अनुभूतीचे रोखठोक जबाब उमटतात. त्यांतून गुजरातच्या दैनंदिन जीवनांतले संघर्षहि व्यक्त होतात. त्यांच्या स्वरसागरावर उठलेले भावनांचे तरंगहि हृदयावर अमृत सिंचन करतात.

गरबा गीतें विशेषत: स्त्रियाच गातात, त्यामुळे त्यांच्या घर–संसाराला त्यांत प्राधान्य मिळालें असल्यास नवल नाही. स्त्रियांचें मर्म कोणतें असेल, तर तें माहेर ! त्या तिथेच जन्मलेल्या, खेळलेल्या अन् वाढलेल्या असतात. तिथलीच माया ह्यांच्या जिवाला जडलेली असते. पण मग अचानक एक दिवस तें मायेचें माहेर सोडावें लागतें. मुली नव्या घरांत, नव्या माणसांत येऊन पडतात. तिथे नवे लागेबांधे निर्माण होतांना कित्येकदा त्यांना दु:खेंहि सोसावीं लागतात. माहेर जनांत दूर होतें आणि त्यामुळेच मनांत त्याची गोडी वाढते.

**मीठो बरसे मावलडीनो मेह जो**
**न्हाऊं एना झरमर झरना नीरमाँ**
**मीठा मधुने मीठा मेहुला रे तोल**
**एथी मीठो तो मोरी मात रे**
**जननीनो जोड सखि नही जडे रे लोल.**

एक ग्रामकन्या लग्न होऊन सासरीं गेली आहे. बरेच दिवस होऊनहि तिला माहेरचें ‘ मूळ ’ आलें नाही. तिला सर्वांची सय येत आहे. सगळें माहेर डोळ्यापुढे नाचत आहे. तिला वाटतें, की बाप आपल्याला विसरला आणि भाऊ पाठमोरा झाला.

पण एवढ्यांत तिला घोड्यांच्या टापा ऐकूं येतात. एक घोडागाडी तिच्याच दाराशीं येऊन थडकते. तिचा भाऊ खाली उतरतो. तो तिला ‘ मुळारी ’ आलेला असतो. सासू तिला त्याच्यासंगें माहेरीं धाडते. येतांना ती कल्पना करूं लागते. आतां आईच्या प्रेमाचा मधुर पाऊस पडेल. आपण त्यांत न्हाऊन निघूं. घरीं जाऊन ती आईला बिलगते. पण आईला शब्द फुटत नाही. ती मुकेच आशीर्वाद देते. मुलीला अमृताचा आनंद होतो.

आपल्या आईला कोणती उपमा द्यावी, तेंच तिला कळत नाही. तिचा हा संभ्रमच पुढील गीतांत हृदयंगम होऊन उठला आहे—

**धरणी गाती ए हंशे धूजती रे लोल**
**अचला अचूक एक माय रे लोल**
**गंगाना नीर तो बधे घटे रे लोल**
**सरखो ए प्रेमनो प्रवाह रे लोल.**

आईला धरती म्हणावें तर ती एखादे वेळीं भूकंपाने हादरते; पण आई मात्र सदा अविचल! तिला गंगा म्हणावें, तर गंगेला वाढ आहे आणि घटहि आहे. पण आईचा स्नेहप्रवाह मात्र सदा सारखा! ' मेघ वर्षे शिलाधारीं ' हें खरें; पण तो घडीभर. पण आईचा प्रेमपर्जन्य बारमहाचा. चंद्रमा चांदणें पसरतो, हें खरें; पण तें केवळ शुक्लपक्षांत ! आईच्या चांदण्याला कधी उदयास्तच नाही.

वरील वर्णनाशीं ज्ञानेश्वरांच्या पुढील पंक्ती ताडून पहा; म्हणजे एका विशिष्ट थरावर पोंचलेलें कविमन कसें एकच झंकार उमटवतें, तें कळून येईल. ज्ञानेश्वर संतांच्याबद्दल म्हणतात--

**तेजें सूर्य तैसे सोज्वळ**
**परि तोहि अस्तवे हें किडाळ**

. . . . . . . . . .

**मेघ उदार परि वोसरे**
**म्हणऊनि उपमेसि न पुरे**

मुलींच्या तोंडून सासरच्या माणसांबद्दल सहसा चांगले उद्गार निघणें कठीण. आपल्याकडच्या मुली झिम्मा–फुगड्या खेळतांना काय म्हणतात तें ऐकलें आहे ना ? 'अस्सं सासर द्वाड बाई कोंडूनी मारीतें ! ' पण गुर्जरकन्या मात्र सासरविषयीं फार चांगलें बोलली आहे. कदाचित् ती धूर्तहि असेल. हो, सासर आता जिवालाच जडलें आहे; मग त्याला कशाला निखंदा !

ती सासूस-साऱ्यांना मंदिरांतल्या देवता म्हणते. मोठा दीर म्हणे आषाढांतला ढग । अर्थात् थोरली जाऊ त्या ढगांतली चमकती बिजली, हें ओघानेच आलें. धाकटा दीर चांफा आणि जाऊ त्याची ' पांखडी.' नणंद म्हणे

बागेंतली वेल. पण नणंदेचा नवरा मात्र त्या बागेंतला वानर. त्या बिचाऱ्याने काय पाप केलें असेल देव जाणे ! ती स्वतःला रूपमती समजते, यांतहि कांही वावगें नाही. कारण प्रत्येक स्त्रीला बहुधा तसेंच वाटतें. उरतां उरली एक व्यक्ति. ती म्हणजे तिचा नवरा. पण दुःखाची गोष्ट ही, की तो धन मिळविण्यासाठी समुद्रपार गेलेला असतो. परत येतांना तो वाळलेलें खोबरें आणि खारका आणणार आहे; पण तिने त्या न खाण्याचाच निर्धार केला आहे. दांतांच्या कुंदकळ्या अन् गुलाबी हिरड्या यांना उगाच त्रास कशाला द्यायचा !

ऐतिहासिक गरब्यांमधलें प्रमुख गीत आहे काठेवाडांतल्या 'कुंवरी बा'चें. ही मुलगी लोकोत्तर लावण्यलतिका आहे. भावनगरची ती राजकन्या. तिचा विवाह जामनगरच्या राजकुमाराशीं ठरला. वरपक्षाकडून दहेजाच्या वस्तू जमूं लागल्या. कुंवरीचा हात पाहून तिचें भविष्य वर्तवायला राजज्योतिषी सरसावले. विवाह संस्काराची सिद्धता करण्यासाठी राजपुरोहित जमा झाले. सोनारांनीं कुंवरीच्या हातांतले, गळ्यांतले, माथ्यांतले नकसूद दागिने घडवले. त्यांत जडविण्यासाठी सुरतेहून पाणीदार वाटोळी मोत्यें आणवलीं. सुतारांनी शिशवीचा पलंग बनविला. तांबटांनी नाना प्रकारचीं भांडीं घडवलीं. चाऱ्यांनीं किंमती सणंग आणलें. शिंप्यांनी मोत्यांची जाळी लावलेल्या रेशमी ओढण्या आणि काचोळ्या शिवून तयार केल्या. कुसंबी लोक आले आणि कुंवरीच्या चुनड्या रंगवून गेले.

वाजत गाजत कुंवरीची वरात निघाली. कुंवरीच्या सासरची मंडळी वरातीची मार्गप्रतीक्षा करूं लागली. तिच्या नणंदा, जावा अन् सवतीसुद्धा आपापल्या महालांच्या खिडक्या उघड्या ठेवून वाटेला डोळे लावून बसल्या.

अखेर वरात आली अन् राजवाड्यांत शिरली. कुंवरीला पाहून वडील मंडळीचे डोळे दिपले. त्यांनी तिचें परोपरीने कौतुक केलें. पण दुर्दैव कुंवरीचें ! त्याच राजवाड्यांत तिच्या सवती होत्या आणि त्या विषारी नजरेने तिच्याकडे पाहत होत्या. या लावण्यसरितेला पाहतांच त्यांच्या उरांत आग धडकली. आपला नवरा आता या कोवळ्या रतीच्या मोहजालांत अडकणार आणि आपल्याला कायमचा दुरावणार अशा असूयेने त्यांना घेरलें. तेवढ्या मसलतीपुरत्या त्या सगळ्या एक झाल्या. तात्काळ त्यांनी एक महाभयंकर मनसुबा

रचला. नवी नवरी सासरीं आल्यावर नवी चुनडी तिला ल्यायला द्यायची अशी त्या राजघराण्यांतली प्रथा! तिला अनुसरून सवतीने एक चुनडी पुढे केली. आपल्या लहंग्यावरून कुंवरीने ती ओढून घेतली मात्र; तिच्या तोंडून एकच किंकाळी बाहेर फुटली!

त्या चुनडीच्या पदरात काळा नाग छपवून ठेवलेला होता. त्याने तिला दंश केला. कुंवरि बा धरणीवर पडली, निचेष्ट झाली, संपली. एका निरागस स्वरूपसुंदरीचा केवढा रोमहर्षण हा शेवट! गुजरातच्या स्त्रियांनीच तो गीतांत गुंफला अन् गरब्यांत गायिला. आजहि तो गातांना त्या गुर्जरनारींच्या पापण्या ओलावतात.

गरबागीतांतली दुसरी अशीच करुणोदात्त कथा म्हणजे बलिदानाची. मूळ ऐतिहासिक प्रसंगावर भावना आणि कल्पना यांचें जडित काम करून ती गायली गेली आहे. काठेवाड म्हणजे मरुभूमि! तिथे पाण्याचा सदाच दुष्काळ. गांवात एखादें तळें अथवा विहीर ओली असली, तर गांवकऱ्यांचें नशीब! नाहीतर सगळयाच तिथी निर्जला एकादश्या. वर वर्णिलेली कुंवरि बा ज्या भावनगरांत जन्मली, तिथलीच ही पण कथा आहे. राज्यांत माधव-बाव नांवाची एकच विहीर. तीच सगळयांना 'जीवन' द्यायची. पण कोण्या कोपिष्ट समर्थाचा शाप झाला अन् ती बावडी पार आटली. प्रजेचा जगण्या-मरण्याचा प्रश्न निर्माण झाला. राजाने ताबडतोब ज्योतिषी पाचारले. त्यांनी पंचांग उघडून सांगितलें, 'महाराज. तुमचा मुलगा आणि सून यांचा बळी द्यायला हवा. मग पाणी येईल अन् तें अक्षय होईल!'

राजा होता प्रजापालक. त्याने आपल्या अभयसिंह नांवाच्या मुलाला बोलावून आणून ही गोष्ट सांगितली. विचारणाऱ्याचें धाडस तसें ज्याला विचारलें, त्याचेंहि धाडस! तो मुलगा बळी जायला तयार झाला. रुक्मांग-दाचा पुत्र धर्मांगद हा जसा मोहिनीसाठी आपलें शिरकमल द्यायला सिद्ध झाला, त्याच जातीचा हा राजपुत्र होता. वाघेले वंशांत जन्मलेल्या त्याच्या पत्नीनेहि त्याच्यासंगें मरणाची सिद्धता दर्शवली. जनतेच्या जीवनासाठीं हें तरुण जोडपें स्वतः मरण पत्करायला निघालें. वधूने आपल्या माहेरीं सांगावा पाठवला. तिकडून 'मोडियो' (मुंडावळया) आणि चुनडी मागवली. तिने आपल्या नणंदेला म्हटलें, की 'माझी वेणी घाल नि मला फुलें

माळ.' जावेला म्हटलें, 'कीं माझा शृंगार कर.'

मग ती आपल्या तान्ह्या मुलाजवळ जाऊन म्हणाली. 'आवो मारा दिकरा, शेवटचा पान्हा पिऊन घे.' मुलाला पाजून तिने पाळण्यांत निजवलें. ती सासऱ्याला म्हणाली, की 'आता ढोल, नगारे, झांजा वाजूं देत.' ती जीवनाच्या आसक्तीचे सर्व बंध तोडून मोकळी झाली. सासऱ्याच्या पायां-पडली. सासरा तिला म्हणाला. 'माझ्या घराचं मंगल करणाऱ्या लक्ष्मी, तूं चाललीस; पण आपल्या तान्ह्याला—मानसिंहाला कोणाच्या हातीं निरवलेंस?' आणि तिच्या आधी त्यालाच हुंदका फुटला. त्यावर ती महासाध्वी बोलली. 'मामंजी, मी कशाला त्याची चिंता करूं! आपण समर्थ आहां. माझी देवराणी त्याला दूध पाजील. जेठाणी वाढवील. नणंद खेळवील. तुम्ही शोक करूं नका. तुमचं वात्सल्य अनावर झालं आहे; पण कर्तव्यासाठी त्याला आवर घाला.'

वृद्ध राजाला मुखाने आशीर्वाद उच्चारवला नाही. सून—मुलगा दोघें चालूं लागलीं. माधवबावीकडे पोचलीं. लोकांची गर्दी झाली. अश्रूंचा पाऊस पडला. तीं दोघें हातांत हात घालून विहिरींत उतरूं लागलीं. पहिल्या पायरीवर पाय ठेवतांच सप्त पाताळांतले झरे उमळले. दुसऱ्या पायरीला विहीरीचें बूड भरून गेलें. तिसऱ्या पायरीला कंबरभर पाणी झालें. चौथ्या पायरीला छातीपर्यंत पोंचलें. पांचव्या पायरीला डोक्यावरून गेलें. आतां शेवटचा क्षण आला. त्या उभयतांच्या प्राणांची कासाविशी झाली—

**एक होंकारो द्यो रे अभेसिंग**
**गोझारा पानी कोण पीशे जी रे**
**पीशे ते चारण पीशे ते भाटो**
**पीशे अभेसंगती दादाजी रे**
**एक होंकारो द्यो रे वाघेली वहूं**
**गोझारा पाणी कोण पीशे जी रे**
**पीशे ते वाणिया, पीशे ते ब्राह्मण**
**पीशे बाळु भाना लोकी जी रे**

ती वीरपत्नी आपल्या नवऱ्याला म्हणाली. 'एकच गोष्ट मला सांग.

माझ्या मळवटाच्या कुंकवानं लाल झालेलं हें पाणी कोण पिईल ?' अभयसिंग तिला म्हणाला. 'हें पाणी चारण पितील, भाट पितील, तुझा सासराहि पिईल.' त्याला जणु असें सुचवायचें होतें, की आपलें हें बलिदान वाया जाणार नाही. आपण मरूं; पण भाट–चारणांच्या वीरगाथांतून अमर होऊन देशोदेशीं पसरूं.

मग त्याने तोच प्रश्न तिला विचारला, 'वाघोली वहू! एकच हुंकार दे. एकच उत्तर सांग. हें तुझ्या कुंकवानं लाल झालेलं पाणी कोण पिईल ?' त्यावर तिनें उत्तर केलें. 'हें पाणी वाणी पितील, ब्राह्मण पितील, उच्च-नीच सगळे जनलोक पितील!' आणि शब्द थांबला. दोन लहान जीवनें एका विशाल जीवनांत विरलीं. लोकांनी वांकून त्या माधववावींत पाहिलें. पाणी कसें 'छलछल' लहरत होतें आणि त्यावर चुनडी, मुंडावळ्या आणि एक फेटा एवढ्या वस्तु तरंगत होत्या...

गरबागीतांचे असे हे अनेक विषय आहेत. गरबा डोक्यावर घेऊन ग्राम-कन्या जेव्हां घरोघर हिंडतात, तेव्हा त्याच्यामागून जावें आणि याहून किती तरी ऐकावें. गरबागीतें हीं खरींखुरीं लोकगीतें आहेत. गुर्जरदेशीयांचा फार मोठा उत्साह त्यांत भरून उरला आहे. ब्राह्मण, बनिया, गरासिए, पटेल, कोष्टी, लोहार, सुतार, सर्व जाती आपापल्या परींनी हा गरब्याचा लोकोत्सव साजरा करतात.

## रास

रास अन् गरबा हे दोन शब्द राम–लक्ष्मणांप्रमाणे जोडीने येतात. गुजरात-सौराष्ट्रांत गरब्याबरोबरच रासाचेहि कित्येक प्रकार खेळले जातात. 'रसाना समूहः' म्हणजे नवरसांचा समुदाय आणि 'रसः उत्पद्यते यस्मात्' म्हणजे ज्याच्यापासून रस उत्पन्न होतो तो, अशा रासाच्या दोन व्युत्पत्ति सांगितल्या जातात. रास शब्द प्राचीन संस्कृतांत आहे, तसाच तो अपभ्रंश साहित्यांतहि आहे.

**'रासोत्सवः संप्रवृत्तो गोपीमंडलमंडितः'**

असें भागवताच्या दशमस्कंधांत उल्लेखित असून त्याचा संदर्भ श्रीकृष्णाने

गोपीमंडलांत खेळलेल्या रासाशीं आहे. डॉ. ओझा यांच्या मतें हा शब्द मुळांत प्राकृत आहे. संस्कृताने नंतर त्याला दत्तक घेतलें.

रासक्रीडा हा वृंदावनविहारी मुरलीधर आणि गोकुळांतल्या कृष्णलुब्ध गोपी, यांच्या जीवनांतला एक अमृतमधुर प्रसंग आहे. बिल्वमंगलस्वामीने आपल्या रासाष्टकांत एका अनुप्रासयुक्त श्लोकाने त्याचा थोडा अधिक तपशील दिला आहे–

**अंगनामंगनामंतरे माधवो**
**माधवं माधवं चांतरेणांगना ।**
**इत्थमाकल्पिते मंडले मध्यगः**
**संजगौ वेणुना देवकीनंदनः ॥**

गोपींनी फेर धरला. कृष्णाने आपलीं एकाचीं अनेक रूपें केलीं. दोन गोपींच्या मध्ये एक कृष्ण असें तें महावर्तुळ निर्माण झालें. या वर्तुळाच्या मध्यभागीं उभा राहून मुरली वाजवायला आणखी एक कृष्ण शिल्लक होताच. आणि एवढा सगळा थाट जमल्यावर उत्फुल्ल मल्लिकांच्या सौरभाने धुंद झालेल्या त्या शरदृतूंतल्या चांदण्या रात्री मांडलेला तो रासोत्सव, आरक्त उषेच्या आगमनापर्यंत अविच्छिन्न चालला. गोपींना वाटलें, कीं आपल्या फेरांत सामील होण्यासाठीच जणू ही अनाहूत उषा डाळिंबी वस्त्र नेसून लौकर उगवली.

श्रीकृष्णाने मथुरेला प्रस्थान केलें, तेव्हापासून तो एकदाहि गोकुळाकडे परत वळला नाही. राजकारणाच्या आखाड्यांत उतरून पांडवाचें प्रिय करण्यासाठी त्याने कमरेला शेला आवळला आणि मागचे सारे लागेबांधे तो विसरला. गोकुळांतल्या गोपी त्यामुळे चिरविरहिणी बनल्या. कृष्ण–मनमोहन कृष्ण त्यांच्या जीवनांतून निसटला तो कायमचा. त्यांच्या हृदयसंपुटांत शिल्लक उरली ती त्याच्यासंगें खेळलेल्या रासाची मधुरस्मृति. त्या स्मृतीला आंजारीत गोंजारीत त्यानी आपलें विरहदग्ध जीवन कसें बसें कडेला नेलें.

श्री. मुन्शी यांच्या मतें रास हा प्रथम आभीर समाजांत अवतीर्ण झाला. कारण त्याच्यावर आभीरसंस्कृतीची सुस्पष्ट छाप आहे. हे आभीर एका जमान्यांत गुर्जर-सौराष्ट्राचे शासक होते. त्यांनीच या नृत्याची साधना करून तें धर्मोन्मुख केलें. त्यांच्या संपर्कांत येऊन तिथल्या इतर लोकांनीहि ही

रासशैली आत्मसात् केली. हीच नृत्यशैली पुढे गेय नाट्याच्या रूपानें विकसित होऊन रासक या नांवाने प्रसिद्धि पावली.



रासनृत्य

अपभ्रंश ही आभीरांची प्रिय-भाषा होती. तिला आभीरवाणी असें दुसरें नांव मिळालें आहे, तें त्यासाठीच. पुढे गुर्जर-सौराष्ट्रां-तल्या जैनांनी आपली ग्रंथभाषा म्हणून तिचाच स्वीकार केला. जैनमताच्या प्रसारासाठी त्यांनी या रासपद्धतीचाहि पुरस्कार केला आहे. त्या भाषेचा आणि रास-शैलीचा अवलंब करून त्यांनी समाजाच्या सर्व थरांत जैनमताचा प्रसार केला. त्याद्वारेंच त्यांनी धर्म आणि नीति यांचें जनतेला शिक्षण दिलें. संस्कृत साहित्यांत श्रीकृष्ण हा एकमेव रासाचा नायक असे. जैनांनी त्याच्या जागीं आपले तीर्थंकर आणले. राससाहित्यांत तीर्थंकरांचीं सगुण चरित्रें गायिलीं ज़ाऊं लागलीं. जैनांनी थोडेथोडके नाहीत; तर पांचशेंच्या वर रासग्रंथ रचले आहेत.

या रासनृत्याचे प्रयोग जैनांच्या मठ-मंदिरांतून होत असत. लोक ते प्रयोग पाहण्यासाठी गर्दी करीत. असें कांही काळ चाललें. पुढे पुढे या केवळ धार्मिक रासांना लोक कंटाळले. प्रयोग करणाऱ्यांनीच प्रयोग पाहावा, अशी परिस्थिति निर्माण झाली. जनतेच्या रसलुब्ध अंतःकरणाचें समाधान करण्याचें सामर्थ्य आपल्या रुक्ष, उपदेशपर प्रयोगांत उरलें नाही, हें जेव्हा जैन आचार्यांच्या ध्यानीं आलें, तेव्हा त्यांनी आपलें धोरण बदललें. त्यांचे रास रचणारे कवी मग त्या धर्मगीतांत हळूहळू शृंगाराची मात्रा उगाळूं लागले. शृंगार रसाला तीर्थंकरांचीं चरित्रें अप्रयोज्य आणि अपात्र आहेत, असें समजतांच त्यांना अपरिहार्यपणे गोपी-कृष्णांना शरण जावें लागलें. मग रासाचा नायक वृंदावनविहारी नटखट श्रीकृष्ण हा ठरून गेला. मग त्यांत अधरसुधा दाखल झाली. नखक्षतें झळकूं लागलीं. सुगंधी निःश्वास लहरूं

लागले. कानगोष्टी, कचग्रहण, आराधना, मानमुद्रा हें सारें सारें पुनश्च त्या रासांत प्रविष्ट झालें. पुनश्च तिकडे जनतेचा लोंढा वाहूं लागला. जैनांची अंत:करणें त्या रसरंगांत डुंबून हसू डोलूं लागलीं. कृष्णरासांनी जैनरासांवर अशा प्रकारें मात केली.

एखादा कलाप्रकार अमर्याद झाला, म्हणजे तो भल्याभल्यांच्याहि नैतिक अध:पातला कारणीभूत होतो असें म्हणतात. यांचें उत्तम उदाहरण रासनृत्यांनीं दाखवलें. अश्वजित् आणि पुनर्वसु हे या भागांतले दोन प्रसिद्ध बौद्ध भिक्षू होत. त्यांनी आपल्या वैराग्याची झोळी खुंटीला अडकवली आणि भाड्यांने बायका गोळा करून ते त्यांच्या समागमें रास खेळूं लागले असें विनय-पिटकांत नमूद करून ठेवलें आहे. जैनांच्या बाबतींतहि तोच प्रकार घडला आहे.



हल्लीसक नृत्य


जैनमंदिरांत रासोत्सव सुरू झाला, की श्रावक आणि श्राविका यांची तिथे झुम्मड उडे. मग स्त्री-पुरुषांचें संमिश्र वर्तुळ तयार होई. मग कोणीतरी

रासगीताला प्रारंभ करी. त्याला टाळ्यांची अन् टिपऱ्यांची साथ मिळे. मग तें वर्तुळ मागेपुढे आंदोलनें घेत, तालावर पदविन्यास करीत नाचूं लागे. नाचणाऱ्यांना रात्र किती झाली, त्याचा पत्ता नसे. ती मंडळी देहभान विसरे. एकमेकांच्या हातांत हात गुंतलेले आणि पदोपदीं मादक स्पर्श. त्यामुळे एखादं पाऊल वांकडे किंवा अतिरेकीं पडणेंहि सहज शक्य असे. त्यांतून नैतिक आचरणाला डाग लागण्याचीहि पाळी येई. असे प्रकार अनेकदा आणि अनेक ठिकाणीं घडले. तत्कालीन जैन आचार्यांचे डोळे उघडे होते. त्यामुळे हा प्रकार त्यांच्या दृष्टोत्पत्तीला आल्यावांचून राहिला नाही. त्यांना वाटलें, की 'हा धर्म करितां अधर्म होऊं पाहत आहे. हें बऱ्याचें लक्षण नव्हे.' म्हणून त्यांनी ताबडतोब नियम घातला, की 'रास खेळायचा तर तो दिवसाच खेळायचा; रात्रीं वर्ज्य!' प्रश्नव्याकरणसूत्र या जैन ग्रंथांत तर ब्रह्मचारी जैनाला रासक्रीडा अजिबात निषिद्ध ठरवून टाकली आहे.

हल्लीसक नृत्य हाहि रासाचच एक पोटभेद आहे. रासांत स्त्री–पुरुष समान असतात, तर हल्लीसकांत स्त्रियांची संख्या अधिक असते. या हल्लीसकाची परंपरा शार्ङ्गदेव या संगीतज्ञाने आपल्या 'संगीतरत्नाकर' या ग्रंथांत सांगितली आहे, ती अशी—

शंकराने एकदा संहार तांडव आरंभलें. त्या नृत्याने चौदा भुवनें कंपित झालीं. विश्वाचा जणूं प्रलयकाल ओढवला. आदिमाया पार्वती ही समोर उभी राहून तें तांडव पहात होती. तिला वाटलें, की विश्वसंहार टाळायचा असेल, तर कैलासनाथाचा क्रोध कोणत्या तरी उपायाने शमवलाच पाहिजे. म्हणून मग तिने शिवापुढे एक अभिनव नृत्य सुरू केलें. तें कोमल होतें, मनोज्ञ होतें आणि पार्वतीच्याच प्रतिभेतून तें उगवलें होतें. त्या 'लास्य' नृत्याचे ते मसृण पदविन्यास आणि हावभाव पाहतांच शंकराचा क्रोध हळूहळू ओसरूं लागला. त्यामुळे विश्वसंहाराचें भय टळलें. कालान्तराने हेंच नृत्य पार्वतीने बाणासुराची कन्या उषा हिला शिकविलें. पुढे उषा ही अनिरुद्धाशीं विवाह करून द्वारकेंत आली. तिने मग द्वारकेंतल्या आभीर ललनांना त्या नृत्याचे धडे दिले आणि त्याच स्त्रियांच्या मार्फत तें पुढे साऱ्या सौराष्ट्रांत प्रचलित झालें.

* * *



# धर्म आणि पंथ

भविष्यपुराणांतली गोष्ट आहे. द्वारकाधीश श्रीकृष्णाला अनेक पुत्र झाले. त्यांतल्या एकाचें नांव सांब असें होतें. तो रुक्मिणीच्या उदरीं जन्मला. कुठल्याहि मातेला अभिमान वाटावा, असें त्याचें रूपडें होतें. तो वाढूं लागला, तसतशा त्याच्या सौंदर्याच्या कळाहि वृद्धिंगत झाल्या. त्याच्या देहावर यौवनाची नव्हाळी चढली अन् मग तर तो प्रतिकृष्णच दिसूं लागला. कृष्णाच्या सोळा हजार एकशें आठ स्त्रिया; पण त्या सगळयाच कांही समान शील-संस्कृतीच्या नव्हत्या. श्रीहरीचा अंगसंग लाभूनहि त्यांच्या अंतरांतले विकार परिष्कृत झाले नव्हते. त्यामुळे एक विलक्षण कुजबुज द्वारकेच्या अंत:पुरांत सुरू झाली. कृष्णस्त्रियांपैकी कित्येकींना पतिदेवापेक्षा सांबाचेंच आकर्षण अधिक वाटू लागलें होतें त्या त्याच्याशीं तशा दृष्टीने लाडीगोडी करूं लागल्या होत्या. हें प्रकरण श्रीकृष्णाच्याहि आधी नारदाच्या ध्यानीं आलें. दुसऱ्याचीं वर्मेंशर्में अचूक हेरण्यांत तो सहस्राक्ष होता. त्याने ती गोष्ट कृष्णाच्या कानापर्यंत नेऊन भिडवली. श्रीकृष्ण अंतरीं क्षोभला. त्याने सांबाला समोर बोलावून आणलें आणि एक जबरदस्त शापवाणी उच्चारली.

"सांबा, कारट्या, तुला कुष्ठरोग जडेल !"

दुर्दैव सांबाचें ! अपराध दुसऱ्याचा अन् त्याचें प्रायश्चित्त मात्र त्याला

मिळालें. त्याचें प्रियदर्शन शरीर त्याच क्षणीं डागळलें. पाहताक्षणींच कुणालाहि शिसारी यावी, अशी त्याला अवकळा आली. सांबाचें तें जिवंत मरण होतें. किंबहुना तें मरणाहूनहि अधिक यातनाप्रद होतें. सांब दुःखानें करपला, कोळपला. त्यानें आपल्या पुरोहिताचे पाय धरून त्याला विचारलें.

"हा रोग कसा दूर व्हायचा? का मी जन्मभर असंच डागळून राहायचं?"

त्यावर पुरोहित म्हणाला.

"कुष्ठरोग दूर करणारा एकच एक देव आहे अन् तो म्हणजे सूर्यनारायण! तूं त्याची उपासना कर. त्याच्या कृपेनं तूं निश्चित बरा होशील."

सांब त्या उद्योगाला लागला. त्यानें चंद्रभागा—म्हणजे आजची चिनाब नदी हिच्या तीरीं आपल्या उपासनेसाठी एक सूर्यमंदिर बांधलें. पण त्या नंतर दुसरी अडचण निर्माण झाली. त्या मंदिरांत पुजारी म्हणून काम करायला कोणीहि ब्राह्मण तयार होईना. प्रत्येकजण म्हणे, 'मला सूर्यपूजेची पद्धति ठाऊक नाही. उगाच चुकलं माकलं म्हणजे....?'

खरें म्हणजे भारतीय ब्राह्मणांना सूर्यदेव हा कांही अपरिचित नव्हता. वेदकाळापासून त्याचा महिमा गाजत होता. वैदिक ऋषि त्याचीं सूक्तें उच्चैर्घोषानें गात होते आणि

**हृद्रोगं मम सूर्य हरिमाणं च नाशय।**

'हे सूर्या, तूं माझा हृद्रोग आणि कावीळ नष्ट कर,' म्हणून त्याला प्रार्थीत होते. विश्वामित्राला स्फुरलेला गायत्रीमंत्र तर सूर्याचाच होता. त्या मंत्राला द्विजांच्या त्रिकाळसंध्येंत अग्रस्थान प्राप्त झालें होतें.

पण कालांतरानें या सूर्याचें विष्णुदेवतेंत सात्मीकरण झालें. मुळांत सूर्याच्या असलेल्या कथा विष्णूच्या अंगीं येऊन चिकटल्या. तीन पावलांत त्रिभुवन व्यापणें ही खरें म्हणजे सूर्याची कथा. सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा त्रिकालांत सूर्य त्रिभुवन व्यापतो, हा नित्याचा साक्षात्कार! पण ती कथा 'विष्णूनें तीन पावलांत त्रिभुवन व्यापलें,' अशी त्याच्या वामनावताराच्या खातीं जमा झाली. वेदोत्तर काळांत विष्णूचें महत्त्व जसजसें वाढत गेलें, तसतशी

सूर्योपासना मंद आणि क्षीण होऊं लागली. सूर्याची दखल संध्यावंदन आणि काही विशिष्ट प्रसंग एवढ्यापुरतीच मर्यादित झाली.

वर सांगितलेला सांबाचा प्रसंग हा भारतांत सूर्यपूजेची परंपरा लोप पावली, त्या काळांतला आहे. सांबाने आपल्या पुरोहिताला म्हटलें, की ' कोणी आर्य ब्राह्मण माझ्या सूर्यमंदिरांतलें पुजारीपण पत्करायला तयार होत नाही. तेव्हा आता मी काय करूं ? '

त्यावर पुरोहित बोलला.

" असा हताश होऊं नको. मी ऐकलं आहे, की सूर्यपूजेची पद्धति जाणणारे ब्राह्मण शाकद्वीपांत आहेत. तूं त्यांना इकडे घेऊन ये. ते तुझं काम करतील. "

सांबाने त्याप्रमाणे हालचाली सुरू केल्या. त्याच्या आग्रहावरून यथाकाल शाकद्वीपांतले सूर्यपूजक ब्राह्मण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन उतरले. आजच्या इराणला पूर्वी शाकद्वीप म्हणत. इराणांत सूर्यपूजा पुरातनकालापासून प्रचलित होती. इराणांतला मिथ्र म्हणजे वैदिक मित्रच होता. इराणांत सूर्याला मिहिर असेंहि म्हणत. भारतांतल्या सूर्यनामावळींत तेंहि नांव दाखल आहेच.

इराणांतून आलेल्या त्या ब्राह्मणांना ' मग ' असें नांव होतें. या मगांच्या उत्पत्तीबद्दल एक आख्यायिका आहे. ती त्यांच्या मूलस्थानावर प्रकाश पाडते आणि त्यांचा सूर्याशींहि संबंध दाखवते—


सुजिव्ह नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याचें गोत्र मिहिर होतें. त्याला निक्षुभा नांवाची एक मुलगी होती. तिचें देखणेंपण असामान्य होतें. ती ' पणां 'त आली, तेव्हा सर्वाआधी सूर्यदेव तिच्यावर अनुरक्त झाला. एक दिवस संधि साधून त्याने तिला जवळहि केलें. त्या प्रसंगांत तिला गर्भसंभव झाला. योग्यकालीं ती एका पुत्राला प्रसवली. त्या मुलाचें नांव तिने जरषभ किंवा जरषष्ठ असें ठेवलें. या जरषष्ठाला पुढे जी संतति झाली, ते हे मग ब्राह्मण होत.

हा जरषष्ठ म्हणजे जरथुष्ट्र होय, हें न सांगतांहि समजूं शकेल. इराणचा धर्मसंस्थापक तो हाच !

शक लोक हे सुद्धा इराणीच आहेत. शक आणि मग यांचा शेजारसंबंध आहे. भारतांत शकांचें आगमन वेदोत्तरकाळीं झालें, अशी इतिहासाची


गुजरात
पं. महादेवशास्त्री जोशी

ग्राही आहे. पण त्यांची थोडीबहुत वस्ती भारतांत वेदकालापूर्वींहि असली पाहिजे, असें वेदवाङ्मयावरून अनुमानितां येतें. मग आले ते या शकांचा पालव धरूनच. मगाच्या बरोबरच त्यांची उपासनाहि आली. वैदिक आर्य त्या लोकांना मगंद म्हणत. त्यांची आणि या लोकांची गांठ पडली. तेव्हा आर्यांना वाटलें, कीं या मगंदांची संस्कृति आपल्याहून भिन्न आहे. एका वेळीं विश्वामित्राने इंद्राला प्रार्थिलें आहे, कीं ' हे मगंद तुला पायस देत नाहीत, तर तूं त्यांचें धन लूटून आम्हाला दे. ' मगांची भिन्न संस्कृति ती हीच. ते यज्ञ-धर्मी नव्हते. आणि म्हणूनच इंद्राला हविर्भागहि देत नव्हते.



सूर्यमूर्ति

मग ब्राह्मण भारतांत आले, ते सडेफटिंग होते. त्यांच्याबरोबर कुटुंबकबिला नव्हता. त्यांना इथे स्थायिक करायचें, तर त्यांच्या गृहस्थाश्रमाची सोय करून देणें आवश्यक होतें. दैवयोगाने ती त्यांची सोय झाली. सौराष्ट्रांतल्या भोजांनी आपल्या कन्या त्यांना देऊन त्यांच्याशीं विवाहसंबंध प्रस्थापित केला. हे भोज म्हणजे भोई असावे, असें डॉ. केतकर म्हणतात. मगांची भोजांशीं अशी सोयरिक जमल्यामुळे पुढें 'मग' हें त्यांचें जातिनाम लुप्त होऊन ' भोज ' हें नवें नांव त्यांना मिळालें. तेंच पुढें रूढ झालें. थोड्याच काळांत या मगांचा हिंदुत्वाच्या विशाल उदरांत समावेश झाला.

हिंदूंच्या समाजसंस्थेंत ते ब्राह्मण म्हणून स्थिरपद झाले. आजमितीस जरी ते शाकद्वीपी ब्राह्मण या नांवाने आपली पृथगात्मता दाखवीत असले, तरी ते आता पूर्णतया हिंदुसंस्कारांत दाखल झाले आहेत. याच मगांनी पश्चिम भारतांत सूर्यपूजा प्रचलित केली आणि तिची परंपराहि वाढविली. शक आणि मग हे इराणी असल्यामुळें सूर्याच्या मूर्तिकरणांत इराणी प्रभाव स्पष्ट-पणें दिसून येतो. सूर्याच्या मूर्ती भारतांत अनेक ठिकाणीं आढळतात. कांही मूर्ती तर बारा फुटांहूनहि अधिक उंच आहेत. बहुतेक सगळ्या सपरिवार आहेत. अभिलषितार्थचिंतामणींत सूर्यमूर्ति कशी करावी याविषयीं तपशि-लवार सूचना दिल्या आहेत. त्या अशा—

"सात घोड्यांचा एकचक्र रथ. सूर्याचा वर्ण तांबडा. वस्त्रें तांबडीं. पाय कमळावर. दोन हातांत, दोन कमळें. किरीटकुंडलें. विनपायांचा सारथि. ढाल-तलवार घेऊन दोहीं अंगीं उभे असलेले दंड आणि पिंगल हे गण. जवळच लेखणीधारी एक लेखक."

भुमरा येथील सूर्यमूर्तीच्या डोक्यावर शकपद्धतीची टोपी आहे. कमरेला तुमान आणि पायांत बूट आहेत. हासी येथील सूर्यमूर्तीच्या पायांतहि असेच बूट आहेत. हे बूट केवळ पावलांपुरतेच नसतात, तर पोटऱ्यांपर्यंत वर चढलेले दिसतात. सूर्यमूर्तीचें इराणी वळण तें हें. शिव, विष्णु, बुद्ध, स्कंद, गणेश, इत्यादि भारतीय देव हे सदैव अनवाणी असतात. देवमूर्ति या मुख्यत्वें पूजेसाठीं निर्माण केल्या जातात. आणि भारतीय पूजोपासनेंत पादत्राणाला मज्जाव आहे.

मध्ययुगांत म्हणजे विशेषतः बाराव्या शतकापर्यंत भारतांत सूर्योपासना व्यापक प्रमाणांत प्रचलित होती. सूर्याच्या मूर्ती घडत होत्या. मंदिरें उभारलीं जात होतीं. त्यांवर कलाकुसरीचा हात फिरत होता. या पंथाचें तत्त्वज्ञान निर्माण झालें होतें. सृष्टिस्थितिप्रलयंकर या स्वरूपांत देवाधिदेव म्हणून सूर्याची पूजा होत होती. सौरपंथात अनेक उपपंथहि निर्माण झाले होते. गुजरात आणि सौराष्ट्र या दोन्ही प्रदेशांत कितीतरी सूर्यमंदिरें जागोजाग उभारलीं गेलीं होतीं. आजहि तीं दिसतात. त्यांतलीं बहुतेक आजमितीस भग्न आहेत, तर कांही कशीबशीं उपेक्षित अवस्थेंत उभीं आहेत.


सूर्यपूजा ही मुख्यत्वें पापमोचनासाठी केली जाई. सौरसंप्रदायाचे विशिष्ट

नेमधर्मही असत. सांप्रतकाळीं सुद्धा त्यांचे कांही अवशेष गुजरातमध्ये दिसतात. त्या भागांत बरेच लोक सकाळचें दंतधावन झाल्यावर सूर्याला हात जोडतात. कित्येक लोक सूर्यदर्शन झाल्यावांचून अन्नग्रहण करीत नाहीत. सौराष्ट्रामध्ये चातुर्मासांत सूर्यव्रत करतात. ‘ राणादे ’ ही सूर्याची पट्टराणी. गुजरात आणि राजस्थान यांतील जनतेला तिच्याविषयीं फार भक्ति आहे. महाराष्ट्रांतल्या वधू बोहल्यावर चढण्यापूर्वी गौरीहर पुजतात, तशा गुजरातेंतल्या नागर ब्राह्मणांच्या वधू लग्नाआधी सात दिवस सूर्याची पूजा करून त्याच्याकडे वज्रचुडेमंडित सौभाग्य मागतात. गुजरातेंत सूर्याचें नांव घेऊन शपथ वाहण्याचीहि चाल आहे.

शंकराचार्यांना जसा शाक्तांशी सामना द्यावा लागला, तसाच या सौरपंथाचाहि समाचार घ्यावा लागला. शंकराचार्यांच्या काळांत दिवाकर नांवाचा एक सौरपंथी आचार्य होता. तो भाळीं रक्तचंदनाचा चक्राकार टिळा लावी, रक्तवस्त्रें परिधान करी आणि जें जें सूर्याला प्रिय तें तें आचरी. शंकराचार्यांशीं त्याचा अटीतटीचा वाद झाला. आचार्यांनी वादाच्या सरळ सामन्यांत त्याला जिंकलें. पण तेवढ्यामुळे तिथल्या जनतेच्या हृदयसिंहासनावर आरूढ झालेला सूर्यदेव मात्र त्यांना तिथून हालवतां आला नाही. शंकराचार्य त्या देवाचें विसर्जन करूं शकले नाहीत. त्यांनी जी पंचायतनपूजा रूढ केली, तिच्यांत त्यांना सूर्यनारायणाला एक जागा द्यावीच लागली.

गुजरातमधलें कलासंपन्न सूर्यक्षेत्र म्हणजे मोढेरा. हें आजमितीस एक लहानसें खेडें असून उत्तर गुजरातेंत पाटणच्या दक्षिणेस १८ मैलांवर आहे. याच्या कुशींतून पुष्पवती नदी वाहते. तिच्या कांठीं एक टेकडी आहे. गांव वसलें आहे तें या टेकडीच्या अंगावरच. सभोंवती सगळा सपाट प्रदेश. प्राचीन काळीं हें गांव आजच्यासारखें खेडें नसावें; हें तिथे सापडलेल्या अनेक अवशेषांवरून वाटतें. इथे या पुष्पवती नदीच्या कांठीं प्राचीन विटा, कोरीव दगड, नाना प्रकारच्या मूर्ती, भग्न स्तंभ, अशी शिल्पसंपदा जागोजाग विखरून पडली आहे. पण हें गांव म्हणा, नगर म्हणा वसलें केव्हा अन् मोडलें केव्हा, त्याचा इतिहास मात्र अज्ञात आहे. मात्र याची एक आख्यायिका आहे आणि ती थेट पुराणकाळाला जाऊन भिडते. राम-सीतेच्या विवाह प्रसंगीं इथल्या मोढ ब्राह्मणांना हें गांव दान म्हणून मिळालें, असें ते लोक सांग-

तात. कधीकाळीं हें गांव भरभराटींत होतें, याच्या दोनच खुणा आज तिथे दिसतात. एक तिथलें भग्न सूर्यमंदिर अन् दुसरा तिथला तलाव.



सूर्यमंदिर–मोढेरा

इथलें सूर्यमंदिर इ. स. १०२६–२७ मध्ये बांधलें गेलें, असें संशोधकांचें मत आहे. श्री. याज्ञिक सांगतात, की ' अबूच्या पहाडावरील विमलशाहाचें मंदिर, अणहिलवाड पाटण येथील राणीची वाव व मोढेऱ्याचें सूर्यमंदिर हीं तिन्ही समकालीन आहेत. विमलशाहाचें मंदिर आजहि अस्तित्वांत असून त्याचें सौंदर्य आणि कौशल्य जगाचे डोळे दिपवीत आहे. त्यावरून मोढेऱ्याचें सूर्यमंदिर जेव्हा केव्हा अखंडित असेल, तेव्हा त्याची भव्यता आणि कलासमृद्धि किती वैभवशाली असेल, याची कल्पना करतां येते. ' इ. स. १८०९ मध्ये कर्नल मोनियर विलियम्स हा जेव्हा हिंदुस्थानचा सर्व्हेअर जनरल म्हणून मोढेऱ्यास गेला, तेव्हा तो ती भग्न वास्तु पाहूनहि विलक्षण आश्चर्यचकित झाला. त्याने म्हटलें, की ' हें मंदिर हिंदु स्थापत्याच्या श्रेष्ठ नमुन्यापैकी एक आहे. प्राचीन हिंदूंच्या कलात्मक अभिरुचीची आणि कुशल कारागिरीची कल्पना याच्यावरून येऊं शकते. '

या सबंध वास्तूची उभारणी एका उंच चौथऱ्यावर झालेली आहे. गर्भगृह, अंतराळ आणि रंगमंडप असे त्याचे तीन विभाग पडतात. रंगमंड-

पाला हल्ली ' सीतेची चावडी ' म्हणतात. गर्भगृह आणि अंतराळ यांमधून प्रदक्षिणा मार्ग जातो. रंगमंडप हा या मंदिराचा सर्वांत सुंदर भाग होय. त्याचे कोरीव खांब खाली अष्टकोनी आणि वर गोल आहेत. त्यांवर नखशिखान्त कारागिरी आहे. प्रत्येक दोन स्तंभांच्यामध्ये तोरण आहे; त्यामुळे तर त्याचें सौंदर्य अप्रतिम ठरतें. या मंडपावर पूर्वी घुमट होता. तो जर कोसळला नसता, तर या साऱ्या सौंदर्याची दृष्टच काढावी लागली असती. बाकी इथे पडलें झडलें नाही काय ! गाभारा तर सगळाच पडला आहे. त्याच्या भिंती तेवढ्या उभ्या आहेत. त्यांची उंची पाहतां गाभारा दुमजली असावा, अशी जाणीव होते. मुख्य मंदिराच्या सभोंवती कितीतरी लहान-मोठीं मंदिरें असलीं पाहिजेत; पण तींहि आज उभीं नाहींत. त्यांच्या अस्तित्वाची कल्पना करायची ती तिथल्या जीर्ण-शीर्ण अवशेषांवरून.

ज्या सूर्यदेवाच्या मंदिराचें हें वर्णन चाललें आहे, त्याची गर्भगृहांतली मूर्ति तरी कुठे जाग्यावर आहे ! तिचें काय झालें, तें एक तो सर्वसाक्षी सूर्यनारायणच जाणे ! प्राणाविना शरीर आणि मूर्तिविना मंदिर ! काय राम आहे त्या दर्शनांत ! मोढेऱ्याला जाणाऱ्या यात्रिकाच्या मनांत ही भावना उमटल्यावांचून राहत नाही. तिथे शिल्लक उरलें आहे, तें मूर्तीखालचें शिलासन. त्या आसनावर दर्शनी भागांत सूर्याच्या रथाचे सात घोडे कोरलेले दिसतात. मुख्य सूर्यमूर्तीच्या दर्शनाची लालसा आजूबाजूच्या सूर्यमूर्ति पाहूनच तृप्त करावी लागते. या मदिरांत जागोजाग सूर्यमूर्ति आहेत. या मूर्ति चतुर्भुज नसून द्विभुज आहेत. त्या बैठ्या नसून उभ्या आहेत. त्यांच्या शेजारी उषा आणि प्रत्यूषा किंवा संज्ञा आणि वडवा अशा सूर्यपत्न्या आहेत. प्रत्येक मूर्तीच्या पायातळीं सात घोडे मोजून घ्यावे. प्रत्येक मूर्तीच्या पायांत परदेशी पद्धतीचे बूट आहेत आणि त्यांवर पट्टे आहेत.

या मंदिराच्या बांधकामांत चुना कुठेहि वापरलेला नाही. मंडपाच्या भिंतीवरील नक्षीकाम आडव्या रेषेंत आणि शिखरावरील नक्षीकाम उभ्या रेषेंत करून त्यांत वैचित्र्य आणलें आहे. हें मंदिर दिशासाधन करून बांधलेलें आहे. मूर्तीचें मुख थेट पूर्व रेषेवर यावें आणि वसंत आणि शरद् या ऋतूंत विषुववृत्तावर येणाऱ्या सूर्याचे सोनेरी किरण मूर्तीवर पडून मूर्तीसह तो सगळा गाभारा झळाळून निघावा, हा त्याच्यामागे हेतु होता. मंडपाच्या

पूर्वेस एक कुंड आहे, त्याला रामकुंड म्हणतात. त्या मार्गांत थेट पाण्यापर्यंत पायऱ्या बांधल्या आहेत. मार्गांत जागोजागी कोनाडे आहेत आणि त्यांतहि मूर्ती बसवलेल्या आहेत. या सर्व मूर्ती वैष्णव संप्रदायाच्या आहेत.

## बौद्ध धर्म

बौद्ध आणि जैन हे गुजरातेंत सामान्यतः समकालींच प्रविष्ट झालेले दिसतात. सौराष्ट्रांत बौद्ध धर्माचें लोण सम्राट् अशोकाने पोचविलें. गिरनार येथील अशोकाचा शिलालेख हा त्याचा मोठा पुरावा होय. अशोकाने त्या भागांत बौद्ध धर्म प्रविष्ट केला आणि मिलिंदाने तो परिपुष्ट केला. मिलिंद हा बॅक्टेरियाचा ग्रीक राजपुरुष होता. मेनांडर हें त्याचें तद्देशीय नांव होतें. भारतांत आल्यावर हा मेनांडर मिलिंद बनला.

सिकंदराच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याचे तुकडे पडले. त्याच्या ग्रीक सेनाधिकाऱ्यांनी साम्राज्यांतून फुटून आपापलीं वेगवेगळीं राज्यें स्थापलीं. मिलिंद हा अशा फुटीर अधिकाऱ्यापैकीच एक होता. त्याने भारताच्या भूमीवर आपली सत्ता जमवली. तो पराक्रमी पुरुष होता. त्याच्या पराक्रमला यशहि होतें. त्याने आयोध्येला वेढा दिल्याचा उल्लेख पतंजलीच्या महाभाष्यांत आला आहे. ही घटना सनपूर्व १५० च्या सुमाराची आहे. याने तिथून पुढे सौराष्ट्रापर्यंत आपली मजल मारली. भारतांत आल्यावर आपला मूळचा यवनधर्म सोडून तो बौद्ध झाला. नागसेन नांवाच्या एका आचार्याने त्याला धर्मदीक्षा दिली. हें मिलिंदपन्ह या पालिभाषेंतल्या ग्रंथावरून समजतें. तो सक्तीनें नव्हे; तर मनापासून बौद्ध झाला होता. त्याने त्या धर्माच्या प्रसारासाठी बरेच कष्ट घेतले. सौराष्ट्रांतल्या बौद्ध धर्माच्या प्रसाराला त्याच्याकडूनच चालना मिळाली.

बुद्धानंतर १०० वर्षांच्या आंतच त्या धर्मात दोन मोठे तट पडले. 'महायान' या नांवाने फुटलेला गट आपल्या मतानुसार धर्मप्रचाराला निघाला. हे महायानी लोक मूळच्या लोकांना हीनयानी म्हणूं लागले. अशोक आणि मिलिंद हे दोघे हीनयानी होते. त्यामुळे तोच संप्रदाय त्यांच्यामार्फत गुजरातेंत आला. तिथे सापडलेले ताम्रतट, शिलालेख, निरनिराळ्या ठिकाणचीं खोदकामें आणि चिनी यात्रिकांचीं प्रवासवर्णनें, यांवरून ही गोष्ट

कळून येते. सौराष्ट्रांत धर्मप्रसारासाठी एक भिक्षुसंघ कायमचें वास्तव्य करून राहिला होता. वलभी, आनंदपुर, भडोच इत्यादि ठिकाणीं या संघाने पाठशाळाहि चालविल्या होत्या.

इ. स. च्या ५ व्या शतकांत सौराष्ट्रांत एक नवीन राजवंश उदयाला आला. त्याला मैत्रक राजवंश असें नांव आहे. मध्य युगांतल्या प्रमुख आणि वजनदार अशा राजवंशांत मैत्रकांची गणना होते. वलभी ही या मैत्रकांची राजधानी होती. या वंशांत पहिला ध्रुवसेन या नांवाने एक प्रभावशाली पुरुष गाजून गेला. इ. स. ५१९ मध्ये तो वलभीच्या सिंहासनावर आरूढ झाला. त्याने पुढे ३० वर्षें उज्ज्वल वैभवाचें राज्य केलें. ध्रुवसेन हा धर्माने वैष्णव होता; पण त्याच्या कारकीर्दींत वैष्णव धर्मापेक्षांहि बौद्ध धर्माचाच खूप बोलबाला झाला. ‘सर्वधर्मीं समानत्व’ हें ध्रुवसेनाचें नीतितत्त्व होतें. तो मोठा दिलदार पुरुष होता. त्याच्या या औदार्याचा बौद्धांनी भरपूर फायदा घेतला. राज्यांत सर्व ठिकाणीं त्यांना राजाश्रय आणि मानसन्मान मिळूं लागला.

या काळांत हीनयान पंथाचें माहात्म्य संपुष्टांत येऊन महायान पंथ सर्व बाजूंनी उत्कर्ष पावत होता. मैत्रकांच्या राजवटींत सौराष्ट्रामध्ये वाढला, तो हा महायान संप्रदायच होय. सिंहलद्वीपांतून इथे आलेल्या बौद्ध भिक्षूंनी त्या संप्रदायाची वाढ केली, असें म्हणतात. या भिक्षूंनी सौराष्ट्रांत अनेक ग्रामें आणि नगरें निर्मिलीं. जुनागड, तळाजा, साना वगैरे ठिकाणीं तसेंच त्यांच्या आसपास मैत्रकांच्या कालांतल्या बौद्ध मंदिरांचे आणि लेण्यांचे अवशेष आजहि दिसतात.

इ. स. ५३५ मधला ध्रुवसेनाचा एक शिलालेख सांपडला आहे. त्यावरून कळतें, की दुद्दा नांवाची त्याची एक भाची वलभीजवळ विहार बांधून राहिली होती. तिने बौद्धदीक्षा घेतली होती. त्यामुळे ध्रुवसेन त्या धर्माकडे विशेष आत्मीयतेने पाही. त्याच्या भाचीचा एकच नव्हे; तर तसे अनेक विहार त्या काळांत राज्यभर निर्माण झाले. हे सगळे विहार मिळून एक बौद्ध महामंडळ तिथे स्थापन झालें. मैत्रक राजे दरसाल एक महामोक्ष परिषद् भरवीत. या परिषदेसाठी भारताच्या चारी दिशांतून विविध संप्रदायांतले अन् धर्मांतले पंडित तिथे उपस्थित होत. मैत्रक राजे त्या सर्वांचा यथोचित

परामर्श करीत. मैत्रकांचें राज्य होतें, तोवर वलभींतले बौद्धांचें बस्तान ठीक बसलें होतें. पण त्यांचें सिंहासन गडगडलें आणि त्या बरोबरच तिथला बौद्धधर्महि अस्तंगत झाला. गुजरातेंतून बौद्धांना बाहेर घालवण्याचें बरेंचसें श्रेय जैनांना आहे.

## जैन धर्म

सनपूर्व चौथ्या शतकांतच जैन धर्माने गुर्जर-सौराष्ट्रांत पाऊल ठेवलें असें दिसतें. मगधांत त्या काळीं एक दीर्घ अवर्षण पडलें. त्यांतून जीव बचावण्या-साठी भद्रबाहु नांवाचा एक जैन आचार्य आपल्या शिष्यपरिवारासह तिथून बाहेर पडला आणि विंध्य ओलांडून दक्षिणेंत उतरला. त्याच वेळीं जैनांची एक शाखा पश्चिमेकडे वळली. तिने गुजरात आणि सौराष्ट्र या देशांत वस्ती करून तिथे आपला जम बसवला.

वलभी म्हणजे आजचें वडनगर, त्याकाळीं एक नामांकित बंदर होतें. तिथून परदेशांशी व्यापार चालत होता. त्यामुळे शहराची भरभराट होती. चारी दिशांतून तिथे द्रव्याचे ओघ वाहून येत. जैन साधूंनी गुर्जर-सौराष्ट्रां-तली अशीं मोक्याचीं ठिकाणेंच आपल्या धर्मप्रसारासाठी निवडलीं. मगधा-नंतर सौराष्ट्र देश हाच जैन धर्माचा पोशिंदा ठरला. जैन धर्माला त्याच्या जन्मभूमींत जें साधतां आलें नाहीं, तें त्याने सौराष्ट्रांत साधलें.

इ. स. च्या पांचव्या शतकापर्यंत त्यांनीं त्या प्रदेशांत पुष्कळच प्रगति केली. मैत्रकांच्या कारकीर्दींत तर बौद्धांच्या इतकाच त्यांनाहि राजाश्रय लाभला. वलभीचें विद्यापीठ हें बौद्धशासित नसून जैनशासित होतें. नालं-दाच्या बरोबरीने विद्वान् लोक त्याचें नांव घेत. जैनांच्या धार्मिक चळवळीचें तें एक मोठेंच केंद्र होतें.

देवर्धिगणि हा तिथला प्रमुख आचार्य होता. महावीराच्या काळांत आणि त्याच्यापुढे कांही काल जैनांचे धर्मग्रंथ वेदांप्रमाणेच मुखपरंपरेने शिकविले जात. ग्रंथ मुखोद्गत करणें आणि स्वाध्यायाच्या द्वारें ते स्मरणांतच धारण करणें हेंच विहित समजत. धर्मग्रंथांना टांक लावणें, हें पाप मानीत. पण ही मौखिक अध्ययनपरंपरा पुढे हळूहळू खंडित होऊं लागली. आचार्यांना विस्मरणाने ग्रासलें. शिष्यांची धारणा मंदप्रभ झाली. त्यामुळे कित्येक जैन ग्रंथ

लुप्त झाले, कित्येक तुटक झाले. वाङ्मयाच्या या ऱ्हासाबरोबरच जैन धर्माचाहि ऱ्हास होण्याची वेळ आली. जैन विचारवंतांच्यापुढे ही एक समस्या उभी राहिली. मग त्यांनी ठरविलें, की सनातनी दुराग्रहाला भीक न घालतां आपण धर्मग्रंथ लिहून काढायचे. त्यांनी तें काम जारीने सुरूहि केलें. पण सनातनी आचार्यांनी या नव्या सुधारकांविरुद्ध आघाडी उघडली. ते लिखित ग्रंथांना मान्यताच देईनात.

अशा स्थितींत इ. स. ४५४ मध्ये वलभीच्या विद्यापीठांत एक धर्मपरिषद् भरली. देवर्धिगणि हाच तिचा अध्यक्ष होता. त्या परिषदेंत ग्रंथलेखनाचा प्रस्ताव पुढे आला. देवर्धिगणीने त्याचा पुरस्कार करून ठाम सांगितलें, की 'जें वाङ्मय लेखनिविष्ट झालें, तें अपवित्र खास नव्हे. तें पुनीत आहे आणि पुढील पिढ्यांना धर्मज्ञान देण्याच्या कामीं उपयुक्तहि आहे.' तिथे जमलेल्या धर्मपंडितांच्या मनावर देवर्धिगणीच्या या विचारांचा प्रभाव पडला आणि मग त्या परिषदेने ४१ सूत्रें, ३० प्रकीर्णकें, १२ निर्युक्ती आणि १ महाभाष्य अशा एकूण ८४ लिखित ग्रंथांना एकमुखी मान्यता दिली. 'जैन आगमांचें पुस्तकावरोहण' या नांवाने हा प्रसंग जैन साहित्यांत लिहून ठेवलेला आहे. त्या काळीं मगधांत म्हणजे खुद्द स्वतःच्या जन्मभूमींतच जैनधर्म ऱ्हास पावला होता. उत्तर भारतांतहि त्या ग्रहणाचे वेध लागले होते. पण सौराष्ट्राने तो ऱ्हास थांबवला. एका महान् आपत्तींतून जैनधर्माला वांचवण्याचें, त्याला जिता जागता ठेवण्याचें श्रेय वलभीला आणि देवर्धिगणि या महापुरुषाला आहे. इथून जैनांचें अंधकारयुग समाप्त होतें. देवर्धिगणि हा महामहिम आचार्य हा या पुढील प्रकाशयुगाचा अग्रदूत होय !


मैत्रकांच्या कारकीर्दीपर्यंत बौद्ध आणि जैन असे दोन्ही पंथ त्या प्रदेशांत काम करीत होते. त्या दोहोंत वैमनस्यहि भरपूर होतें. जैनांना राजाश्रय मिळतो, याबद्दल बौद्धांना वैषम्य वाटे. जैनांचे मठ आणि अपाश्रय समृद्ध होतात, आपल्यापेक्षा त्यांचाच दबदबा अधिक होतो, हें शल्य बौद्धांच्या हृदयांत सलत होतें. एक दिवस हें कटु वैर निकरावर आलें. कुठल्याहि पंथाचा राजश्रय तोडायचा तर तो पंथ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हीन आहे, निकृष्ट आहे, असें वादविवादाने सिद्ध करणें हा तत्कालीन शिरस्ता होता. म्हणून त्याच कार्या-

साठी वलभींत दोन्ही बाजूंच्या पारंगत पंडितांची वादसभा भरली. त्या सभेंत बौद्धांचा पुढारी कोण होता, तें कळायला मार्ग नाही. जैनांच्या आघाडीवर मात्र मल्ल नांवाचा एक तर्कशास्त्री विराजमान झाला होता हें कळतें. हा दिगंबरांतल्या सेनासंघ शाखेचा असून नवसारीच्या मठाशी संबंधित होता. त्याची वाणी म्हणजे जणू लखलखती तलवार. पांडित्य गाढें आणि कोटिक्रम अद्‌भुत ! त्यामुळे त्या सूर्यापुढे बौद्धांच्या काडवाती पेटल्याच नाहीत. ते त्या वादांत निस्तेज ठरले, पराभूत झाले. या पराभवानंतर त्यांना वलभींत राहणें अशक्य होतें. म्हणून त्यांनी तिथून कायमचा गाशा गुंडाळला.

दहाव्या शतकापासून गुजरातवर सोळंकी राजांचा अंमल सुरू झाला. त्या काळांत जैनांचें चांगलेंच फावलें. पहिला भीमदेव सोळंकी याचा सेनापति विमलशाह हा जैन होता. त्यापुढचा त्या वंशांतला धुरंधुर पुरुष म्हणजे जयसिंह सिद्धराज. तो जरी शैव होता, तरी त्याचे बरेचसे मंत्री जैन होते. त्याच्या साम्राज्य-स्थापनेच्या प्रयत्नांत या जैन मंत्र्यांनीं त्याला मनोभावें मदत केली. त्याचें साम्राज्य वाढावें, त्याबरोबरच आपला धर्महि वरचढ व्हावा, ही त्यांची पोटां-तली इच्छा होती. या इच्छेला खतपाणी घालून पोसणारा जैन आचार्य म्हणजे हेमचंद्रसूरि. हा पुरुष धुंधुक्याचा रहिवासी अन् जातीने मोढ वाणी होता. बाळपणापासूनच त्याची बुद्धि तल्लख होती. ८ व्या वर्षी त्याने जिनदीक्षा घेतली. त्यानंतर प्रगाढ अध्ययन केलें. तो श्वेतांबरपंथी होता. त्या पंथांत तो अग्रगण्य ठरला. जिथें जाईल तिथे त्याचा मानसन्मान होऊं लागला. त्याची विद्या, वाणी आणि वादनिपुणता पाहून लोक त्याला ' कलिकालसर्वज्ञ ' म्हणून भजूं लागले.

इ. स. ११३८ सालीं जयसिंह सिद्धराजाने माळवा जिंकला. विज-याच्या भेरी-दुंदुभी वाजवीत तो आपल्या राजधानीला परत आला, तेव्हा या हेमचंद्राने अनेक विद्वानांच्या समवेत त्याचें स्वागत करून त्याला ' स्वस्ति ' म्हटलें. थोड्याच काळांत त्याला पाटण येथे सिद्धराजाचा आश्रय मिळाला. सिद्धराज त्याला खूप मानी आणि प्रसंगीं त्याची सल्लामसलतहि घेई. सिद्धराज त्याच्या ज्ञानसिद्धीला नमून होता. आणि म्हणूनच त्याचा आदरहि करीत होता. पण पंथाचा अभिमान जबरदस्त असल्यामुळे या ' कलिकालसर्वज्ञा 'ने मात्र आपल्या बुद्धिवैभवाचा उपयोग राज्याची प्रतिष्ठा

वाढविण्याच्या ऐवजीं आपल्या पंथाचीच महती वाढवण्यासाठी केला. गुजरातची राजकीय सत्ता श्वेतांबर जैनांच्या हातीं एकवटून यावी, या एकाच महत्त्वाकांक्षेने तो भारलेला होता.



हेमचंद्रसूरि–जैन चित्रकला

कुमारपाल नांवाचा सिद्धराजाचा एक पुतण्या होता. सिद्धराजाला औरस संतति नव्हती; पण तरीहि आपला पुतण्या राजगादीवर यावा, या गोष्टीला मात्र त्याचा विरोध होता. तो जैनांच्या हातचें बाहुलें बनला आहे आणि ते नाचवतात तसा नाचतो आहे, हें सिद्धराजाला मुळीच मंजूर नव्हतें. हेमचंद्राने त्याबाबत केलेल्या सर्व कारवाया सिद्धराजाने धुडकावून लावल्या होत्या.

पण सिद्धराजाच्या मृत्यूनंतर हेमचंद्राने आपल्या सहकाऱ्यांची मदत घेऊन कुपारपालाला गादीवर आणलेंच. अशा स्थितींत उपकारांनी मिंधा झालेला कुमारपाल सर्वस्वीं हेमचंद्राच्या ताब्यांत गेल्यास नवल नव्हतें. कुमारपालाचा ओढा जैन धर्माकडे होता, हें निश्चित आहे, पण त्याने साक्षात् तो धर्म स्वीकारल्याचा मात्र पुरावा नाही. त्याच्या जैनत्वाची साक्ष देणारा ग्रंथ म्हणजे जयसिंहसूरीचें 'कुमारपालचरित.' पण तो काव्यग्रंथ आहे आणि त्यामुळेच त्याची ऐतिहासिकता संशयास्पद आहे, असें टीका-

कार म्हणतात. एवढी गोष्ट मात्र खरी, की जैनांच्या उपदेशावरून त्याने मांसभक्षण सोडलें, यज्ञांतली पशुहिंसा बंद केली आणि राज्यांतली शिकारहि थांबविली. जैनांच्या पसंतीस उतरेल इतका तो अहिंसक बनला. पण सिद्ध-राजाने प्रचंड पराक्रम करून मिळविलेलें साम्राज्य मात्र त्याला टिकवून धरतां आलें नाही. त्याच्याच कारकीर्दीत तें ऱ्हासोन्मुख झालें.

कुमारपाल आणि हेमचंद्र यांच्या कारकीर्दीत गुजरातमधल्या हिंदूंना फार सोसावें लागलें. हिंदुधर्माचे प्रमुख म्हणजे ब्राह्मण; पण हेमचंद्र त्यांना सदैव पाण्यांत पाही. राज्यकारभारांत मोक्याच्या जागीं सगळे जैन अधिकारी होते, तेहि पक्षपातीपणाने वागत. त्या काळांत मोढेराजवळच्या धर्मारण्यांत वसत असणाऱ्या ब्राह्मणांचा जैनांकडून कसा छळवाद झाला, त्याचें वर्णन स्कंदपुराणांत आलें आहे. तें थोडेंफार अतिशयोक्त असलें, तरी कुमारपालाच्या राजवटींत जैन आणि हिंदू यांचे संबंध सलोख्याचे राहिले नाहीत एवढें त्यावरून निःसंदिग्ध कळतें. श्री. याज्ञिक म्हणतात, की ' त्यानंतर पुष्कळ वर्षेंपर्यंत हिंदु समाज जैनांची असहिष्णु वृत्ति व त्यामुळे झालेला अन्याय विसरूं शकला नाही. '

## लकुलीश–पाशुपत

शैवांमध्ये वीरशैव, काश्मीरी शैव, द्राविड शैव असे अनेक पंथभेद आहेत. पण गुजरातेंत स्थापन झाला आणि वाढला तो मात्र लकुलीशाचा पाशुपत पंथ होय.

लकुलीश हा तसा फार जुना मनुष्य आहे. इ. स. च्या दुसऱ्या शतकांत तो जन्मला. गुजरातच्या लाटमंडळांत कायावरोहण नांवाचें एक गांव होतें. त्याला हल्ली कारवाण म्हणतात. तीच लकुलीशाची जन्मभूमि. शिवपुराणांत कारवाणमाहात्म्य नांवाचें एक प्रकरण आहे. तें केवळ लकुलीशाच्या जन्म-कर्मांच्या प्रशस्तीसाठीच लिहिलेलें आहे.

गुजरात आणि राजस्थान या दोन्ही प्रदेशांत याच्या मूर्ती आढळतात. तसें पाहिलें तर या पंथाचा प्रसार मथुरेपासून तों दक्षिणेस म्हैसूरपर्यंत झाला होता. हा पंथ प्रारंभीं पाशुपत या नांवाने ओळखला जात होता; पण त्या

पंथांत लकुलीशाचें व्यक्तिमत्त्व एवढें प्रभावी ठरलें, की तो पुढे लकुलीशाच्याच नांवाने प्रसिद्ध झाला.

या लकुलीशाच्या मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. विश्वकर्मा-वास्तुशास्त्रांत लकुलीशाचें मूर्तिध्यान पुढीलप्रमाणे सांगितलें आहे–

**लकुलीशं ऊर्ध्वमेढ्रं पद्मासनमुपस्थितम् ।**
**दक्षिणे मातुलिङ्ग च वामे दण्डः प्रकीर्तितः ॥**

मुख्य म्हणजे हा दिगंबर असून पुन्हा ऊर्ध्वलिंग असतो. तो पद्मासनावर बसतो. त्याच्या डाव्या हातांत महाळुंग आणि उजव्या हातांत लाठी असते. लकुट किंवा लकुल म्हणजे सोटा. तेंच लकुलीशाचें बोधचिन्ह होय. महाळुंग आणि ऊर्ध्वमेढ्र हीं दोन्ही शैव चिह्नें आहेत. या चिन्हांवरूनच त्याचा शैवपंथाशीं संबंध निश्चित होतो. याच्या डोक्यावरचे केस विपुल असून ते कुरळे असतात, हें आणखी एक विशिष्ट लक्षण !

लकुलीशाचें पाशुपत मत वैदिकांनी धुत्कारून टाकलें होतें. त्या मताच्या लोकांना ते ‘पापयोनि’ म्हणत आणि त्यांना आपल्या जवळपासहि फिरकूं देत नसत. पण समाजाच्या खालच्या थरांत त्या मताचा बराच प्रसार झाला होता.

लिंगपुराण सांगतें, की लकुलीशाला चार प्रमुख शिष्य होते. कुशिक, गर्ग, मित्र आणि कौरुष्य अशीं त्यांचीं नावें होतीं. या शिष्यांना प्रशिष्यहि बरेच मिळाले. या सर्वांनी अखिल भारतांत हिंडून आपल्या गुरूच्या तत्त्वांचा प्रचार केला. त्यांनी लोकांना आपल्या गुरूच्या मूर्ती बनवून त्यांची उपासना करायला लावलें. हे लोक आपले कान फाडीत, अंगाला भस्म फाशीत, डोक्यावर जटाजूट बांधीत आणि ब्रह्मचर्याने राहत. राजस्थानांत यांनी बरेच मठ आणि मंदिरें उभारलीं. तिथले कांही मठवासी महंत राजगुरुहि बनले.

लकुलीशाच्या गर्ग नामक शिष्याचा वर उल्लेख झालाच आहे. गुजरातमध्ये अनुयायी जोडण्यांत त्याने मोठेंच यश संपादिलें. तो गेला; पण आपली परंपरा मागे ठेवून गेला. गुजरातेंत लकुलीशाचीं जीं मठ–मंदिरें स्थापन झालीं, त्यांचे सर्व महंत गर्गशाखेचे होते. त्यांना गार्ग्य असेंहि म्हणत.

या गर्गापासून पुढे नऊ शतकांपर्यंत प्रस्तुत पंथाचा इतिहास उपलब्ध

नाही. ११ व्या शतकांत सोळंकी राजवट सुरू झाली, तेव्हा पुनश्च त्या पंथाचा उदय झाला. त्या काळांत लकुलीशाच्या उपासनेला जणूं पुनरुज्जीवन मिळालें आणि गुजरातभर त्या पंथाचे मठ उभे झाले. जयसिंह सिद्धराज हा याच मताचा शैव होता. त्याने त्या पंथाच्या प्रचारासाठी बराच हातभार लावला. त्यामुळे गुजरातेंत हा पंथ राजमान्य तर झालाच; शिवाय त्याला लोकमान्यताहि मिळाली.

सिद्धराजाला या मताची दीक्षा आचार्य भावबृहस्पति याने दिली. हा कान्यकुब्ज ब्राह्मण होता. याचा जन्म वाराणसींत झाला. हा विद्याहि तिथेच पढला. याने भारतभर प्रवास करून अनेक राजांना पाशुपत दीक्षा दिली. पुढे मुंबईजवळच्या घारापुरीस येऊन तिथे त्याने पशुपतीच्या कृपेसाठी उग्र तपहि केलें. तिथून पुढे तो अणहिलवाड पाटण येथे जाऊन सिद्धराजाला भेटला. सिद्धराजाने त्याची योग्यता आणि विद्वत्ता पाहून त्याला सोमनाथ देवस्थानाचा परम आचार्य नेमलें.

भावबृहस्पति सोमनाथाला जातांच त्याला ते मंदिर भग्न आढळलें. त्याने लगेच सिद्धराजाला आदेश दिला, की 'महाराजांनी या मंदिराचा त्वरित जीर्णोद्धार करावा.' तदनुसार सिद्धराज त्या कामाला लागला. मोडलेली वास्तु थराथराने उभी होऊं लागली. पण सिद्धराज तें काम पुरें होण्याच्या आंतच स्वर्गवासी झाला. त्याच्या पश्चात् कुमारपालाने तें अर्धवट राहिलेलें काम तडीस नेऊन त्यावर कळस चढवला.

त्यापुढच्या आचार्यांनी सोमनाथपाटण हेंच आपलें मध्यवर्ती केंद्र करून पाशुपतमत वाढीस लावलें. सर्वदर्शनसंग्रह नांवाचा सायणाचार्यांचा एक ग्रंथ आहे. त्या ग्रंथांत सारांशरूपाने या पंथाचें तत्त्वज्ञान ग्रथित झालें आहे. हे लोक जीवमात्राला पशु आणि शिवाला पशुपति मानतात. तिसऱ्या तत्त्वाचें नांव पाश. जीवाला चिकटलेला जन्म मरणाचा बंध म्हणजे पाश होय. या पाशामुळेच जीव हा शिवापासून वेगळा पडतो. पशुपति हा 'स्वतंत्रः कर्ता' आहे. कोणत्याहि साधनावांचून तो हें ब्रह्मांड निर्मितो. विश्वांतल्या समस्त कार्यांचें कारणहि तोच आहे.

या मतांत मुक्ति दोन प्रकारची मानलेली आहे. सर्व दुःखांची आत्यंतिक निवृत्ति हा एक प्रकार आणि पारमैश्वर्यप्राप्ति हा दुसरा प्रकार. दृक्शक्ति

आणि क्रियाशक्ति या दोन शक्तींची सिद्धि म्हणजे पारमैश्वर्य होय. यांच्या आन्हिकांत गूढचर्येला प्राधान्य असतें. शंकराचार्यांनी या मतावर टीका करून त्याची तर्कदुष्टता उघड केली आहे.

## स्वामीनारायण पंथ

गुर्जर-सौराष्ट्रांत आणखी एक पंथ वावरतो त्याचें नांव स्वामीनारायण पंथ होय. नारायण म्हणजे द्वारकाधीश श्रीकृष्ण! या पंथांत त्याचीच उपासना असते. सहजानंदस्वामींनी हा पंथ स्थापला. त्यांचा जन्म इ. स. १७८१ सालीं अयोध्येनजीकच्या छपैया गांवीं झाला. तिथून ते कच्छमध्ये आले आणि भुज येथील रामानंदस्वामींच्या मठांत राहिले. तिथेच त्यांचें अध्ययन झालें. रामानंद हे रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैतमताचे अनुयायी होते. सहजानंदस्वामींनाहि त्याच मताची दीक्षा मिळाली होती.

खरें म्हणजे रामानंदांची गादी यांनीच पुढे चालवायची. पण त्या मठांत सगळीकडे बजबजपुरी माजून राहिली होती. तिथे स्वार्थ आणि दंभ यांना ऊत आला होता. सहजानंदस्वामींना तें रुचलें नाही. त्यांनी ठरवलें, की या जुन्या इमारतीची लिंपण करण्यापेक्षा आपण नवाच पंथ काढलेला बरा!

आणि आश्चर्याची गोष्ट ही, की त्यांनी नव्या पंथाची घोषणा करतांच सूर्याभोंवती ग्रहमंडळ तसें त्यांच्या भोंवती शिष्यमंडळ जमा झालें. केवळ हिंदुच नव्हेत; तर खोजा जमातींतलेहि कित्येक लोक त्यांचे अनुयायी बनले. शिष्य आपल्या गुरूला कोण बनवतील, त्याचा नेम नाही. त्यांनी स्वामींचा अनन्य भक्तिभाव पाहून जनांत प्रसृत केलें, की 'स्वामी हे उद्धवाचे अवतार आहेत.' महाराष्ट्रांत नामदेवालाहि उद्धवाचा अवतार असेंच म्हणतात. गुजरातचे उद्धव सहजानंद स्वामी ठरले. त्यामुळें त्यांच्या पंथाचें दुसरें नांव पडलें तें 'उद्धवपंथ'!

या पंथाचा प्रसार सर्व गुजरातभर तर आहेच, शिवाय खानदेशांतहि त्याचें लोण पोंचलें आहे. भडोचपासून तो कच्छपर्यंत त्यांचीं अनेक ठिकाणीं मंदिरें आहेत. त्या सर्वांत अहमदाबादचें मंदिर प्रमुख समजतात. द्वारका ही त्यांची पंढरी होय. प्रत्येक मंदिरांत एक महंत असतो. त्याची गादी वंश-

परंपरेने चालते. महंत भगवीं वस्त्रें पांघरतात; पण या भगव्या पोषाखाच्या आंत पिवळ्या 'माये'ची ऊब कमी नसते. त्यांच्या मठांना सर्वत्र चांगलीं उत्पन्नें आहेत. महंत जेव्हा संचाराला निघतात, तेव्हा शिष्यांकडून आपली 'भेटपूजा' करून घेतात. शंकराचार्यांच्या पाद्यपूजेसारखाच तो प्रकार असतो. अशा भेटपूजेंत महंतांचे हात चांगलेच ओले होतात.

यांच्या मठांत महिलाशिष्यिणींना मज्जाव नाही; पण त्यांची व्यवस्था मात्र स्वतंत्र असते. त्यांना पुरुष मंडळींत सरमिसळ होऊं देत नाहीत. शक्य तेवढें नैतिक पावित्र्य राखण्याची त्यांची कोशीस असते. त्यांच्यात तसा अभिनिवेशहि खूप आहे. ते आपल्या पंथाच्या लोकांना तेवढे 'सत्संगी' म्हणतात. आणि अन्य सांप्रदायिकांना 'कुसंगी' समजतात.

हा पंथ सर्व जाती-जमातींना खुला आहे. त्यामुळे खालच्या वर्गांत त्याला बरेच अनुयायी लाभले आहेत. तिकडचा गवंडीसमाज याच पंथाचा आहे. त्यामुळे गुजरातेंत त्या लोकांनीं अहमहमिकेने स्वामीनारायणाचीं मंदिरें उभारलीं आहेत. त्यांतलीं गठडा अन् वडताळ या ठिकाणचीं मंदिरें तर विशेषच दर्शनीय आहेत. वढवाण—भावनगर या लोहमार्गावर निंगाळ नांवाचें एक स्टेशन लागतें. तिथून दहा मैलांवर गठडा हें गांव आहे.

इथे दादा खाचर नांवाचा एक भक्त होता. सहजानंदांनी त्याच्या बाजेवर बसून सांप्रदायिक उपदेश केला, म्हणून पुढे त्याच जागीं स्वामीनारायणाचें एक भव्य मंदिर उभारण्यांत आलें. या मंदिराचा विशेष म्हणजे स्वामींनी वापरलेल्या अनेक मौल्यवान् वस्तूंचा तिथे संग्रह करून ठेवलेला आहे. भक्तांना आणि शिष्यांना त्या वस्तूंच्या दर्शनाने साक्षात् स्वामीच भेटल्याचा आनंद होतो.

वडताळ हें गांव आणंदच्या जवळ आहे. त्याला महत्त्व कां, तर तिथली लक्ष्मीनारायणाची मूर्ति खुद्द स्वामींनींच बसवलेली आहे. म्हणून सांप्रत तिच्या शेजारीं स्वामीजींचीहि मूर्ति दिसते. सहजानंद स्वामींच्या अशा कित्येक मूर्ती त्या पंथाच्या मंदिरांतून स्थापलेल्या आढळतात.

सुधासिंधु हा सहजानंदस्वामींचा ग्रंथ. त्यांत शिष्यांना पारमार्थिक उपदेश आहे. त्यांत म्हटलें आहे, कीं भगवंताच्या निर्गुण निराकार स्वरूपांत अखंड चित्तवृत्ति ठेवणें, ही गोष्ट कठिण आहे. त्याऐवजीं भगवंताच्या सगुण-साकार

मूर्तीचा आधार घेणें चांगलें. तिच्यावर चित्त सहजपणें स्थिर होऊं शकेल. भगवन्ममूर्ति ही चिंतामणीसारखी असते म्हणजे ती चिंतावें तें देते.

हे लोक ‘ सर्वाविर्भावकारण अक्षराधिपति पुरुषोत्तमाची ’ उपासना करतात. शिक्षापत्री हा या पंथाचा प्रमाणग्रंथ आहे. हे शिखा—सूत्र धारण करतात. गळयांत तुळशीची माळ घालतात. यांच्यांत संन्यासदीक्षा वर्ज्य असते. हे गोपीवल्लभ श्रीकृष्णाचे उपासक असले, तरी त्यानी आपल्या उपासनापद्धतींत शृंगाराला दूर ठेवलें आहे.

## पारशी धर्म

इ. स. च्या ८ व्या शतकाच्या मध्यावर एक नवा अभारतीय धर्म गुजरातमध्ये अचानक प्रविष्ट झाला. त्याचें नांव झरतुष्ट्री धर्म. पारशी समाजाचा हा धर्म आहे. गुजरातमध्ये पारशांची वस्ती बरीच आहे. भडोच, नवसारी, अंकलेश्वर, बिलिमोरा, गणदेवी हीं शहरें विशेषें करून पारशी वस्तीचीं आहेत. मुंबईतहि या समाजाने आपलें चांगलें बस्तान बसवलें आहे. मुंबईच्या उद्योगक्षेत्रांत ते अग्रेसर आहेत. पारशी माणूस कधीहि भीक मागतांना आढळायचा नाही, अशीं त्यांच्या विषयीं प्रसिद्धि आहे. मुंबईमधले पारशी गुजरातमधूनच खालीं उतरले आहेत.

पारशी याचा अर्थ पर्शियाचा अर्थात् इराणचा रहिवासी. इ. स. च्या सातव्या शतकांत अरबस्तानांत इस्लामचा उदय झाला. थोड्याच कालांत सगळे अरब मुसलमान होऊन इस्लामच्या ध्वजाखालीं आले. लगोलग त्यांनी तलवार उचलली आणि ते सारें जग इस्लाममय करण्याच्या उद्देशाने दिग्विजयाला निघाले. पहिल्या प्रथम अरबांनी इराण पादाक्रात केला. त्यांनी झरतुष्ट्राचा धर्म पाळणाऱ्या इराणवर तलवारीच्या धारेने इस्लाम लादला. जे धर्मांतराला कबूल झाले नाहीत, त्यांचा त्यांनी छळवाद आरंभला. जे बोटचेपे होते, ते ‘ अल्ला हु अकबर ’ म्हणून लगेच मुसलमान बनले. त्यांनी नवा धर्म अंगीकारून वित्त आणि प्राण वांचवले. पण जे कट्टर धर्मनिष्ठ होते, ते आपला धर्म टिकवण्यासाठी घरादाराच्या त्याग करून वनवासी झाले. कितीतरी वर्षे ते असे रानोमाळ भटकले. आपल्या देशांत आपला धर्म पुनरपि प्रस्थापित होईल या, आशेवर त्यांनी खडतर संकटें सोसून आपला पवित्र अग्नि ज्वलंत

ठेवला. पण कालांतराने ती त्यांची अशा मावळली. धर्मत्याग करायचा नसेल तर आता देशत्यागावांचून गत्यंतर नाही, असे जेव्हा त्यांना पक्कें बिंबलें तेव्हा त्यांचा मोवेद ( धर्मगुरु ) त्यांना म्हणाला.

" आता आपण हिंदुस्थानांत जाऊं. तिथेच आपल्या धर्माचें रक्षण होईल "

मग त्या पारशांचा एक संघ आपल्या बायकामुलांसह गलबतावर चढला आणि त्याने तें गलबत हिंदुस्थानच्या दिशेने हाकारलें. त्यांच्या बरोबर पवित्र आतश ( अग्नि ) घेऊन तो मोवेदहि निघाला. काही काळाने त्यांचें गलबत पश्चिम सागराच्या दीव बंदराला लागलें. तिथे त्यांनी एकोणीस वर्षे काढलीं. तिथेहि त्याचा जम बसला नाही. तिथून मग ते संजाणला आले.

त्या काळीं संजाणवर यादव वंशी जदीराणा राज्य करीत होता. पारशांचा तो मोवेद त्या राजापुढे जाऊन उभा राहिला आणि त्याने त्याच्या राजधानींत आसरा मगितला. जदी राण्याने ' विचार करतों अन् सांगतों ' असें म्हटलें. मोवेद परत फिरून आपल्या तळावर आला. पाठोपाठ राजाने त्यांच्याकडे एक दुग्धकलश उपायन म्हणून पाठवला. मोबेद शहाणा होता. त्याला त्या नजराण्यांतला अर्थ कळला. त्याने त्या कलशांतलें थोडेंसें दूध ओतून घेतलें आणि त्यांत तेवढ्याच मापाने साखर टाकली. त्यामुळे कलश भरलेलाच राहिला. तो त्याने जदीराण्याकडे परत पाठवून दिला. राजा पाहतो, तर कलश भरलेला. त्याला वाटलें, कीं कलशांतलें अल्पस्वल्पसुद्धा दूध न स्वीकारतां कलश परत पाठवून या लोकांनी आपला अपमान केला आहे. त्याने त्या मोवेदाला लगोलग बोलावणें धाडलें. तो आला आणि नम्रपणे राजापुढे उभा राहिला. राजाने आपला अपमान मनांत ठेवून ते लोक कुठून आले, कां आले, त्यांचा देव कोणता धर्म कोणता, याविषयीं बारीक चौकशी केली. मोवेद त्या राजाला म्हणाला.

" आम्ही सूर्य, चंद्र, जल, अग्नि या देवतांना भजतों. गायीला पूज्य मानतों. कस्ती ( जानवें ) घालतों. रजस्वलेचा विटाळ पाळतों. तुमच्या धर्माशीं आमचा धर्म मिळता जुळता आहे. आणि म्हणूनच आम्ही तुमच्या आश्रयला आलों आहों. "

त्यावर जदीराण्याने पुन्हा विचारलें.

" तुम्ही आमच्याशीं कसे वागाल ? "

मोवेदाने समोर ठेवलेल्या दुग्धकलशाकडे बोट दाखवून म्हटलें,

" या कलशांतल्या पदार्थासारखे. "

" म्हणजे ? "

" महाराज, त्या कलशांतलें तें दूध आपण चाखून पाहावें. "

राजाने तें दूध चाखलें. तें त्याला गोड लागलें. त्याने पाठवलेल्या दुधांत साखर नव्हती. ती नव्याने त्यांत पडली होती. त्यामुळे राजाच्या मनांतली अपमानाची भावना मावळली. त्याने चेहऱ्यावर खुषी दाखवून त्या वृद्ध मोवेदाकडे पाहिलें. मोवेद म्हणाला.

" महाराज, आम्ही असे वागूं—म्हणजे दुधांत साखर मिसळल्यासारखे. "

जदीराण्याने पुढील अटींवर त्या लोकांना आश्रय देण्याचें अभिवचन दिलें—


संजाणमध्यें चालू असलेली अर्थात् गुजराती भाषा तुम्ही स्वीकारावी. तुमच्या बायकांनी हिंदुपद्धतीचा पोषाख करावा. शस्त्रास्त्रें वापरूं नये. आणि लग्नें लावायचीं, तीं दिवसा न लावतां रात्रीं लावावीं. "

राण्याच्या या अटी मान्य करून पारशी लोकांनी तिथे आपली अग्यारी उभारली आणि तिच्यांत आपल्या आतश बहेरामाची म्हणजे अग्नीची स्थापना केली. ही घटना इ. स. ७७५ सालची आहे.

पारशी लोक तिथून सर्व गुजरातभर पसरले. ते दक्षिणेस ठाणें अन् चेऊल-पर्यंत पोंचले. तेराव्या शतकाच्या अखेरीस अल्लाउद्दिन खिलजीच्या गुजरातवरच्या स्वारींत त्यांना पुनश्च आपला अग्नि घेऊन भरुतच्या डोंगरांत पळावें लागलें. तिथून ते वासंद्याला आणि तिथून नवसारीला आले.

अशा या अस्थिर परिस्थितींत त्यांच्या धर्मज्ञानावर अज्ञानाचें पुट चढलें. त्यांच्या आचार—विचारांतहि शैथिल्य आलें. आपलें मूलस्थान आणि आपला इतिहासहि ते विसरले. कांहींनी इस्लाम धर्म स्वीकारला. कांहीं लोक हिंदुपद्धतीने वागूं लागले. पारशी समाज अशा अवनत अवस्थेस गेला असतां पंधराव्या शतकांत इराणमधून कांही नवे पारशी गुजरातमध्ये आले. त्यांनी या पथभ्रष्ट पारशांना त्यांच्या धर्माची शिकवण देऊन पुनश्च आपल्या धर्मांत स्थिर केलें.

अठराव्या शतकाच्या प्रारंभीं त्यांच्यांत यादवी सुरू झाली. नवसारीचे जुने मोबेद आणि संजाणांतून नवसारीस आलेले नवे मोबेद यांच्यांत संघर्ष माजला. मोठी मारामारी झाली. तिच्यांत काही लोक मेलेसुद्धा. या लढाईत संजाणच्या पारशांचा पराभव झाला. त्यांना नवसारी सोडावी लागली. ते तिथून निघाले ते सुरत, बलसाड करीत, शेवटी उदवाडा येथे येऊन स्थायिक झाले. संजाणचा प्राचीन अग्नि त्यांनी उदवाडा येथेच कायमचा ठेवला.



संजाण येथील अग्निस्तंभ

पारशी लोक हे हरहुन्नरी आहेत. देशांत मद्यबंदी होण्यापूर्वी ताडी-माडीचे मक्ते बहुधा त्यांच्याकडेच असत. मुंबई, नवसारी, अहमदाबाद या

ठिकाणी कित्येक पारशी गिरणीमालक आहेत. त्यांच्यांत बौद्धिक आणि तांत्रिक व्यवसाय करणारेहि पुष्कळच आहेत. कित्येक लोक सरकार-दरबारांत अधिकारीहि झाले आहेत. भारतांत इंग्रजांचें राज्य आलें तेव्हा सर्वांआधी त्यांनी राज्यकर्त्यांची राहणी उचलली. गेल्या शतकांत अनेक पारशी कुटुंबें व्यापारधंद्यांत पुढे आलीं अन् समृद्ध झालीं. टाटा कुटुंब हें त्या सर्वांतलें अग्रगण्य होय. 'भारतीय स्वराज्याचे पितामह' या पदवीने ज्यांना गौरविलें जातें, ते दादाभाई नवरोजी याच पारशी समाजाने भारताला दिले. काँग्रेसच्या संस्थापकांपैकी ते एक होते. तीन वेळां त्यांना काँग्रेसचें अध्यक्षद लाभलें आणि आमरण ते देशाच्या स्वराज्यासाठी अविश्रांत कष्टत राहिले.


पारशांचा धर्म हा जगांतल्या प्राचीन धर्मांपैकी एक आहे. तो झरतुष्ट्र-प्रणीत आहे. माणसाच्या मनांतील सत्प्रवृत्ति आणि असत्प्रवृत्ति या विरोधी द्वंद्वावर हा धर्म आधारलेला आहे. सर्वत्र आढळणाऱ्या या दोन प्रवृत्तींच्या झगड्याला झरतुष्ट्राने वैश्विक रूप दिलें. या धर्माचा नीतिमत्तेवर फार भर आहे. या धर्मांतला सर्वश्रेष्ठ देव अहुरमज्द हा होय. ही ज्ञानाची किंवा प्रकाशाची देवता आहे. याच्या उलट अहरिमन् ही तमाची देवता आहे. जगांत असत्य, दुष्टपणा, पाप, या सर्व वाईट गोष्टी आहेत, हें या धर्माला मान्य आहे. पण त्यांची जबाबदारी अहुरमज्दावर न टाकतां त्याने त्यासाटीं ज्या दुसऱ्या एका तितक्याच प्रबळ प्रतिस्पर्ध्याची कल्पना केली, तो हा अहरिमन् होय.

त्यामुळे पारशांचा धर्म द्वैतवादी बनला आहे. द्वैतभाव हा पारशी तत्त्वज्ञानाचा पाया आहे. जगांत ज्या कांही चांगल्या गोष्टी आहेत, त्या सर्व अहुरमज्द घडवतो आणि अहरिमन् त्या सर्वांचा नाश करतो. देव चिरंतन प्रकाशांत राहतो आणि त्याचा प्रतिस्पर्धी सैतान अंधतमांत वास्तव्य करतो. अवेस्त्याच्या गाथा आणि वेंदिदाद या प्रकरणांत हा द्वैतभाव स्पष्ट केलेला आहे. पण हें द्वैत मात्र शाश्वत नाही. शेवटीं अहुरमज्दाचाच विजय होईल आणि अहरिमन्चा तसाच त्याच्या दुष्ट प्रवृत्तींचाहि समूळ नाश होईल, अशी पारशीधर्माची श्रद्धा आहे. त्यावरून त्या धर्माचा प्रारंभ द्वैतांतून होत असला, तरी त्याची परिसमाप्ति अद्वैतांत होते, असें म्हणतां येईल.

झरतुष्ट्री धर्माचीं प्रमुख तत्त्वें पुढील प्रमाणे आहेत– ( १ ) अहुरमज्द हा सर्वश्रेष्ठ देव असून तो सर्वज्ञ आहे. ( २ ) आत्मा अमर आहे. ( ३

आपले विचार, उच्चार आणि आचार यांना आपणच जबाबदार आहों. (४) 'असद्विचार, अपशब्द आणि कुकर्मे यांचा मी शपथपूर्वक त्याग करतों,' हें या धर्माचें घोषवाक्य आहे. या उच्च नैतिक ध्येयामुळेच या धर्माला प्रतिष्ठा लाभली अन् जगांतल्या धर्मसंस्थापकांत झरतुष्ट्राला मानाचें स्थान प्राप्त झालें.

झरतुष्ट्री धर्मांत अग्निपूजेला विशेष महत्त्व आहे. अग्नीची उपसना करणें आणि त्याच्यामध्ये स्वच्छ इंधन, सुगंधी द्रव्यें आणि डाळिंबाचे हिरवेगार अंकुर घालणें, हें पवित्र कर्तव्य होय, असें अवेस्त्यांत सांगितलें आहे. प्रत्येक गृहस्थाने गृह्याग्नि बाळगला पाहिजे, असा त्या धर्माचा नियम आहे. पारशांनी निरनिराळ्या अग्नींचीं मंदिरें निर्माण केलीं असून, त्या मंदिरांच्या अनुषंगाने त्या समाजांत एक स्वतंत्र उपाध्यायवर्ग निर्माण झाला आहे. या अग्निपूजेंतूनच त्यांचें सर्व कर्मकांड उभें राहिलें आहे.



# स्थलयात्रा

गुजरातच्या यात्रेसाठी मुंबईला पश्चिम रेल्वेची गाडी पकडावी लागते. मुंबईचीं उपनगरें सोडलीं अन् पुढे वसईची खाडी ओलांडली, की एका नव्या प्रदेशांतून आपण जात आहों, याचा प्रत्यय येऊं लागतो. हळूहळू गुजरातच्या खुणा दिसायला लागतात. जमिनीचा पोत बदललेला दिसतो. दुतर्फा बागायतीची हिरवी रचना डोळयांना सुख देऊं लागते. स्टेशनास्टेशनावर गुलाबगेंद, गवती चहाच्या जुड्या, पुदिन्याच्या गड्ड्या, दांतवणाच्या काड्या, गुलाबी लांबट पेरू, ठसठशीत चिकू, या वस्तू विक्रीला येतात. पावसाळा असला तर रेल्वे रस्त्याच्या दोन्हीं अंगीं कोसन्कोस हरिततृणाची मखमल पसरलेली दिसते. गवत हेंच त्या भूमींतलें उत्पन्न. तें घनदाट वाढतें आणि मुंबईतल्या महिषींचें खाद्य बनतें. त्या गवताच्या प्रचंड गंज्या जागोजाग उभ्या झालेल्या दिसतात.

हळूहळू भाषा बदलते. मराठी शब्द अश्रुत होतात. त्यांच्या जागीं घणु, सारुं, ह्यां थीं, त्यां थीं, आगळ, पाछळ असे शब्द कानावर येऊं लागतात. स्त्रियांची वेषभूषाहि बदलते. पुरुषांच्या धोतराचा कासोटा उजव्या बाजूने खोचलेला दिसतो. बायकांचा पदरहि डाव्या खांद्यावरचा उजव्या खांद्यावर चढतो. गुजराती नागरललना पांचवारी पातळ विकच्छ नेसतात.

ग्रामीण बायका कासोट्याचें नेसण नेसतात; पण तें मुंबईच्या कोळिणींहून वेगळें वाटतें. ग्रामीण स्त्रियांच्या पायांत पोकळ पण जाडजूड वाळे हटकून दिसतात. नागरी पोशाखांत सुटाबुटांचें अस्तित्व असलें, तरी त्याला प्राधान्य नसतें. शुभ्र धोतर, त्यावर शुभ्र लांब कोट आणि डोक्याला टोपी, हाच त्यांचा शिष्टसंमत प्रादेशिक पेहेराव आहे. या पोशाखांत गुजराती शेटियाभाटियांची सौम्य, सभ्य अन् सुसंस्कृत अस्मिता उठून दिसते. गुजराती नागर ललना अंगाबांध्याने घवघवीत दिसतात. त्यांच्या मुद्रेवर सुखावलेपणाची कांति तुकतुकते. त्या महालक्ष्मीसारख्या वाटतात.

भारतांतलीं बहुतेक औद्योगिक क्षेत्रें आणि मोठमोठे व्यापारधंदे पोटाळून बसलेला हा समाज. त्याच्यांतल्या लखपतींची संख्या शेकड्यांनी नव्हे; तर सहस्रांनी मोजावी लागेल. नोटा, चेक, हुंड्या ह्यांच्या उलाढालींत आणि संपत्तीच्या संचयांत हे लोक गढलेले दिसतील. नेहमी लाखांच्या अन् कोटींच्या भाषेंत बोलतांना ऐकायला मिळतील. पण इतकें असूनहि एक गोष्ट सहजपणे ध्यानांत येते ती ही, कीं त्यांनी आपलें जीवन लक्ष्मीच्या तिजोरींत बंदिस्त केलेलें नाही. ते लक्ष्मीचे भक्त असले, तरी तिचे गुलाम नाहींत. त्यांना उपभोगाची चव आहे, देण्याघेण्यांतली गोडी आहे, कीर्तीची लालसा आहे, दानांत आनंद आहे आणि जीवनांत रस आहे.

'तुमचा शेजारी तुम्हाला निवडता येत नाही' असा एक वाक्प्रचार आहे. पण तशी संधि मिळाली अन् शेजाऱ्याच्या निवडीबद्दल मला कोणी विचारलें, तर मी बिनदिक्कत सांगेन, की 'मला गुजराती शेजारी द्या.' दुकानांत, कार्यालयांत किंवा पेढीवर बसलेला गुजराती वेगळा असतो आणि तोच कुटुंबांत किंवा शेजारधर्मांत आला, कीं त्याहून निराळा बनतो. गुजराती माणूस बाजारपेठेंत गोड बोलून हसत हसत रुपयाच्या जागीं सव्वा रुपया तुमच्या खिशांतून काढील; पण जेव्हा तो तुमच्या शेजाराला असेल, तेव्हा तुमची सोय पाहील, दुखलें-खुपलें पाहील; किंबहुना तुमच्यासाठी स्वत:ची गैरसोयसुद्धा सोशील.

गुजराती जेवणखाण महाराष्ट्रांतल्या पेक्षा वेगळ्या धर्तीचें आहे, असें तुम्हाला पहिल्याच दिवशी कळून येईल. आलें, मिरची, ओली हळद, पुदिना, या पदार्थांवांचून त्यांची पाकसिद्धि व्हायचीच नाही. 'अळू भाजी

अनुक्र. 33402 ... दि. 21-81.9.1.49 ... क्रमांक 391 ... 77/12 ... 19

निरंतरम्' म्हणून कांही कोकणांतल्याच लोकांना हसायला नको. गुजराती लोकांचेंहि आळवाच्या पानावाचून अडतें. त्याला ते पात्रा म्हणतात. गुजराती सुगरिणी पात्राच्या वड्या तळूनवळून फार खमंग आणि चुरचुरीत बनवितात.

त्यांना नेहमी मसाल्याचा चहा लागतो. चहाच्या पुड्याबरोबर मसाल्याची पुडी विकत घ्यायला ते विसरणार नाहीत. केवळ पत्ती-भुकटीचा चहा त्यांना मंजूर नाही. चहा उकळल्यावर लवंग, वेलची, दालचिनी इ. वस्तूंचा तो चूर्णरूप मसाला त्यांत टाकल्याखेरीज त्यांना चहा प्याल्याचें समाधानच लाभत नाही. पाहुण्याला मिठाई खाऊं घालणें आणि तुपांत भिजवून अन् साखरेंत घोळवून काढणें, हें त्यांचें परमातिथ्य होय. निदानपक्षी भजिया आणि दूधपुरी एवढें तरी पाहुण्याला हमखास मिळायचेंच. पाहुण्यासाठी एवढेंहि जर करता आलें नाही, तर गुजराती गृहिणीला चुटपुट लागून राहते. गुजराती लोक जेवायला बसले, की प्रथम भात न जेवतां रोटल्यांवर हात टाकतात. डाळभात आणि त्यावर तूप हें त्यांच्या भोजनांतलें उत्तरांग असतें. मराठी मध्यमवर्गीय माणसाला शेवटीं ताकभात मिळाला नाहीं, तर त्याला जेवून न जेवल्यासारखें वाटतें. गुजराती माणसाला शेवटचा ताकभातच काय; पण दहीभातसुद्धा मान्य नाही. गुजरात म्हणजे मागूनपुढून घी. 'घीनो लडवा; लडवानुप्पर घी' असा त्यांचा तुपांत वावर असतो. देव जसे आज्यप, तसेच हे गुजराती.

वापीच्या पुढे गेलें, की जागोजाग आमराया दिसूं लागतात. बलसाड हापूस म्हणून आपण जो आंबा खातों, त्याच वृक्षाची ही मोठ्या प्रमाणांत केलेली लागवड आहे. बलसाडचा हा आंबा 'हापूस' हें आपलें गोत्र सांगतो; पण त्याला रत्नागिरीच्या हापूसची सर नाही, हें ज्ञातास्वाद जीभ लगेच सुनावते. मात्र तो आंबा आता कोकणच्या आंब्याचा प्रतिस्पर्धी म्हणून बाजारांत बसूं लागला आहे, हें निस्संशय!

बलसाडच्या अलिकडे पारडी हें स्टेशन लागतें. त्या नांवाचें तिथे एक गांव आहे. गांवाला लागूनच एक जुना पुराणा किल्ला आहे. हें गांव आजमितीस गुजरातमधलें एक महत्त्वाचें संस्कृतिकेंद्र किंवा वेदविद्येचें माहेरघर ठरलें आहे. पं. सातवळेकरांचें 'स्वाध्याय मंडळ' तिथे वैदिक संशोधनाचें आणि विविध प्रकारें वेदरक्षणाचें कार्य करीत आहे. पं. श्रीपाद दामोदर

सातवळेकर म्हणजे आधुनिक युगाचे महर्षिच म्हणायला हवे. त्यांचें वेदाध्ययन सखोल आहे, विवेचक आहे. त्यांना वेदांविषयीं विलक्षण तळमळ आहे. वेदांनाच त्यांनी जणूं आपल्या जीवनाचें अर्घ्य देऊन टाकलें आहे.

पूर्वी त्यांचा हा आश्रम महाराष्ट्रांत औंध संस्थानांत होता. स्वातंत्र्यानंतर संस्थानें विलीन झालीं आणि अनेक दृष्टींनी परिस्थितिहि प्रतिकूल बनली. त्यामुळे सातवळेकरांनी महाराष्ट्राला रामराम करून आपल्या सर्वस्वासह गुजरातचें प्रस्थान काढलें. पारडीला जाऊन त्यांनी आपला नवा मांड मांडला आणि तिथे राहून आपला स्वाध्याययज्ञ चालू केला. स्वाध्याय मंडळासारखी एक संशोधक संस्था आपण महाराष्ट्रांत राखून ठेवूं शकलों नाही, हें आपलें उणेपण आणि गुजरातने त्या संस्थेला आश्रय देऊन तिची अनेकांगी वाढ व्हायला मदत केली, हें गुजरातचें मोठेपण !

आजमितीस पारडीला मोठमोठे यज्ञ होतात, वेदांवरचे ग्रंथ प्रकाशित होतात, संस्कृतच्या परीक्षा घेतल्या जातात, पुरुषार्थ, वैदिकधर्म, वेदसंदेश, अशीं अनुक्रमे मराठी, हिंदी आणि गुजराती मासिकें प्रकाशित होतात आणि इतर अनेक ज्ञानसत्रेंहि चालतात. सातवळेकरांना गुजरातने आता ‘ आपलें ’ म्हटलें आहे अन् गुजरात ज्याला आपला म्हणते, त्याला कांही कमी पडूं देत नाही.

पारडीहून बरेंच पुढे गेल्यावर लागतें भडोच. याचें मूळ नांव भृगुकच्छ म्हणजे किनाऱ्यावरील उंच प्रदेश. हा अर्थ या शहराला लागू पडतो. त्याचेंच पुढे अपभ्रंशाने भरूच झालें. गुजराती लोक त्याला भरूचच म्हणतात.

या शहराला वर्तमानकालीन महत्त्व कमी असलें, तरी पौराणिक अन् ऐतिहासिक महत्त्व फार आहे. बलि नामक असुरराजाची ही राजधानी. इथे त्याने अश्वमेध केल्याचें भागवत सांगतें. वायव्य प्रांतांतून खाली उतरलेल्या गुर्जर जमातीने आपला पहिला राजकीय अंमल बसवला तो इथे. नर्मदा पश्चिम सागराला भेटते, तीहि इथेच. त्यामुळे याला क्षेत्रमाहात्म्यहि लाभलें आहे. असुरांचें पौरोहित्य स्वीकारणारा उशना भार्गव इथेच आश्रम करून राहिला होता. आजहि भडोचमध्ये त्या कुलांतले ब्राह्मण मोठ्या संख्येने आहेत. ‘ भार्गव ब्राह्मण ’ या नांवानेच ते ओळखले जातात.

सातव्या शतकांत युआन च्वांग इथे आला होता. तो सांगतो, की इथे त्या काळीं बौद्धांच्या महायानपंथाचें बरेंच प्रस्थ होतें आणि इथल्या दहां-हून अधिक बौद्ध विहारांत तीनशेंच्या वर बौद्ध भिक्षू राहत होते. जातक-कथांतूनहि वारंवार या शहराचा उल्लेख येतो. कारण तें त्या काळीं पश्चिम सागरावरचें एक प्रख्यात बंदर होतें.

## बडोदें

भडोच सोडल्यावर पुढें लागतें बडोदें. याचें मूळ नांव आहे वटोदर म्हणजे त्या नांवाचें एक क्षेत्र. गुजराती लोक त्याचा थोडा अपभ्रंश करून त्याला वडोदरा म्हणतात. इंग्रजांनी त्याचें केले बरोडा अन् आपण म्हणूं लागलों बडोदा. पण नांवें अनेक असलीं तरी त्या सर्वांचा अर्थ एकच. बडोदें म्हणजे आता विलीन झालेल्या गायकवाडीची राजधानी. गायकवाडी म्हटली, की मुख्यत्वें स्मरण होतें तें श्रीमंत सयाजीराव महाराजांचें ! नुकती नुकतीच त्यांची कारकीर्द होऊन गेली. त्यामुळें त्यांना पाहिलेले, त्यांच्याशीं संबंध आलेले अन् त्यांच्या आठवणी सांगणारे असे कित्येक लोक अजून हयात आहेत. महाराज कसे हिशेबी होते, कसे धूर्त होते, कसे शिस्तवार होते, कसे आपल्या मनाचा कोणालाच थांगपत्ता लागूं देणारे नव्हते, कसे प्रजा-हितदक्ष होते, अशा त्यांच्या कित्येक गोष्टी, सांगणाऱ्याच्या मगदुराप्रमाणे कमी अधिक रसाळपणाने आजहि ऐकायला मिळतात. ते देशांतल्या पेक्षा पर-देशांतच अधिक राहत होते, अशी त्यांची आणखी एक ख्याति. पण परदेशांत ते जें जें काही चांगलें अन् उपयुक्त, पाहत, तें तें आपल्या राज्यांत कसें अमलांत आणतां येईल, याचाच विचार करीत. देहाने परदेशांत पण मनाने आपल्या प्रजेच्या जवळ अशी त्यांची वृत्ति होती.

संस्थान विलीन झालें, सयाजीमहाराजहि कीर्तिशेष झाले, तरी त्यांचा त्या शहरावरून फिरलेला मायाळू हात आजहि दिसून येतो. बडोद्यांतल्या कित्येक चांगल्या गोष्टी आणि चांगल्या प्रथा, यांचे जनक सयाजी महाराजच आहेत. म्हणूनच आजहि तिथले कित्येक लोक असें म्हणतांना ऐकूं येतात, की गुजरातची राज्यकारभाराची राजधानी अहमदाबाद असली, तरी तिची सांस्कृतिक राजधानी बडोदेंच आहे. मराठी माणसाला बडोद्यांत वावरतांना

आपण परप्रांतांत आहों, असें मुळीच वाटत नाही. तिथे मराठी भाषाहि मोठ्या प्रमाणांत चालते.

हें शहर प्रशस्त आहे अन् स्वच्छहि आहे. त्याची भव्यताहि अनेक प्रकारें प्रत्ययाला येते. इथे प्रेक्षणीय इमारती तर पुष्कळच आहेत. केवळ सरकारी राजप्रासादच पाहायचे म्हटलें तरी ते तीन आहेत. लक्ष्मीविलास, मकरपुरा आणि नजरबाग अशीं त्यांचीं नावें आहेत. ते एकमेकांपासून बरेच दूरहि आहेत. हे राजवाडे पाहायला आधी परवाना काढावा लागतो. त्यांतला लक्ष्मीविलास हा राजवाडा सर्वांत प्रेक्षणीय आहे. त्याचें बांधकामहि वेगळ्या धर्तीचें म्हणजे इंडोसारासेनिक पद्धतीचें आहे. त्याच्याभोवती विस्तीर्ण वृक्षराजी आणि मनोहर उद्यान आहे. त्यांतला दरबारमहाल आजमितीस पोरका दिसत असला, तरी संस्थानाच्या काळांत त्याची शान कांही आगळीच असली पाहिजे. या राजवाड्यांत जागोजाग ब्रांझचे पुतळे उभे केलेले आहेत अन् उत्कृष्ट तैलचित्रेंहि टांगलेलीं आहेत.

शहरांत मध्यभागीं ऐसपैस मांडून बसलेला सुरसागर तलाव हें बडोद्याचें एक विलोभनीय सौंदर्यस्थान आहे. तशीच तिथली ती विश्वामित्री नदी. तिला नदी म्हणण्यापेक्षा ओढा म्हणणेंच अधिक साजून दिसेल. पण तिची एका राजधानीशी सोयरीक असल्यामुळे तिला न झेपेल इतकें कलावैभव तिच्या वांट्याला आलें आहे. तिच्या काठचें तें सार्वजनिक उद्यान! दीडशें एकर भूभागावर तें विस्तारलें आहे. बडोद्यांतल्या वस्तुसंग्रहालय, पशुसंग्रहालय आणि चित्रसंग्रहालय या तिन्ही संस्था याच उद्यानांत आहेत. तुम्ही तिथल्या पदार्थ संग्रहालयांत गेलांत, तर तिथे भारतीय कला, संस्कृति आणि लोकजीवन यांचें तुम्हाला एकत्र दर्शन घडेल. त्यांतलीं चित्रकलेचीं दालनें म्हणजे तर कलावंत आणि रसिक यांच्या डोळ्यांना मिष्टान्नाची मेजवानीच! दालनामागून दालनें फिरत राहायचें अन् ' आश्चर्यवत पश्यति ' बघत जायचें! पाश्चात्य आणि भारतीय असे अनेक नामवंत कलाकार तिथे आपापल्या कलाकृतींच्या द्वारें अजरामर होऊन बसले आहेत.

श्री. सयाजीराव महाराजांच्या कारकीर्दीत बडोद्याचें ग्रंथालय ही एक नामांकित संस्था होती. इतकें मोठें, इतकें व्यवस्थित आणि इतकें अद्ययावत् ग्रंथालय भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर दुसरें नाही, अशी त्याची ख्याति

होती. ' यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित् ' असेंच त्याच्याबद्दल म्हटलें जात होतें. पण आता त्याची ती शान अन् तें वैभव घसरण्याच्या पंथाला लागलें आहे. संस्थान विलीन झालें आणि त्या ग्रंथालयाचा पडता काळ सुरू झाला. काळाचा चक्रनेमिक्रम त्यालाहि बाधला.

बडोदें विद्यापीठ हीहि अशीच एक इथली नामवंत संस्था होय. तिथे हस्तलिखित ग्रंथांचा फार मोठा संग्रह आहे. अलिकडे या विद्यापीठाच्या वतीने वाल्मीकि रामायणाची संशोधित प्रत तयार करण्याचें काम सुरू आहे. पुण्याला भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या द्वारें महाभारताची संशोधित शुद्ध प्रत तयार करण्याचें काम ज्या पद्धतीने चालतें, त्याच पद्धतीने बडोदें विद्यापीठाने हें रामयणविषयक कार्य अंगीकारलें आहे.

## पावागड

बडोद्याहून अहमदाबादकडे निघण्यापूर्वी थोडी वांकडी वाट करून पावागडला जाऊन यावें. हा गड बडोद्याच्या पूर्वेस २५ मैलांवर आहे. तिथे जायला बडोद्याहून नियमित बसगाड्या सुटतात. हा गड म्हणजे कांही मोठा उत्तुंग पर्वत नव्हे. आहे आपला एक सामान्य डोंगर. महाराष्ट्रांत असे डोंगर अन् गड शेकड्यांनी मोजतां येतील. पण गुजरातला इतर सर्व संपदा लाभली असली, तरी तिथे डोंगरांचें मात्र दुर्भिक्ष आहे. जिकडे पाहावें तिकडे क्षितिजापर्यंत दृष्टीला कुठे अटकावच होत नाही. सगळें कसें सपाट अन् समतळ ! त्यामुळे गुर्जर जनतेला या पावागडाचें खूप कौतुक वाटतें. ' निरस्तपादपे देशे एरंडोपि ुमायते ' तशांतली गत !

पण इथे जाणारी यात्रा केवळ गिर्यारोहणाच्या सुखासाठी जात नाही. पावागडच्या महाकालीचें दर्शन आणि तिच्या कृपेची याचना, हा त्यामागचा कामनिक उद्देश असतो. त्या भागांतलें हें एक जागृत देवस्थान समजलें जातें. याला सिद्धक्षेत्र असेंहि मानतात. जैनहि या स्थळाचा महिमा मानतात. कारण तिथे त्यांच्या पार्श्वनाथ तीर्थंकराचें मंदिर आहे अन् लवकुशांचीं पदचिन्हें आहेत. रघुपति रामाचे पुत्र लव-कुश हे अंतीं जैन झाले आणि याच पर्वतावर त्यांनी निर्वाण मिळवलें, अशी जैनांची कल्पना आहे.

पावागड हा, मारुती द्रोणागिरी उपटून लंकेकडे नेत असतां त्याच्यांतून खाली पडलेला एक तुकडा आहे, असें दंतकथा सांगते.

डोंगर चढायला लागलें, की थोड्याच वेळांत विश्वामित्री नदी दर्शन देते. गडावर विश्वामित्र ऋषीचा आश्रम आहे आणि त्याच्या जवळच या सरितेचें उगमस्थान आहे. ती विश्वामित्राची तपोजनित मानसकन्याच आहे.

गडाला एकूण तीन महाद्वारें आहेत. पहिल्या द्वाराचें नांव 'अटका द्वार.' तिथून थोडें उंचावर चढलें, की जो एक गोड पाण्याचा तलाव भेटतो, त्याला म्हणतात 'मेडीका तालाब.' तिथून थोडें चालल्यावर 'बुढियाका द्वार' भेटतें. तिन्ही दरवाजांत हा दरवाजा मजबूत आहे. त्यानंतर लागतें तें 'लालीका द्वार.' या ठिकाणीं जीं भुयारें आहेत, तीं किती खोल आहेत, तें देव जाणे!


तिथूनच पुढे खापरा जवेरीच्या हवेलीकडे जायचें. खापरा हा एक इतिहास काळांतला महान् लुटारू होता, असें दंतकथा सांगते. त्यानें तिथे एका उंच दरीच्या कडेवर सात ताळांचा महाल बांधला होता. आज तो पडला आहे; पण तशाहि स्थितींत त्याची भव्यता लोपत नाही. इथूनच विश्वामित्री नदीचा 'कडेलोट' पाहतां येतो.

गडावरच्या देवी दोन. एक महाकाली अन् दुसरी भद्रकाली. दोघीहि बहिणी बहिणी. त्यांतली भद्रकाली ही आक्का समजली जाते; पण लोक विशेषेंकरून भजतात ते मात्र महाकालीला. तिथल्या 'दुधिया सरोवरां'त स्नान करून मग देवीच्या दर्शनाला जायचें, असा भाविकाचा शिरस्ता आहे. तलावापासून मंदिरापर्यंत जायला २२५ पायऱ्या चढाव्या लागतात.

या गडावर पाताई रावल या राजपूत राजाचा महाल आहे. आज त्याचे भग्न अवशेषच तेवढे दिसतात. गडाच्या खाली जें गांव आहे, त्याचें नांव चांपानेर. त्याच्या भोंवती भक्कम तटबंदी होती. तें एक सुंदर नगर होतें. या प्राचीन नगरांत चौऱ्यांयशी मोहल्ले अन् बावन बाजार होते, असें सांगतात. या सर्वांचे अवशेष आजहि तिथे विखरून पडलेले आहेत.

इ. स. च्या १५ व्या शतकाच्या अखेरीस चांपानेर आणि पावागड यांवर एक राजपूत राजा राज्य करीत होता. त्याचें नांव पाताई रावल. गुजरातच्या अनेक राज्यांत त्याचें राज्य प्रगतिशील होतें. समृद्ध होतें, तिथली प्रजा

महाकालीला भजत होती आणि तिच्या कृपाछत्राखाली सुखाने नांदत होती. पण एक दिवस नियतीने पलट खाल्ली. पाताई राजाची एकच चूक; एकच



कालीमंदिर—पावागड

अनैतिक अभिलाषा; पण ती होत्याचें नव्हतें करायला कारण झाली. ती आख्यायिका महाभयंकर आहे—

नवरात्र चालू झालें होतें. चांपानेरमध्ये घरोघर घट बसले होते. देवीच्या उत्सवात सारें शहर दंग होतें. राजवाड्याच्या मधल्या चौकांत राणीवशांतल्या स्त्रियांनी रासोत्सव मांडला होता. नगरांतल्या थोरामोठ्यांच्या पुरंध्री तिथे गोळा झाल्या होत्या. फेर धरून देवीचीं गाणीं म्हणत होत्या. महाकालीला वाटलें, की आपण स्वत: जाऊन त्या समाजोत्सवांत भाग घ्यावा. तिने लावण्यसुंदर रूप धारण केलें. भांग टिळा केला. ती बहुमूल्य लेणीं, लुगडीं ल्याली. हळूच पाय न वाजवतां त्या महिलांच्या मेळाव्यांत प्रगटली. सर्वांना

वाटलें, की कोण्या राजाची पट्टराणी असेल. त्यांनी तिचा आदर केला. तीहि त्या मेळाव्यांत मिसळून गेली.

आणि एवढ्यांत कुठून तरी पाताई राजाची तिच्यावर दृष्टि पडली. पाहतां पाहतां त्या दृष्टींत पाप शिरलें. तो चौकांत आला आणि तिच्याकडे टक लावून उभा राहिला. राजाला तिथे पाहतांच त्या सर्व गोषांतील सुंदरी पांगल्या. राणीवशांतल्या नायकांनी अंत:पुर गांठलें. जाग्यावर उरली ती एकटी स्वरूपसम्राज्ञी महाकाली ! पाताई राजा पुढे झाला आणि त्याने तिचा हात धरला. ' तुला पट्टराणी करतों, ' असें तो तिला म्हणाला. त्या धृष्टतेने महाकाली नखशिखांत थरारली. राजाला म्हणाली.

" चांडाळा, सोड माझा हात ! "

" नाही सोडणार ! तुझ्यासारखं रमणीरत्न मी माझ्या वाड्यांतून बाहेर जाऊं देईन काय ! " राजा म्हणाला.

महाकाली एकदम खवळली. सौम्य सुंदर होती उग्र भयंकर बनली. तिच्या नेत्रांतून अंगार उफाळूं लागले. तिने तात्काळ राजाला शाप दिला —

**लागो आग होवो धुळधाणी**
**जावो सत्यनाश होवोनी !**

आणि त्याच क्षणीं नगरांत आग धुमसूं लागली. हां हां म्हणतां सर्व प्रजेला राजाची ती करणी आणि देवीची ती शापवाणी कळली. सारें नगर देवीची क्षमा मागण्यासाठी पावागडावर लोटलें. लोक म्हणाले.

" जगज्जननी, आमचा काय अपराध ? राजाच्या पापासाठी निरपराध प्रजेवर तूं कां कोपतेस ? देवी, उश्शाप दे ! आई, उश्शाप दे ! "

देवीने कृपावंत होऊन उश्शाप दिला. ' आताची आग माझ्या उश्शापाने शमेल. पण थोड्याच काळांत चांपानेरच्या राज्यावर यवनांची धाड कोसळेल. तुमचा पापी राजा राज्यभ्रष्ट होईल ! '

आणि झालेंहि तसेंच. थोड्याच दिवसांत महंमूद बेगडा या सुलतानाने चांपानेरवर चढाई केली आणि तें राज्य आपल्या घशांत घातलें. राज्याचा सर्वनाश झाला. महाकालीच्या दीपज्योतीवर झडप घालणारा पतंग पंखांसह जळून गेला !


गुर्जर-सौराष्ट्राचा इथून पुढचा प्रवास अहमदाबाद हें मध्यवर्ती केंद्र ठरवून करावा लागतो. अहमदाबाद हें गुजरातमधलें सुप्रसिद्ध शहर. शिवाय आता नव्या गुजरात राज्याची राजधानी होण्याचा बहुमानहि त्यालाच मिळाला आहे. गुजरातच्या लोकांना दुसऱ्या ठिकाणीं आपली नवी राजधानी उभारायची आहे. अहमदाबादेपासून सात-आठ मैलांवर एका विवक्षित ठिकाणीं ती उभारावी आणि 'म. गांधीनगर' असें तिचें नामकरण करावें, असेंहि ठरलें आहे. पण अजून या नव्या नगराची उभारणी होऊं शकली नाही. जी जागा निश्चित झाली होती, तिच्या खालीं भूगर्भांत तेल असल्याचा संशोधकांना वास लागला आणि त्यामुळेच बाधा निर्माण झाला. राजधानीसाठीं एवढा मोठा तेलाचा साठा वाया घालवायचा कीं काय, या राजकीय वर्तुळांतल्या उहापोहांत तें काम तूर्त तरी स्थगित झालें आहे. मधें एकदा गुजरातचे मुख्यमंत्री डॉ. जीवराज मेहता यांचें निर्धारवचन वाचनांत आलें. कांही झालें तरी संकल्पित जागींच राजधानीची उभारणी होईल, असें तें म्हणाले होते.

## अहमदाबाद

अहमदाबाद हें पश्चिम भारतांतलें मुंबईच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचें शहर आहे. अनेक उद्योगधंदे इथे चालतात. अनेक कापडगिरण्यांचीं धुराडीं इथे सारखा धूर ओकीत असतात. नऊ शतकांचा इतिहास या शहराच्या मागे उभा आहे. याचें पहिलें नांव आशावल आणि दुसरें कर्णावती. पण आजमितीस हीं दोन्ही नांवें इतिहासजमा झालीं आहेत. अहमदाबाद हेंच नांव आता लोकांच्या मनींमुखीं कायम झालें आहे. अहमदशहा या सुलतानाने आपण गुजरातचे स्वतंत्र राजे आहों, अशी घोषणा केली आणि इ. स. १४११ मध्ये या शहराचा पाया घातला. त्याने आपलेंच नांव या शहराला देऊन टाकलें. याच्या पायाभरणीला मुहूर्त चांगला लागला होता, असें म्हटलें पाहिजे. कारण तेव्हापासून याची सतत भरभराटच होत गेली. विलायतेहून इथे आलेल्या इंग्रजांनाहि वाटलें, कीं आपल्या लंडनसारखेंच हें शहर मोठें आणि समृद्ध आहे. 'हिंदुस्तानांतलें पहिल्या प्रतीचें सुंदर शहर; कदाचित् जगांतलेंहि' अशा प्रकारचेहि पाश्चात्यांचे त्या वेळचे उद्गार

आहेत. हें शहर इमारती आणि उद्यानें यांनी अप्रतिम सुंदर होतें, म्हणून तर मोगल बादशहा शहाजहान याने आपल्या मुमताज महल या प्रियतम बेगमेसह लग्नानंतरचीं पांच वर्षे इथे राहून विलाससौख्य उपभोगलें.

इतिहास काळापासून अहमदाबादची ख्यति आहे ती वास्तुकलेचें आगर म्हणून. इथल्या कलापूर्ण वास्तू मुस्लीम राजवटींत उभारल्या गेल्या आणि आज सुमारें ५०० वर्षें त्या आपलें सालंकृत सौंदर्य मिरवीत दिमाखाने उभ्या आहेत. शिल्पशास्त्रांतलें जे आश्चर्यजनक आविष्कार भारतांत अन्यत्र आढळणार नाहीत, ते इथे दिसतील. इथली वास्तुकला प्राधान्याने मशिदींच्या रूपांत साकार झाली आहे. पण हें सारें स्थापत्य इस्लामी असलें, तरी त्यावर हिंदुस्थापत्याचाहि लक्षांत येण्याजोगा ठसा दिसतो.



जामा मशीद अहमदाबाद

जामामशीद ही इथली सर्वश्रेष्ठ स्थापत्यरचना होय. भारतांतल्या अग्रगण्य मशिदींत हिच्या नांवाने एक बोट घातलें जातें. ज्या अहमदशहाने हें शहर वसविलें, त्यानेच ही मशीदहि बांधली. उंच मनोरे उभारणें हें इस्लामी

स्थापत्याचें एक वैशिष्ट्य. या मशिदीलाहि दोन मनोरे होते. हे दोन्ही मनोरे अशा कांही विलक्षण कारागिरीने निर्मिले होते, की ते कोणीहि सामान्य माणसाने जरी हालविले, तरी डगडग डोलूं लागत. एक हालवला, की त्याचा दुसरा भाऊ न हालवतांहि हालूं डोलूं लागे; पण त्यांतला एक १८१८ सालच्या भूकंपांत धरणीवर कोसळला आणि या अद्‌भुत वास्तूच्या सौंदर्याला तेवढ्या प्रमाणांत उणेपणा आला.

असाच आणखी एक हालता मनोरा एकतोडानी मशिदीवर उभा आहे. तो ६० फूट उंच असून चुना अन् विटा यांनी बांधून काढलेला आहे. एका बारक्या जिन्याने वर चढून जायचें आणि तो हालवायचा. तो सुखेनैव हालतो. आणि श्री. श्रीपाद जोशी यांच्या शब्दांत सांगायचें, तर 'एखादी पोलादी कांब लवलवावी तसा हालतो.'

हें झालें एक महदाश्चर्य! दुसरें आश्चर्य त्या दगडी जाळ्यांचें. पहिलें आश्चर्य वास्तुविद्येंतील प्रतिभेचें आणि दुसरें मानवी हातांच्या कारागिरीचें. सिद्दी-सैय्यदच्या मशिदीच्या मागच्या भिंतींत प्रकाश आणि हवा आंत येण्यासाठी या दोन दगडी जाळ्या बसविल्या आहेत. मशीद आहे सामान्यच; पण या सामान्याला अशा एका विशेषाची जोड मिळाली आहे, की कोण्याहि कलाविद रसिकाने 'वाहवा' म्हणून क्षणभर स्तिमित व्हावें. एक कमानीच्या आकाराचा ताशीव दगड, त्यांत एक झाडाचा बुंधा आणि त्याला फुटलेल्या वेलीसारख्या रुबाबदार वळणें घेऊन वाकलेल्या फांद्या. त्यांचीं वर्तुळात वर्तुळें. एकाने दुसऱ्याला छेदावें, दुसऱ्याने तिसऱ्याच्या पोटांत शिरावें. प्रत्येक वेलीला पानाफुलांची कुसर. दगडाचींच पानें, दगडचींच फुलें. असें हें सारें नाजूक हातांनी केलेलें कोरीवकाम आहे. त्याच्या वर्णनासाठी शब्दांची चावटी व्यर्थ आहे. तिथे 'चक्षुर्वैसत्यम्' हेंच वचन खरें ठरेल. अहमदाबादला गेलेला कोणताहि रसिक या जाळ्या पाहिल्यावांचून परतणार नाही. अहमदाबादेला कोण्या कलाकाराने मिळवून दिलेला तो बहुमूल्य अलंकार आहे.

बडोद्याचा जसा सुरसागर, तसाच अहमदाबादचा तो कांकरिया तलाव. निसर्गाला किंवा नगराला जेव्हा जळाची जवळीक मिळते, तेव्हा त्याच्या सौंदर्यावर शिरपेच चढतो. अहमदाबादला या कांकरियाने अशीच शोभा

आणली आहे. याच्या चारी बाजू समान आहेत, हें त्याचें आणखी एक वैशिष्ट्य. आणि तो एकूण बहात्तर एकर जमिनीवर पसरला आहे, हें त्याचें विशालत्व. याच्या मध्यभागीं नगीनावाडी नांवाचा एक लहानसा बगीचा निर्मून त्याच्या मूळच्या प्रसन्न सौंदर्याला 'सतरावी कळा' चढविलेली आहे. शहरवासी लोकांचें हें सायंसहलीचें ठिकाण होय.

तिथूनच जवळ एका विस्तीर्ण जागेंत आजमितीस 'बालवाटिका' फुलली आहे. हें ठिकाण मुलांच्या दृष्टीने गंधर्वनगरीच म्हटलें पाहिजे. तिथे नाना प्रकारचीं फुलझाडें आहेत. मनोज्ञ आकारांचीं कारंजीं आहेत. अनेक वाटांनी आणि पाटांनी तिथे पाणि खेळविलेलें आहे. छोट्या–मोठ्या विविध आकारांच्या इमारती आहेत. मुलांसाठीच तिथे चित्रांचें दालन आहे. मोफत वाचनालय आहे. आकृतीची विकृती बनवून हसायला लावणारे मोठमोठे आरसे आहेत. हरणाची गाडी आहे. खेळाचीं साधनें आहेत. आणि या सर्वांवर विविध रंगांची रोशनी करणारी प्रकाशयोजना आहे. खरोखर अहमदाबादच्या महापालिकेने ही यक्षनगरी निर्मून मुलांचें अपार कोडकौतुक पुरविलें आहे. या वाटिकेंत मोठ्यांचा हात धरून मुलें जात नाहीत; तर मुलांचा पालव धरून मोठ्याना जावें लागतें. बरोबर मूल नसेल, तर मोठ्या माणसांना तिथला द्वाररक्षक आंत सोडणारच नाही.


साबरमती नदी या शहराच्या मधून वाहते. अरवली पर्वताच्या आरासुर टेकड्यांत अंबाभवानीच्या मंदिरापासून थोड्या अंतरावर ती उगम पावते आणि २०० मैलांचा प्रवास करून खंबायतच्या आखाताला जाऊन मिळते. पद्मपुराणांत साभ्रमती या नांवाने तिचा उल्लेख असला, तरी पावित्र्याच्या दृष्टीने आजवर तिला मानाचें स्थान नव्हतें. पण म. गांधींनी तिच्या तीरावर आपला आश्रम उभारला आणि तिला भारतांत तीर्थपदवी प्राप्त झाली. गांधीजींचा हा पहिला आश्रम होय. इथूनच कांही वर्षें त्यांनी भारताचें राजकरण चालविलें. १९३० सालचा तो देशव्यापी मिठाचा सत्याग्रह ! त्याची गंगोत्री इथेच प्रगटली. गांधीजींची पंचा नेसलेली तप:पूत कृश मूर्ति हातीं दांडा घेऊन इथूनच त्या इतिहासप्रसिद्ध दांडीयात्रेला निघाली. अहिंसक सत्याग्रहयुद्धाचें हा आश्रम हें कुरुक्षेत्र ठरलें.

कालिदासाने म्हटल्याप्रमाणे 'शांतमिदमाश्रमपदम्' असें हें स्थान आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दि: ..................
अनुक्रम ..................
नों. दि: ..................
क्रमांक ..................



गांधीजी वास्तव्य करीत होते, ती तर खरोखरच एक झोपडी आहे. साबर-मतीवरून येणारा मोकळा तुषारवात हें तिचें वैभव आणि शांति हें सौभाग्य !



साबरमती आश्रम

म. गांधी हा त्या झोपडीचा 'पंचीप्राण' होता. तो आता हरपला आहे; कीर्तिशेष झाला आहे. पण या झोपडीने गांधीजींचा समग्र जीवनपट छाया-चित्रांच्या रूपाने आपल्या अंगावर ओळीने मांडून ठेवला आहे. त्या सौभाग्यानेच ती आता 'सनाथ' राहिली आहे. या आश्रमाच्या जवळच पलीकडे नदीच्या तीरावर एका वृक्षातळीं पसरलेल्या वाळूच्या मऊ बिछाय-तीवर गांधीजी सायंप्रार्थना करीत. तिथे गेल्यावर कांहीतरी वेगळें वाटतें, हृदय भरून येतें, यांत शंका नाही. ती 'रघुपति राघव राजाराम'ची धुन, तीं गीतेंतील स्थितप्रज्ञाचीं शांतगंभीर आवाजांत म्हटलीं गेलेलीं लक्षणें, आजहि त्या वातावरणांत गुंजून राहिलीं आहेत, असें मनाला भावतें.

सांप्रत तो आश्रम आश्रमस्थान या स्वरूपांत राहिलेला नाही. तिथे एक नवें नगरच मांडलें गेलें आहे आणि अजूनहि प्रत्यहीं मांडलें जात आहे. गांधीजींनी जिवाच्या कराराने अंगीकारलेलीं रचनात्मक आणि विधायक कार्यें आजहि तिथे चालतात. गांधीजींचा आत्मा त्या कार्यांच्या रूपाने तिथे अव्यक्तपणे वावरत असून तिथल्या अनेक कार्यकर्त्यांना 'धियो यो नः प्रचोदयात्' होत आहे, असें म्हणायला हरकत नाही.

इथली नवजीवनसंस्था म. गांधींचें साहित्य आणि म. गांधीविषयक साहित्य प्रकाशित करणारी भारतांतली एक महान् संस्था आहे. तिने आजवर गुजराती, मराठी, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषांत शेंकडों ग्रंथ प्रकाशित केले आहेत. थोड्याच वर्षांपूर्वी तिने सात लाख रुपये खर्चून स्वत:ची वास्तु उभारली आहे आणि आता तिथे संसार मांडला आहे. तिथे जाणाऱ्या प्रेक्षकाला त्याच जागेंत सरदार वल्लभभाई पटेल यांना मिळालेल्या भेटी, आणि मानपत्रें यांचा बहुमोल संग्रह पाहायला मिळेल.

सांस्कृतिक कार्यांना वाहून घेऊन काम करणारी इथली आणखी उल्लेखनीय संस्था म्हणजे संस्कारकेंद्र. तिने कला आणि संस्कृति यांचें एक उत्तम संग्रहालय निर्माण केलें आहे. अहमदाबादचें हें सारें ऐतिहासिक अन् सांस्कृतिक वैभव पाहिल्यावर त्या शहराविषयीं मनांत प्रेम निर्माण होतें, यांत शंका नाही.

## लोथल

अहमदाबादहून भावनगरकडे जायला लागलें, की त्या राजरस्त्यावर लोथल नांवाचें एक स्थळ भेटतें. अहमदाबादपासून ६४ मैलांवर तें आहे. जिथे त्या नांवाच्या अक्षरांची पाटी दिसेल, तिथेच बसमधून उतरायचें. पुढचा चार मैलांचा रस्ता पायीं तुडवावा लागतो. रस्त्यावर विशेषशी रहदारी नसते. अधूनमधून आजुबाजूच्या शेतांत काम करणारीं माणसें दिसतील त्यांना वाट पुसतच पुढे जावें लागतें.

आणि मग तुम्ही एका मोकळ्या माळावर येऊन पोंचतां. तिथेच तो रस्ताहि संपतो. त्या ठिकाणीं भूगर्भांतलें एक प्राचीन नगर उत्खनन करून वर काढलेलें आहे. १९५४ सालापासून त्याच्या उत्खननाचें काम सुरू होतें. आता तें संपण्याच्या बेतांत आलें आहे. कदाचित् तें एवढ्या अवधींत संपलेंहि असेल. त्या मोकळ्या विस्तीर्ण मैदानांत १२–१५ फूट उंचीचा एक हुडा होता. डोंगर नव्हे कीं टेकडी नव्हे !, एक सामान्य उंचवटा ! पण त्या उंचवट्याने आपल्या पोटांत इतिहासाचें एक असामान्य साधन संभाळून ठेवलें होतें. थोडीं थोडकीं नव्हेत, तर सुमारे ३००० वर्षें तो हुडा मातीची खोल घेऊन एखाद्या संशोधकाची वाट पाहत बसला होता. अखेर १९५

सालीं तो संशोधक त्याला गवसला. त्याला त्याने आपला देह समर्पून दधीचि ऋषीचा मोक्ष मिळविला.

लोथलचें हें उत्खनित नगर सिंधुसंस्कृतीच्या विस्ताराचाच एक धागा आहे. ती संस्कृति निर्माण करणारे लोक नेमके कोण होते, तें अद्यापि स्पष्ट झालेलें नाही. त्यांची एक विशिष्ट लिपि विटांवर कोरलेली दिसते, तीहि अद्यापि कोणाला वाचतां आलेली नाही. त्यांनी वसविलेलीं, पण कालाच्या तडाख्यांत सांपडून भूगर्भात गडप झालेलीं त्यांचीं नगरें मात्र संशोधकांनी उकरून काढलेलीं आहेत. मोहेंजोदडो आणि हराप्पा हीं त्या नगरांचीं नांवें होत. एक आहे सिंधमध्ये अन् दुसरें आहे पश्चिम पंजाबमध्ये. हीं शहरें वसविणारे लोक सुसंस्कृत होते, कुशल स्थपति होते, कृषिविद्या जाणणारे होते, स्वच्छतेचे भोक्ते होते आणि कोण्यातरी एका मातृदेवतेचे पूजक होते.


त्यांचीं तीं सुबद्ध शहरें उद्ध्वस्त झालीं. कोणी म्हणतात, की तीं वैदिक आर्यांनी नष्ट केलीं. कांहीहि म्हटलें तरी तीं मातींत गाडलीं गेलीं, एवढी गोष्ट मात्र खरी. पुढे प्रश्न आला तो असा— त्या नगरांबरोबरच तीं वसविणारे लोकहि समाप्त झाले काय? की ते तेथून दुसरीकडे कुठेतरी निघून गेले? त्यांची व्याप्ति सिंधुखोऱ्यापुरतीच मर्यादित होती, की इतरत्रहि त्यांनी हातपाय पसरले होते?

या प्रश्नांचें निश्चित उत्तर आज मिळालें आहे. भारताच्या पुरातत्त्व खात्याने तें दिलें आहे. त्याने या प्रकरणीं मोठीच जागरूकता दाखविली. जिथे जिथे संभव वाटला, तिथे तिथे त्यांनी कुदळ घातली. चहूबाजूंनी कसून शोध केला. आणि मग त्यांना कळलें, की सिंधुसंस्कृतीचे हे लोक पंजाबांत पोंचले होते, राजस्थानांत शिरले होते, इतकेंच नव्हे; तर पश्चिम किनाऱ्यावर खाली खंबायतपर्यंत येऊन वसले होते. एकट्या गुजरातमध्येच त्यांचीं पन्नास वसाहतक्षेत्रें आढळलीं आहेत. पण या सर्वांत अग्रगण्य ठरलें आहे तें लोथल!

लोथलच्या उत्खननांत हुबेहूब हराप्पा पद्धतीचें संपूर्ण, सुबद्ध नगरच्या नगर हातीं लागलें आहे.

अर्धा मैल लांब आणि पाव मैल रुंद एवढ्या भूभागांत हें नगर वसलें होतें. यांत चार मोठे रस्ते आणि सात गल्ल्या होत्या. आजहि ती रचना सुस्पष्ट दिसते.

रस्ते कसे एका रेषेंत अन् आखीव ! त्यांतला एक रस्ता बाजारपेठेचा होता असें कळून आलें आहे. कुठे रस्त्याच्या दुतर्फा घरें तर कुठे एकाच अंगाला. सामान्यतः बहुतेक घरें दोन खोल्यांचीं. त्यांत एक खोली स्वैपाकाची अन् दुसरी बसा-उठायची. प्रत्येक घराला स्वतंत्र न्हाणीघर हें असायचेंच. त्यांतलें सांडपाणी रस्त्यावरच्या नालींत आणून सोडण्याची सोय केलेली असायची. गटारें सगळीं बंद म्हणजे विटांनी बांधलेलीं. वळतानासुद्धा तीं कोन करून न वळतां सापाच्या पद्धतीचें वळण घेतात. मोठ्या वळणावर मातीचे उभट घडे बसविलेले, त्यांच्या अंगाला छिद्रें पाडलेली. केरकचरा वाहून आला तर तो त्या घड्यांत सांठायचा. पाणी गाळून पुढें जायचें. अधूनमधून घड्यांतला गाळ काढून टाकला, की पाणी चाललें सुरूसुरू पुढे ! गावांत पाणी सांचूं द्यायचें नाही, यावर त्यांचा कटाक्ष असे. एकंदरीत त्या लोकांना नगरसफाईची बरीच चाड होती असें दिसतें.



**रस्ते व घरठाणें—लोथल**

आज लोथलचें हें नगर मोकळ्या आभाळाखाली उघडें होऊन पडलें आहे. त्याचे कोनेकोपरे, रस्ते, भिंताडें, विहीरी, भट्ट्या, सगळें कांही

स्वच्छ अन् सुस्पष्ट केलें गेलें आहे. तिथे कांही घरें कच्च्या विटांचीं, तर कांही पक्क्या विटांची दिसतात. पक्या विटांचीं घरें वस्तीच्या मध्यभागीं अन् थोड्या उंच जागीं आहेत. कच्च्या विटांचीं घरें बाहेरच्या अंगाला आहेत. म्हणजे इथेहि आर्थिक वर्गभेद दिसतो. पक्क्या विटा सर्वांनाच परवडत नसत. कारण त्या भाजायला इंधन दुर्मिळ होतें. सामान्यत: असें म्हणता येईल, कीं गांवचा ग्रामणी, पुरोहित आणि धंदेवाले हेच तेवढे भाजक्या विटांची घरें बांधू शकत. तिथें विटा भाजायची भट्टीहि सांपडली आहे. चार चौकोन विटांनी उभारायचे. मधें सोंगट्यांच्या पटासारखे चर ठेवायचे. त्या चरांत इंधन भरायचें. भट्टी चारी बाजूंनी लिंपून घ्यायची. आणि मग तिच्यांत अग्निनारायणाचा प्रवेश करून द्यायचा. तिथल्या एका भट्टीचा विटा न काढलेला एक भाग तसाच राहून गेलेला आजहि पाहायला मिळतो.

बाजारपेठेंत एक सोनाराचें घर सांपडलें आहे. तिथली छोटी ऐरण आणि तिच्या भोंवती विखरून पडलेले सोन्याचे कण यांवरून तें घर सोनाराचें म्हणून ओळखलें गेलें. हे लोक शेती तर करीत होतेच; पण त्यांचा आणखी एक धंदा होता तो मणि बनविण्याचा. त्यासाठी ते रंगीबेरंगी दगड आणि गोमेदाचे खडे हा कचा माल बाहेरून मागवीत. त्या ओबडधोबड खड्यांना वाटोळा, लांबट, चौकोनी, असे आकार देत. त्यांना छिद्रें पाडीत. त्यांचे दागिनेहि बनवीत. आणि मग तो किंमती माल बाहेरच्या बाजारपेठांत पाठवीत. त्यांचा हा मण्यांचा व्यापार इजिप्त, मेसापोटेमिया इत्यादि देशांपर्यंत चालत होता, याचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. इथे सिलें किंवा अभिज्ञानमुद्राहि आढळतात. त्या मुद्रा ओतण्याचा सांचाहि गवसला आहे. त्यावर कांही अक्षरें असतात अन् एखादें प्राण्याचें चित्रहि असतें. विक्रीचा माल दूरदेशीं पाठवितांना त्या गसडीवर ते आपल्या गांवाच्या किंवा नांवाच्या मुद्रा उठवीत. त्यामुळें परदेशी व्यापाऱ्यांना मालाविषयीं खात्री पटे.

हे लोक नगररचनेंत जसे निष्णात होते, तसेच सूक्ष्म वजनेंमापें बनविण्यांतहि तरबेज होते. सुतार किंवा गवंडी वापरतात तसला एक गुण्या; पण तो शिंपेचा केलेला इथे सांपडला आहे. एकांत एक बसविलेलीं चौकोनी वजनेंहि

मिळालीं आहेत. या सर्व व्यवहारामागे त्यांचें गणिती डोकें काम करीत होतें, यांत शंका नाही. इथल्या कुंभारांनी विविध आकारांचीं गाडगीं—मडकीं बनवलीं आहेत. भांडीं कोरीं ठेवणें त्यांना पसंत नव्हतें. ते त्यांवर पशु-पक्ष्यांचीं सुंदर चित्रें काढीत. त्या चित्रकारींत प्रतिभावान् कलाकाराचा हात दिसतो. इथे सांपडलेल्या मातीच्या कांही भांड्यांत राख हातीं लागली, तर काहींत बायकांचे दागिने गवसले. गळ्यांतले, हातांतले, कानांतले, असे ते विविध अलंकार होते. पुरातत्त्व खात्याला या उत्खननांत त्या लोकांनी ‘ कवडी कवडी ’ जोडलेली माया बरीच सांपडली आहे.

पेठेंतल्या रस्त्यावर एका घरांत एक अग्निकुंड सांपडलें आहे. त्यांत राख होती आणि जवळच एका शिंगवाल्या पशूचें मस्तकहि होतें. कुंडाच्या कठड्यावर छिद्रान्वित असें एक सुवर्णनाणें सांपडलें. जाणकारांनी ओळखलें, की तो ‘ निष्क ’ आहे. कोण्यातरी श्रीमंत श्रेष्ठीने तो अग्निनारायणाला दक्षिणा म्हणून समर्पिला असेल. निष्क हें वैदिक नाणें आहे. वैदिक लोक आणि त्यांच्या पुरंध्री निष्कांच्या गळेसऱ्या बनवून त्या आपल्या कंठांत रुळवीत. हें अग्निकुंड म्हणजे कोण्या वैदिक ब्राह्मणाच्या घरचा गृह्याग्नि असावा.

त्यावरून कळतें, की लोथल वसविणारे लोक आर्येतर असले, तरी आर्य ब्राह्मणांनी त्यांच्याशीं संपर्क साधला होता. तेहि त्यांच्या शेजारीं येऊन वसले होते आणि आपला यज्ञधर्म आचरीत होते. जी गोष्ट मोहेंजोदडो अन् हराप्पा या ठिकाणीं घडली नाही, ती इथे घडली होती. हराप्पा आणि लोथल यांच्या मध्यें पांच शतकांचा कालखंड उभा आहे. एवढ्या प्रदीर्घ कालावधींत आर्य आणि आर्येतर यांच्यांत बऱ्याच अंशीं सांस्कृतिक समन्वय घडून आला असल्यास नवल नाही.

गांव आहे तिथे स्मशानभूमि ही हवीच. इथे ती उत्तरेच्या अंगाला सांपडली आहे. पुरातत्त्व खात्याने तिचेंहि उत्खनन केलें आणि धरतीच्या पोटांत चिरनिद्रा घेत असलेले तीस मानवी सांगाडे वर काढले. जे खड्डे उकरले, त्यांपैकी तीन खड्ड्यांत दोन दोन अस्थिपंजर जोडीने सांपडले आहेत. अर्थात् ते पती-पत्नींचे असले पाहिजेत यांत शंका नाही. म्हणजे पतीच्या प्रेताबरोबर त्याची पत्नी सहगमनासाठी त्याच्या शेजारी येऊन आडवी झाली आणि लोकांनी ‘ हरहर ’ म्हणून त्या खड्ड्यांत माती लोटली,

असा त्याचा अर्थ होतो. हें सहगमन कदाचित् खुषीचें असेल; कदाचित् सक्तीचेंहि असेल. बहुधा सक्तीचेंच असावें. पण त्यावरून सहगमनाची प्रथा आपण समजतों, त्याहूनहि प्राचीन असल्याचें सूचित होतें. त्या खड्ड्यांत बांगड्या, मणी आणि कर्णभूषणें सांपडलीं आहेत. ते ' सकळै शृंगार ' केलेल्या सतीचे अलंकार होत.

नगराच्या थोडें बाहेर जाऊन खणतां खणतां एक विटांचें बांधकाम आढळलें. खणणारे म्हणाले, की तलाव सांपडला. तो सावधानपणे सर्व बाजूंनी मोकळा केला गेला, तेव्हा त्याची लांबी ७१० फूट, रुंदी ११६ फूट आणि एका अंगाने घडेची सर्वांत अधिक उंची १४ फूट आढळली. अन् मग त्या संशोधकांना कळलें, की हा तलाव नव्हे. तलाव असता तर त्यांत उतरायला पायऱ्या असत्या. तशा त्या इथे नाहीत. विचारान्तीं ठरलें, की हें एक छोटेखानी बंदर आहे. आणि मग बंदराचीं सर्व लक्षणें तिथे आढळलीं. पूर्वेच्या अंगाने पाणी आंत येण्याचा रस्ता. दक्षिण अंगाला पाणी रोखून धरणें किंवा तें काढून लावणें, यासाठी फाटक. होड्यांचे दोर बांधण्यासाठी कांठावर बसविलेले छिद्रयुक्त दगड. काठ्या रोवण्यासाठी दगडांत केलेले खळगे. हें सगळें पाहिल्यावर तर तें बंदर असल्याची खात्रीच पटली.

त्याकाळीं साबरमतीचें पात्र लोथलच्या जवळून वहात होतें. आज तें दूर गेलें आहे. त्या काळीं भरतीच्या वेळीं तिचें पाणी लोथलपर्यंत आंत येत असावें. लहानमोठ्या नौका तिथल्या धक्क्यावर विसावत असाव्या आणि भरती–ओहोटी पाहून तिथून समुद्राच्या कुशींत शिरत असाव्या. लोथलचे लोक नौकानयनांतहि तरबेज होते आणि त्यांच्या दर्यावरच्या हालचाली सदैव चालत होत्या, हें त्यावरून कळून आलें.

मोहेंजोदडो आणि हराप्पा हीं दोन सिंधुसंस्कृतीचीं माहेरघरें. पण भारताची फाळणी झाल्यावर संशोधकांना अभिमानास्पद आणि जिज्ञासूंना अभ्यासविषय असणाऱ्या त्या दोन्ही उत्खनित नगरांना भारत पारखा झाला. पण भारताच्या भाग्याची गोष्ट ही, की त्याच लोकांनी वसवलेलें आणि त्या दोन्ही नगरांच्या तोडीचें तिसरें लोथल हें नगर गुजरातच्या भूमीवर पुरातत्त्व खात्याच्या संशोधकांना गवसलें. त्यामुळे भारताला प्राचीन संस्कृतीचें एक महान् भूमिगत निधानच सांपडलें, असें म्हणायला पाहिजे. लोथलचें संपूर्ण

उत्खनन करूनच पुरातत्त्वखात्याने आपली शताब्दि साजरी केली. याहून अभिमानाची आणखी एक गोष्ट आहे. मोहेंजोदडो आणि हराप्पा हीं स्थळें हेरणारे, तीं उकरून काढणारे आणि त्यावर भाष्य करणारे, सगळे संशोधक हे पाश्चात्य होते; पण लोथलचें हें स्थळ भारतीय डोळ्यांनी शोधलें, भारतीय हातांनी उकरलें आणि भारतीय बुद्धिमत्तेने त्याच्यावरून अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढले.

## पलिताणा

अहमदाबाद हें जसें गुजरातचें, तसें भावनगर हें सौराष्ट्राचें आटपाट-नगर. सौराष्ट्राचें संस्कृतिकेंद्र म्हणून त्याची ख्याति आहे. महाराष्ट्रांत जें स्थान पुण्याचें, तेंच सौराष्ट्रांत भावनगरचें. तें मुख्यत्वें पांढरपेशा मध्यम वर्गाचें शहर आहे. राजकोट श्रीमंत, तर भावनगर विद्यावंत ! सौराष्ट्राच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळी इथूनच चालतात. इथे जें पिकतें, तें सौराष्ट्रांत सर्वत्र विकतें. तें साहित्यिक व कलावंत यांचें माहेरघर आहे. लोकसाहित्याचे संशोधक श्री. मेघाणी हे इथलेच आणि सुप्रसिद्ध चित्रकार श्री. रविशंकर रावळ हेहि इथलेच. अहमदाबादहून भावनगरला गेलों, की आपण गुजरातेंतून सौराष्ट्रांत दाखल होतों.

सौराष्ट्र हें प्राचीन नांव तर काठियावाड हें अर्वाचीन. तें तिथल्या ‘ काठी ’ या जातीवरून पडलें. पडलें म्हणण्यापेक्षा मराठ्यांनी तें पाडलें. मराठ्यांना त्यांच्या मोहिमेंत या काठी लोकांचाच खरा विरोध झाला. मराठ्यांनीं केलेलें हें नामकरण पुढें इंग्रजांनीहि कायम केलें.

हे काठी लोक, सूर्यपुत्र कर्णापासून आपली उत्पत्ति सांगतात. हे सूर्यपूजक आहेतहि. शिवाय ते नागपूजकहि आहेत. गुजरातेंतलीं वासुकि व धरणीधर या नागांचीं मंदिरें त्यांनीच बांधलीं. हे लोक पूर्वी पशुपाळ होते. मूळचे हे मध्य आशियांतले वस्तीकर होत. पण मुसलमानांनी त्यांना तिथून हुसकलें. त्यामुळे ते तिथून सिंधमध्ये उतरले. ही घटना सुमारे चौदाव्या शतकांत घडली. पण सिंधमध्येहि हे लोक स्थायिक होऊं शकले नाहीत. कारण घडलें ते असें–

त्यावेळीं सिंधवर सुमरी नांवाचा राजा राज्य करीत होता. एका नर्तकीने नृत्यप्रसंगीं त्या राजाचा अवमान केला आणि त्यामुळे त्याने तिला राज्यांतून

घालवून दिलें. ती कंचनी दरबारांतून निघाली, ती या काठींच्याकडे आश्रयार्थ आली. राजाला तें समजलें. तो क्षुब्ध होऊन म्हणाला, 'इंद्राय तक्षकाय स्वाहा.' त्याने सगळ्या काठी जमातीलाच सिंधमधून हाकलून लावलें. तिथून ते सौराष्ट्रांत प्रविष्ट झाले.


तसे हे लोक कांही सुध्या प्रवृत्तीचे नव्हते. पशुपालनाबरोबरच दुसऱ्याचीं गुरें चोरणें हाहि यांचा 'मान्य' व्यवसाय होता. ते सांगतात, 'पांडवांच्या अज्ञातवासांत विराटाच्या गायींचीं खिल्लारें पळवलीं तीं आम्हींच. आमचा पूर्वज कर्ण यानेच आम्हाला तशी आज्ञा केली होती. तेव्हापासून आम्हाला गुरें पळवण्याचा हक्कच मिळाला आहे.'

पण केवळ गुरें पळवूनच ते थांबले नाहीत. त्यांनी दरोडेखोरीहि सुरू केली. लूटमारीने त्यांनी अनेकांना अनेक वर्षें 'त्राहि भगवन्' करून सोडलें. मोठ्या प्रयत्नाने त्यांच्या गुन्हेगारीला आळा घातला, तो इंग्रज सरकारने. हे लोक निधड्या छातीचे असून इतिहासकाळांत त्यांनी सौराष्ट्रांत मोठमोठे किल्लेहि बांधले होते.

यांच्या बायका नाकींडोळीं नीटस दिसतात. त्यांचा पेहराव कृष्णवर्णाचा असतो. काठी लोकांत स्त्री-पुरुषांचे हक्क समान आहेत. किंबहुना त्यांच्या बायकांचाच वरचष्मा असतो, म्हटलें तरी चालेल. काठी पुरुष सहसा एकाहून अधिक बायका करीत नाहीत. शाखायत आणि अवरतिया असे त्यांचे दोन मुख्य भेद आहेत.

सौराष्ट्रांत ब्राह्मणांच्या मुख्य जाती तीन : नागर, औदीच्य आणि श्रीमाळी. भावनगरजवळचें वल्भी अर्थात् वडनगर हें नागरांचें मूळ ठिकाण. हे लोक अनेक दृष्टींनी महाराष्ट्रांतल्या चित्पावन ब्राह्मणांशी सहधर्मी आहेत. तसेच गोरे आणि घारे. काही संशोधकांना तर असेंहि वाटतें, की नागर आणि चित्पावन यांचें कुल एकच असावें. ते समुद्रमार्गे कुठून तरी भारतांत आले. जे सौराष्ट्रांत राहिले, ते नागर झाले अन् जे त्याच्याहि खाली कोंकणांत पोंचले, ते चित्पावन बनले. या नागर ब्राह्मणांचें एका काळीं सौराष्ट्रांच्या राजकारणांत बरेंच वर्चस्व होतें. 'हे लोक आंतल्या गांठीचे, अधिकारप्रिय, विचक्षण आणि मागचा पुढचा विचार करून वागणारे' असें श्री. याज्ञिक त्यांचें स्वभावदर्शन घडवतात.

मूळराज सोळंकीने १० व्या शतकांत एक मोठा यज्ञ केला. त्यासाठीं त्याने उत्तरेहून एक हजार श्रौती आणि अधीत ब्राह्मण आणवले. यज्ञ समाप्त झाल्यावर ते परत स्वस्थानीं न जातां गुजरातेंतच स्थायिक झाले. उत्तरेहून आलेले म्हणून लोक त्यांना औदीच्य म्हणूं लागले. श्रीमाळी हे स्वतःला गौतम ऋषीचे वंशज समजतात. श्रीमाळ हें गांव त्यांना दान मिळालें म्हणून ते श्रीमाळी बनले. प्रथम ते पाटण येथे राहत होते; पण पुढे त्यांनी कच्छ-सौराष्ट्रापर्यंत आगेकूच केलें. पुढे त्यांतले कांही जैनहि बनले.



**आदिनाथ मंदिर–पालिताणा**

भावनगरला पोंचल्यावर तिथून अवघ्या तीस मैलांवर असलेलें पालिताणा हें जैन क्षेत्र पाहिल्यावांचून कोणी पुढे जाऊं नये. जैनांनी भारतांतले पांच पर्वत पवित्र मानले आहेत. गिरनार, शत्रुंजय, संमेतशिखर, अबू आणि तरंग हीं त्यांचीं नांवें आहेत. या पांचहि पर्वतांशीं त्यांच्या कोण्या ना कोण्या

तीर्थंकराचा संबंध आहे. त्यांपैकीं पालिताण्याजवळ उभा आहे, तो शत्रुंजय पर्वत होय.

जैन संस्कृतीला पर्वतशिखरांचें विलक्षण आकर्षण आहे. प्रचंड आणि कलाकुसरीचीं मंदिरें बांधणें आणि तींहि शक्य तर एखाद्या पर्वतशिखरावर उभारणें, अशी जैनांची प्रवृत्ति असते. राजस्थानांत अबू, कर्नाटकांत श्रवण बेळगोळ इत्यादि ठिकाणें त्यांच्या याच प्रवृत्तीची साक्ष देतात. तप आणि कायक्लेश हीं जैनधर्मांतलीं प्रमुख साधनें होत. पर्वतशिखरावर पुण्यक्षेत्र निर्माण करण्यांत त्यांचें कायक्लेशाचें उद्दिष्ट अपरिहार्यपणें साधतें. तीर्थंकराच्या दर्शनाची तहान असेल, तर डोंगर चढा, घाम गाळा, तोळा दोन तोळे तरी चरबी कमी करा, असेंच जणुं जैनसंस्कृति आपल्या अनुयायांना सांगते.

शत्रुंजयपर्वत हें मुख्यत्वें श्वेतांबरपंथी श्रावकांचें पुण्यक्षेत्र आहे. श्रीमाळी, ओसवाल आणि पोरवाड हे श्रावकांचे मुख्य भेद होत. श्रीमाळींचा उल्लेख वर झालाच आहे. ओसवाल आणि पोरवाड हे सिंधमल्या पारकर या ठिकाहून खालीं सौराष्ट्रात उतरले. त्यांनीहि पुढे जैन धर्म स्वीकारला. वाणिया जातींतहि श्रावकांची संख्या बरीच आहे. हे सगळे शत्रुंजयपर्वताचे यात्रेकरू आणि तीर्थंकरांचे उपासक. ' काशीस जावें, नित्य वदावें ' ही जशी हिंदूंची काशीविषयक भावना, तशीच ती श्रावकांची या क्षेत्राबद्दल आहे. हे सर्व लोक वाणी उद्मी अतएव धनकनकसंपन्न आहेत. शत्रुंजयपर्वताला लखलखती मंदिरनगरी बनवलें, तें याच लोकांनी.

इथलें मुख्य मंदिर आहे तें आदिनाथाचें. तो जैनांचा पहिला तीर्थंकर म्हणजे मानवांचा उद्धारकर्ता होय. यालाच ऋषभदेव असेंहि नांव आहे. भागवतांत त्याचें आख्यान वर्णित आहे. याची मूर्ति ओळखण्याची खूण म्हणजे वृषभ अर्थात् बैल. तो त्याच्या आसनाखालीं कोरलेला असतो. शत्रुंजय म्हणजे आदिनाथाचा स्वर्ग असें म्हणायला हरकत नाही. यात्रेकरू त्या डोंगराच्या पायथ्याशीं उतरला, कीं तिथल्या इमारती, धर्मशाळा, मंदिरें, हा सगळा जैननिर्मित वास्तुविस्तार त्याला पाहायला मिळतो. तो पाहिल्यावर मन आधींच प्रसन्न होतें. आणि मग त्याला वरची उत्कंठा लागते. आता आपण जणूं स्वर्गाच्याच पायऱ्या चढणार आहों, असें कांहीतरी त्याला

वाटूं लागतें.

हा डोंगर सुमारे दोन हजार फूट उंच आहे. सहा हजार पायऱ्या चढून त्याचा माथा गांठावा लागतो. रस्ता उभाच्या उभा न जातां तो वळणावा-कणांनी जातो. त्याच्या पायऱ्या रुंद आहेत, कमी उंचीच्या आहेत; त्यामुळे चढणारा फारसा धापावत नाही. श्रवण वेळगोळ किंवा गिरनार यांच्या पेक्षा शत्रुंजयाची चढण निश्चित सुगम आहे. मात्र उन्हाचा चढेल त्याने छायेची अपेक्षा धरूं नये. कारण या डोंगरावर विशाल वृक्ष नाहीत. आहेत तीं झुडपें. बरींचशीं बाभळीचीं झाडें. तीं काय त्याला सावली देणार !

अशक्त आणि स्थूल मंडळीसाठी इथे डोल्या मिळूं शकतात. आपद्धर्म म्हणून श्रावकहि डोल्यांचा परिग्रह करतात. श्रावक इथें येतात, ते नेमधर्मा-साठी. ज्यांचा जितक्या दिवसांचा नेमधर्म असेल, तितके दिवस ते सकुटुंब खालच्या एखाद्या धर्मशाळेंत येऊन तळ ठोकतात. आणि मग त्यांचे शत्रुंजय पर्वताचे खेटे सुरू होतात. कोणी दिवसांतून एकदा चढून उतरतो, कोणी दोनदा, तर कोणी तीनदा. हे खेटे अनवाणी घालायचे असतात. श्रावकांना डोंगरावर जेवणखाण वर्ज्य आहे. थुंकणें, लघुशंका करणें, हेंहि निषिद्ध आहे. डोंगरावर वस्ती करायची नाही, असाहि नियम आहे. त्यामुळे जो चढतो, त्याला रात्र पडायच्या आंत पायथा गांठावाच लागतो.

सामान्यतः दीड तासांत माणूस वर चढूं शकतो. ज्याला तिथला नेमधर्म नाही, अशा यात्रिकाला मंदिराच्या महाद्वारांत उत्तम दही मिळूं शकतें. चढणीच्या श्रमांचा तो एक उत्तम उतारा ठरतो. ‘ दही घ्या दहीऽऽ ’ वाले तिथे आपलीं मडकीं भरून घेऊन हारीने बसलेले असतात. एक भांडें ‘ दधि मधुरम् ’ घशाच्या घाटीखालीं उतरलें, की आत्मा गारीगार होतो आणि पुढच्या मंदिरनगरीच्या भ्रमंतीसाठी पुनश्च ताजातवाना होतो.

या डोंगराच्या माथ्यावर सुमारे नऊशें मंदिरें आहेत. शत्रुंजय पर्वतावर मंदिर बांधणें हें जैनांना मोठें पुण्यकृत्य वाटतें. त्यामुळे आजवर ज्या ज्या धनिकाला तशी इच्छा झाली, त्याने त्याने तिथे मंदिर उभारलें. या सर्व मंदिरसमुदायांतलें आदिनाथाचें मुख्य मंदिर संगमरवरी असून प्रशस्त आहे. मात्र इथे अबूवरच्या मंदिरांप्रमाणे कलाकुसर आढळत नाही. आदि-नाथाची पद्मासन घालून बसलेली मूर्ति पुरुषमानाची आहे. आदिनाथ काय

किंवा कोणताहि तीर्थंकर काय, तो वैराग्याचा मूर्तिमंत पुतळा असतो. तो सर्वथा निरिच्छ, निःस्पृह असतो. पण इथे त्याच्या भक्तांनी त्याच्या अंगावर एखाद्या विलासी राजापेक्षाहि अधिक असे हिऱ्यामाणकांचे अलंकार चढवले आहेत. ती मूर्ति रत्नतेजाने नुसती झळाळत असते. त्या दर्शनाने डोळ्यांची धणी पुरते; पण मनांत कुठेंतरी खटकतें. धनिकांच्या देवालाहि मोकळ्या अंगाने किंवा साधेपणाने राहतां येत नाही, हा त्याचा इत्यर्थ! जसा भक्त तसा देव, हेंच खरें!

या सर्व मंदिरांच्या भोवती चौकोनी तट आहे. त्यामुळे या मंदिरनगरीला किल्लेकोटाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. इथले पुजारी मात्र श्रावक नसून भोजक असतात. ते आपलीं वस्त्रें गेरूने रंगवितात. खाली धोतर आणि वर बंडी अशा वेषांत ते तिथे सर्वत्र हिंडतात. तिथलें जेंवढें पाहणें शक्य, तेंवढें पाहून माणूस मग परतीच्या उताराला लागतो. खाली आल्यावर त्याला थकवा तर येतोच, शिवाय भूकहि सपाटून लागते. पण जैन धनिकांनी अशा सर्व भुकेल्यांची तिथे सोय करून ठेवली आहे. ज्याला इच्छा असेल त्याने समोरच्या धर्मशाळेत जावें. तिथे प्रत्येकाच्या पुढे एक थाळी येईल. तिच्यांत पसाभर गाठ्या अन् एक बुंदीचा लाडू हमखास असेल. तो प्रसाद घेऊन लोटाभर पाणी प्यावें अन् पुढच्या मार्गाला लागावें.

## गिरनार

पालिताण्याचा शत्रुंजय पर्वत उतरल्यावर दुसरा डोंगर चढायचा तो गिरनार. त्यासाठी जुनागडला उतरावें लागतें. हें शहर तसें फार प्राचीन आहे. श्रीकृष्णाच्या चरणरजांनी तें पावन झालेलें आहे. सुमारे अडीच हजार वर्षांचा त्याचा इतिहास थोड्या फार प्रमाणांत मिळतो. त्या काळचे कांही अवशेषहि सांपडतात. श्रीकृष्णाची समुद्रांतली द्वारका निर्माण होण्यापूर्वी आनर्ताचा पुत्र रेवत याने इथेच कुशस्थली नांवाची आपली राजधानी वसविली होती. चंद्रगुप्त मौर्याच्या काळांत तिथे गिरिनगराची स्थापना झाली आणि कुशस्थली हें त्याचें नांव मागे पडलें.

आज तें गिरिनगरहि राहिलें नाहीं. राहिलें आहे तें जुनागड. १७४८ सालीं तिथे बाबी नामक नबाबी घराण्याची सत्ता स्थापन झाली. त्या घरा-

ण्यांतला शेवटचा नवाब म्हणजे मोहबतखान. या गृहस्थाने एक अजब धाडस केलें. भारताची फाळणी झाली, त्यावेळी याने आपलें जुनागड पाकिस्तानला जोडल्याचें जाहीर करून टाकलें. जुनागडची प्रजा त्यामुळे खवळून उठली. तिचा प्रक्षोभ त्याच्या अंगाशीं आला आणि या मोहबतखानाला आपल्या राजधानीची मोहब्बत तोडून कराचीला पसार व्हावें लागलें. भारताचें जुनागड भारतांतच राहिलें.

गिरिनगर हें जुनागडचें प्राचीन नांव शहरापुरतें लुप्त झालें, तरी तिथला डोंगर मात्र तें अजून चालवितो. गिरनार हा गिरिनगराचाच अपभ्रंश आहे. अशोकाने ज्याअर्थीं तिथे शिलालेख कोरला, त्याअर्थीं त्याच्या काळीं हें नगर वाजतें-गाजतें असलेंच पाहिजे. जुनागडला लागून एक भुईकोट किल्ला आहे. त्याला उपरकोट किल्ला म्हणतात. अशोकाच्याच काळांत या उपरकोटांत आणि त्याच्या आसपास बौद्धांनी आपले विहार खोदले होते. हा किल्ला आजमितीस ओसाड आहे; पण तरीहि तो दर्शनीय आहे. विशेषतः त्यांतल्या त्या दोन विहिरी! एक 'अडीचडी' आणि दुसरी 'नवघण.' या विहिरींचें पाणी त्यांची खोली पाहतां पाताळपाणीच म्हणायला हवें!

गिरनारला जायचें तर जुनागडपासून तीन मैल जायला हवें. सवड असल्यास बसची वाट पाहावी आणि घाई असल्यास टांगा ठरवावा. जुनागडांतून बाहेर पडतांना जी वेस ओलांडावी लागते, तिचें नांव वाघेश्वरी. तिथून पुढे दामोदर कुंड लागतें. सुवर्णरेखा नांवाच्या छोट्याशा नदीला बांध घालून हें कुंड बनविलें आहे. या कुंडांत भाविक लोक पितरांच्या अस्थी विसर्जन करतात. आख्यायिका अशी आहे, की इथल्या पाण्यांत टाकलेल्या अस्थी थोड्याच दिवसांत विरघळून जातात. कुंडालाच लागून वरच्या अंगाला दामोदराचें मंदिर आहे. तें निदान पांच शतकांइतकें तरी पुराणें खास आहे. इथूनच गिरनार पर्वत यात्रिकाला निमंत्रण देऊं लागतो.

पण त्याआधी तिथे जवळच असलेला अशोकाचा शिलालेखहि पाहून घ्यावा. हत्तींच्या पाटीसारख्या एका ऐसपैस शिळेवर अशोकाने तिथे आपल्या चौदा धर्माज्ञा कोरल्या आहेत. अशोकाच्या या धर्माज्ञांना त्या लालसर शिळेचा फक्त ईशान्यभाग तेवढा पुरला. उरलेली शिळा कोरी ठेवणें महाक्षत्रप राजा रुद्रदामन् याला बरें वाटलें नाही. त्यामुळे त्याने त्या

खडकाच्या माथ्यावर आपलाहि एक लेख कोरून टाकला. त्यापुढे आला स्कंदगुप्त. हा गुप्तवंशांतला सम्राट् होता. त्याने आपल्या राज्यपालाकरवीं शिळेच्या पश्चिम अंगास आपल्याहि आज्ञा अक्षरबद्ध केल्या. अशा प्रकारें त्या शिळेची पाटी भरून गेली. अलीकडे या ऐतिहासिक शिळेचें संरक्षण व्हावें म्हणून तिच्यावर इमारत बांधलेली आहे.

गिरनारच्या पायथ्यापर्यंत वाहनें येतात. पुढच्या डोंगरचढणीसाठी अनशापोटीं निघायचें नसेल, तर पायथ्याशी उदरभरणाची सोय आहे. परत येतांना घडीभर विसावायचें असेल, तर धर्मशाळाहि आहे. गिरनारवरील गोरखनाथाच्या शिखरापर्यंत पोंचायला ३६६६ फूट चढावें लागतें. तें काही सामान्य कर्म नव्हे. तरणींताठीं चढतील; पण 'बाळां वृद्धां सुदुर्बळां रंकां'ची वाट काय? पण त्याची काळजी करायचें कारण नाही. ज्याचा खिसा गरम असेल, त्याला तिथे डोल्या मिळतात. डोलीचा दर ठरतो, तुमच्या देहाच्या वजनावर. त्यासाठी तुम्हाला तिथे तुमची 'दगडतुला' करून घ्यावी लागते. एका पारड्यांत आपण बसल्यावर दुसऱ्या पारड्यांत ते वाटोळे दगड पडूं लागले, की तत्त्वार्थाने आपलें 'मूल्य' काय तें कळतें. हंसू येतें अशावेळीं!


ज्याला कोणाला डोलींतून जायचें नसेल, त्याने मात्र केवळ आपल्या पायांवरच विसंबूं नये. बांबूची जाडजूड काठी हस्तगत करून आपल्या शरीराला तिसरा पाय जोडावा.

## दण्डः करे स्थितो यस्मत्तस्माद्रक्ष यतो भयम्

हा उपनयनांतला मंत्र इथे जपावा हें बरें. अशा काठ्या तिथे भाड्यानें मिळतात.

स्कंदपुराणांत या प्रदेशाचें माहात्म्य वस्त्रापथक्षेत्र म्हणून वर्णित आहे. शिवाच्या अंगावरची छाटी या ठिकाणीं गळून पडली, म्हणून या क्षेत्राला तें नांव मिळालें. सदाशिव कैलास उतरून इथवर आला असेल. त्याच्या आधीच भक्तांचें अभीष्ट पुरें करण्यासाठी गिरनारवर येऊन स्थानापन्न झालेल्या अर्धांगी अंबिकेच्या दर्शनाची त्याला लगबग झाली असेल. आणि त्या घाईगर्दींत आपलें उत्तरीय अंगावरून केव्हा गळालें, याचें त्याला भानहि

राहिलें नसेल. तात्पर्य काय, शिवाची छाटी इथे पडली आणि आपल्या नांवाचें एक क्षेत्र निर्माण करून गेली.



गिरनारचा पायथा

गिरनारच्या पायथ्याशीं वस्त्रापथ महादेव आणि भवनाथ हे अमोरासमोर आहेत. तिथूनच गिरनारच्या चढणीला प्रारंभ होतो. वाहड नामक अणहिल-वाडच्या एका प्रधानपुत्राने या डोंगरावर सोपानपरंपरा निर्मून गिरनार सुगम केला आहे. देव त्याचें भलें करो! अर्थात् इथली सुगमताहि सापेक्षच समजायला हवी. कारण त्या पायऱ्या उंच आहेत, अरुंद आहेत. त्यामुळे त्या चढतांनाहि चांगलीच धाप लागते, नकळत कमरेवर हात येतात आणि कोरड्या होत जाणाऱ्या ओठांतून ' हु ऽ ऽ श्‌ ' असा श्रमदर्शक आवाज निघतो. म्हणून इथले यात्रेकरू बहुधा पहांटे चढणीला प्रारंभ करतात आणि सगळीं देवदर्शनें करून मध्यान्हापर्यंत जीव खाली आणून घालतात.

गिरनारशीं तीन धर्मसंप्रदाय निगडित आहेत -- शाक्त, दत्त आणि जैन. धार्मिक यात्रेकरूंत बहुसंख्या जैनांची असते. कारण पालिताण्याची शत्रुंजय यात्रा सुफळ संपूर्ण होण्यासाठी जैनांनी गिरनार चढायलाच हवा, असें जैन धर्मशास्त्र सांगतें.

तशीं या गिरनाराचीं शिखरें आहेत एकवीस; पण त्यांतलीं पांच यात्रेसाठी प्रसिद्ध आहेत अंबा, गोरख, औघड, गुरु अन् कालिका अशीं त्यांचीं नांवें आहेत. शिखराला इथे टूक म्हणतात. गिरनारच्या अर्ध्या चढणींत पहिली टूक भेटते तीं अंबादेवीची. तिथे तिचें प्रशस्त मंदिर बांधलेलें आहे. कैलासासारखें शिखर सोडून ती इथल्या टुकेवर राहायला आली, त्यावरून या स्थळाचें सौंदर्य आणि पावित्र्य ध्यानीं घ्यावें. तसें तें घेतलें गेलेंहि आहे. त्यामुळेच या स्थानाला बाव्वन्न शक्तिपीठांपैकी एक पीठ मानतात. सौराष्ट्रांतलीं कित्येक कुटुंबें लग्न झाल्यावर वधूवरांना देवीच्या पायावर घालण्यासाठी आवर्जून इथे आणतात.

दुसरें गोरक्षशिखर. हें सर्वांत उंच आहे. ही गोरखनाथाची तपोभूमि होय. त्याने कोण्या अज्ञात काळीं पेटवलेली धुनी अजूनहि तिथे दाखवतात. गोरक्ष हा असा एक महापुरुष आहे, की भारतांत आसेतुहिमाचल त्याच्या नांवाची कांही ना कांही तरी खूण सर्वत्र दाखविली जाते. सर्व भारतीयांना तो आपलासा वाटतो. आपल्याच प्रदेशांतलें त्याचें स्थान खरें, असें प्रपादण्याचीहि प्रवृत्ति दिसते.

गोरक्षानंतर येतें दत्तशिखर. इथे दत्तात्रेयाने तप केलें आहे. महापुरुषांचें जन्मस्थान पवित्र मानतातच; पण त्यांचें साधनेचें ठिकाण पवित्रतम समजतात. कारण तें साधकांना स्फूर्ति देतें आणि बरेंच कांही शिकवतें. इथे दत्ताच्या पादुका आहेत. स्थान रमणीय आहे.

दत्त आणि गोरक्ष या दोन शिखरांच्या मध्ये नेमिनाथ शिखर येतें. जैनांचें पवित्र स्थान तें हेंच. हें चढायला दुर्गम आहे. पायऱ्या नाहीत आणि रस्ताहि उखर पाखर, पण तरीहि माणसें बसत-उठत, आपटत-धोपटत तें स्थान गांठतात. या शिखरावर नेमिनाथाचें समृद्ध मंदिर आहे. तो जैनांचा बाव्विसावा तीर्थंकर होय. कृष्ण आणि बलराम यांचा तो चुलतभाऊ लागतो, असें जैन पुराणें सांगतात. कृष्णाच्या हातांत पांचजन्य असतो. नेमिनाथाचें अभिज्ञानचिन्हहि तेंच आहे. त्यावरून नेमिनाथाचें वैष्णवसंप्रदायाशीं नातेंगोतें सूचित होतें. इथली त्याची मूर्ति शाळिग्राम शिळेची आहे. काळा तुकीतुकीत असा तिचा वर्ण दिसतो आणि त्यावर जेव्हा रत्नालंकार झळकतात, तेव्हा तर तिचें दर्शन डोळ्यांना वेध लावतें.

हें मंदिर पहिल्याने बनलें तें लांकडाचें. तें जेव्हा डबघाईस आलेंसें वाटलें, तेव्हा जयसिंह सिद्धराजाच्या एका जैन मंत्र्याने तें दगडी बनवलें. त्यामुळे त्याला विस्तीर्णताहि आली. त्याचा सभामंडप बाव्वीस स्तंभांवर आधारलेला असून चांगला प्रशस्त आहे. हें देवस्थान किल्लेवजा आहे. याच्या सभोंवती साठ ओवऱ्या बांधलेल्या आहेत. वस्तुपाल–तेजपाल या बंधुद्वयाने त्याच आवारांत उभारलेलीं त्रिमूर्तींचीं मंदिरें भव्य तर आहेतच; शिवाय कलेच्या दृष्टीनेहि तीं देखणीं आहेत.

कालिकाशिखरावर एका काळीं अघोरी लोकांचा अड्डा होता, असें सांगतात. इथे 'रा' खेंगार आणि चूडासमा राजपूत या राजांचे भव्य प्रासाद होते. आज ते भग्न होऊन भूमीला शरण गेले आहेत. या राजांनी नऊ ते अकरा या शतकांत सौराष्ट्रावर राज्य केलें आणि आरामांत विश्रांति घेण्यासाठी इथे महाल उभे केले, असें इतिहास सांगतो.

श्रीकृष्णाच्या काळांतली या पर्वतावरची महत्त्वाची घटना म्हणजे सुभद्राहरण. तिच्या प्राप्तीसाठी अर्जुन कितीतरी दिवस त्रिदंडी संन्यास घेऊन द्वारकेच्या राजमहालांत तिचा जप करीत बसला होता. बलरामदादाचा तिथे दरारा असल्यामुळे या कृष्णसख्याचें कारस्थान तिथे तडीस जाईना. अखेर एक दिवस रैवतक पर्वताची यात्रा निघाली. द्वारकेच्या यादवांचा तो वार्षिकोत्सव होता. तिथल्या नरनारींच्या आनंदाचें तें एक महापर्व होतें. इतर स्त्रियांबरोबरच सुभद्राहि त्यांत सामील झाली आणि नेमकी अर्जुनाच्या हातांत पडली. तिला आपल्या रथावर ओढून अर्जुनाने जो रथ पळवला, तो थेट हस्तिनापुरांत. पराक्रम अर्जुनाचा; पण कावा कृष्णाचा. मात्र बलरामदादाने खडसावलें, तेव्हा त्याने सरळ आपल्या कानावर हात ठेवले.

असा हा पुराणप्रसिद्ध गिरनार किंवा रैवतक पर्वत! अजूनहि त्याचें महात्म्य कमी झालें नाही. कृष्णाच्या काळीं जशी इथली जत्रा भरे, तशीच ती आजहि भरते. कार्तिक शु. एकादशीस ही यात्रा भवनाथाच्या मंदिरापासून गिरनारच्या परिक्रमेला निघते आणि पौर्णिमेच्या दिवशीं ती परिक्रमा संपविते. सोरठी जनतेचा तो सोहळा अद्‌भुतरम्य असतो.

सोमनाथाला जाण्यासाठीं वेरावळ स्टेशनला उतरावें लागतें. वेरावळ आणि सोमनाथ यांत तीन मैलांचें अंतर आहे. सोमनाथ हा बारा ज्योतिर्लिंगातला पहिला. 'सौराष्ट्रे सोमनाथं च !' सोमनाथ आठवला, कीं अनेक विविध घटना डोळ्यांपुढे उभ्या राहतात. पण त्या सर्वांत खळाळून वर येते ती शके १८७३ च्या वैशाख शुद्ध पंचमीची घटना. कोण्याहि हिंदु माणसाला संतोष देईल, अशीच ती घटना होती.

## सोमनाथ पाटण

त्या दिवशीं पश्चिमसागराच्या तीरावरील त्या नवनिर्मित भव्योत्तुंग मंदिरांत भगवान् सोमनाथाची नव्याने प्रतिष्ठा व्हायची होती. तें शालिग्रामशिलेचें शिवलिंग राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शुभ हस्तें त्या मंदिराच्या गाभाऱ्यांत विराजमान व्हायचें होतें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतांत ज्या अनेक शुभघटना घडल्या, त्यांपैकी ही शुभतम घटना होती. त्यासाठी वैदिक, शास्त्री, पंडित, सोमनाथपाटणला पाचारले गेले होते. 'जलधाराप्रिय' अशा त्या महादेवाच्या पहिल्या महाभिषेकासाठीं भारतांतल्याच नव्हे; तर जगांतल्या पवित्र नद्या, सरोवरें आणि सागर यांचीं तीर्थजलें तिथे आणलीं गेलीं होतीं. त्या जलांचे शंभर 'अमृतकलश' भरून ठेवलेले होते. त्याच बरोबर पवित्र क्षेत्रांतली मृत्तिका वनौषधी, वालुका, रत्नें इत्यादि सामग्रीहि जमवली गेली होती.

प्रारंभिक सर्व विधि–विधान झाल्यावर डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी सपत्नीक पुढे होऊन सोमनाथाची प्रतिष्ठा केली. त्या क्षणीं मंगलतुरें झडलीं. वैदिकांच्या मुखांतून रुद्रसूक्तें उच्चैर्घोषाने उमटलीं. तिथे जमलेल्या समस्त जनतेने 'जय सोमनाथ' अशी एकमुखाने गर्जना केली. त्या गर्जनेंत पश्चिम सागरानेहि आपला सांद्र गंभीर घोष मिसळून टाकला. उर्वरित सर्व कृत्यें, सारे समारंभ होऊन तो सोमनाथ प्रतिष्ठेचा विधि सांगता पावला. भारतीय जनतेच्या अंतरांत शतकानुशतकें सलत राहिलेलें उद्ध्वस्त सोमनाथाचें शल्य, त्या दिवशीं उपटून निघालें. या सर्व घटनेमागे भारताचे पोलादी पुरुष म्हटले गेलेले सरदार वल्लभभाई पटेल यांची प्रेरणा होती. ती प्रेरणा कळसाला चढवून ते कृतार्थ झाले !

आज कोणीहि यात्रेकरू विशद अंतःकरणाने मूळच्याच जागीं स्थापित झालेल्या त्या सोमनाथाचें दर्शन घेऊं शकतो. इतकीं वर्षे त्याला केवळ त्या भग्न वास्तूचेंच दर्शन घ्यावें लागे. तें घेतल्यावर अंतरांत चरफडावें लागे. आणि दुधाची तहान ताकावर भागवण्यासाठी तिथून जवळच अहिल्याबाईने निर्माण करून ठेवलेल्या एका सामान्य शिवलिंगालाच सोमनाथ म्हणून प्रणाम करावा लागे.

असें सांगतात, कीं पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हिला सोमनाथाचा एके दिवशीं स्वप्नदृष्टान्त झाला. देव तिला म्हणाला कीं 'तूं माझें मंदिर बांध.' तिने ती ईश्वरी आज्ञा मानली. १७८७ सालीं तिने तिथें एक लहानसें मंदिर बांधलें. इतिहासाची पुनरावृत्ति होऊं नये, कोण्या ध्वंसक-हिंसकाची नजर सहजासहजीं देवावर पडूं नये, म्हणून तिने त्या मंदिरांत तळघर करून त्यांत सोमनाथ बसवला. तळघराच्या वर गाभारा बनवून तिथेहि एक लिंग बसवून ठेवलें. कांही बरेंवाईट व्हायचें, तर तें वरच्यावर होऊन जावें, हा त्यांतला हेतु ! त्या देवाची पूजाअर्चा करण्यासाठी मोंढे उपनामक एका महाराष्ट्रीय ब्राह्मणाला तिथे वृत्ति देऊन स्थायिक केलें. आजहि त्या ब्राह्मणाचे वंशज तिथे आहेत आणि या नवनिर्मित सोमनाथाचे पुजारी आणि व्यवस्थापक म्हणून त्यांचीच योजना झालेली आहे.

तसें पाहिलें तर या क्षेत्राचा इतिहास फार प्राचीन काळाला जाऊन भिडतो. चंद्र म्हणजे सोमराजा. त्याला दक्षाचा म्हणजे त्याच्या सासऱ्याचा शाप झाला. साधा सुधा नव्हे; तर 'तूं क्षयरोगी होशील' असा. सत्तावीस भार्यांपैकीं रोहिणीवर त्याने विशेष जीव जडवला, हा त्याचा अपराध. या शापाला उःशाप मिळावा म्हणून सोमराजा या क्षेत्रीं आला. त्याने इथे एक शिवलिंग स्थापून त्याची आराधना सुरू केली. सोमाने स्थापलें म्हणून तेंच पुढें सोमनाथ म्हणून प्रसिद्धि पावलें.

स्कंदपुराणांतलें प्रभासखंड हें याच क्षेत्राचा महिमा सांगण्यासाठी रचलें गेलें आहे. तिथे श्रद्धापूर्वक सांगितलें आहे, की या क्षेत्रांत अनंत काळापासून भगवान् शिवशंकराचा निवास आहे अन् पुढे अनंतकालपर्यंत तो राहणार आहे.

पण ज्या प्रकारचा कडवा, भंजक अन् दुःसह इतिहास या पुण्य क्षेत्राच्या


वांट्याला आला, तसा तो दुसऱ्या कोणत्याहि क्षेत्राच्या वांट्याला आला नसेल. केवढें वैभव या स्थानाचें ! केवढा गाजावाजा ! दर्यावर्दी उलाढाली करणारे व्यापारी व्यापाराला जातांना आपल्या धंद्याला बरकत यावी म्हणून सोमनाथाला नवस करीत. 'बाराचे सोळा' करून आले, कीं प्राप्तींतला काही अंश सोमनाथाला समर्पण करीत. देवाच्या पुढे सोन्या मोत्यांच्या, हिरे माणकांच्या राशी पडत. मग पिंडीखालच्या तळघरांत ती झगमगती लक्ष्मी आपलें आसन घट्ट करून बसे. वर्षानुवर्षें तिच्यांत सारखी भर पडत राही.

जुन्यांत जुन्या अशा त्या मंदिराचा गाभारा अष्टकोनी होता. त्याच्या पुढे प्रशस्त सभामंडप होता. त्याला रत्नजडित ५८ स्तंभ होते. हजारो माणसांनी एका वेळीं देवद्वारीं बसावें अन् तिथले देवाचे सोहळे डोळे भरून पाहावे. देवळाच्या भिंती बारीक नक्षीकामाने भरलेल्या होत्या. दगडांवरची, खांबांवरची, कलाकुसर मन वेधून घेणारी होती. गाभाऱ्यांत रत्नदीप प्रकाश उधळीत होते. कित्येक मूर्ती अशा होत्या, की त्यांच्या उदरांत हिरे-माणकें भरलेलीं होतीं. सोमनाथाच्या स्नानाला रोज काशीहून गंगाजल यायचें. काश्मीरहून सुवासिक फुलें यायचीं. मंदिरांतली प्रचंड घंटा वाजवण्यासाठीं २०० मण सुवर्णाची शृंखला त्याच्या लोळयाला बसवलेली होती. इथलें सारें काही अद्भुत होतें, अवर्णनीय होतें.

बारा मास सोमनाथाची यात्रा असायची. हजारों माणसें प्रत्यहीं यायचीं. पितरांसाठीं तिथे श्राद्धें करायचीं. एक हजार ब्राह्मण दर्भ अन् पूजासाहित्य घेऊन यात्रेकरूंचें धर्मकृत्य पार पाडण्यासाठी कंबर बांधून असायचे. तीनशें न्हावी यात्रेकरूंचें क्षौरकर्म उरकायला एका विशिष्ट जागीं बसलेले असायचे. मंदिरांत अष्टौप्रहर वेदपठण, पुराण, कीर्तन, नृत्य, गायन, कांहीना कांही चालू असायचें. दिवसाचे आठहि प्रहर सेवेंत समाप्त व्हायचे.

पण सोमनाथाचें हेंच दिगंतकीर्तीचें वैभव इस्लामी आक्रमकांच्या डोळ्यांवर आलें. त्या वैभवासाठीच त्यांची वखवखती नजर या क्षेत्रावर पडली. पहिल्याने चालून आला तो गजनीचा महंमूद ! आपलें कडवें विध्वंसक दलबल घेऊन ते या क्षेत्रावर आदळला. मंदिराच्या संरक्षकांनीं त्याच्याशीं मुकाबला केला; पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. समोर आले त्यांना कंठस्नान घालीत आणि त्या प्रेतांच्या राशी तुडवीत महंमूद मंदिरांत

घुसला. एकच घण किंवा गदा त्या शिवलिंगाचें वज्रप्रहरण ठरली. तेवढ्यानेच लिंगाचा चकनाचूर झाला. त्याने सगळा गाभारा फोडला. तळघरांतली सारी संपदा खोऱ्यांनी उपसली. येतांना तो कफल्लक आला होता; पण जातांना नगदनारायण बनून परत स्वदेशीं गेला.



सोमनाथ मंदिर

असें एकदा नव्हे, दोनदा नव्हे, अनेकदा घडलें. शतकांशतकांच्या अंतराने घडलें. अखेरचा हल्ला झाला त्या कट्टर हिंदुद्वेष्ट्या औरंगजेबाचा. त्याने प्रथम या देवासमोर गोवध केला. तसें करून हिंदूंच्या काळजाला डाग घातला. आणि शेवटीं मंदिर उभ्याचें आडवें करून कृतार्थता मानली. मंदिरांतलें जडजवाहिर त्याच्या मागून दिल्लीस चालतें झालें. जाग्यावर उरले ते कोरीव, घडीव दगड ! एकावर अनेक अशी त्यांची केवळ रास !

आजहि ते जुने दगड त्याच आवारांत दिसतात. त्यांवरच्या चित्राकृती आजहि तो जुना आगलावा इतिहास मुक्या ओठांनी सांगतात. आजच्या मंदिराचें आवार प्रशस्त आहे; पण अजून तें ओकें अन् रितें आहे, अभावात्मक आहे. कांही दिवसांनी तिथे कारंजीं उडणार आहेत. बागशाही फुलणार आहे. आणि पश्चिम समुद्राच्या त्या अवखळ लाटा हळूच तटावरून डोकें वर काढून तें फुलतें सौंदर्य बघणार आहेत. तशा योजना चालू आहेत.

क्षेत्रपरिसरांत हिंडतांना त्रिवेणीसंगमावर अवश्य जावें. हिरण्या अन् कपिला या दोन लघुसरिता इथे सागराला मिळाल्या आहेत. सरस्वती अर्थात्

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 33,६८२ दि.
क्रमांक नों. दि.

गुप्त आहे. त्यामुळे या संगमाला त्रिवेणीसंगम म्हणतात आणि भाविक लोक तिथे स्नानहि करतात. त्यांतल्या हिरण्या नदीच्या कांठीं एक स्थान आहे, त्याला देहोत्सर्ग म्हणतात. भगवान् योगेश्वर श्रीकृष्णाने तिथें आपली जीवनलीला समाप्त करून निजधामाला गमन केलें. इथे त्याच्या जड भौतिक देहाला अग्निसंस्कार झाला. त्या चितास्थानीं एक चौथरा बांधलेला असून त्यावर अश्वत्थवृक्ष लावलेला आहे. तिथे उभें राहिलें, की मन शिरशिरतें. हृदयांत स्पंदनें सुरू होतात. सारें महाभारत मनश्चक्षूंसमोर उभें ठाकतें. श्रीकृष्णाचें सारें अवतारकृत्यच असामान्य होतें, लोकोत्तर होतें. तो परब्रह्माचा पूर्णावतार भारतभूमीला सनाथ करून गेला. एक शाश्वत तत्त्वज्ञान देऊन गेला. त्याच्या चितास्थानावरचा तो अश्वत्थवृक्ष पाहतांना गीतेंतला पंधरावा अध्याय स्मरणांत शिरतो. पुरुषोत्तम योगाचा तो अध्याय असून त्याचा उपक्रम करताना देवाने या समग्र विश्वावर ' उर्ध्वमूल अधः शाख ' अशा अश्वत्थाचें भव्य रूपक केलें आहे. पुरुषोत्तमयोग म्हणजे श्रीहरीचें तें संक्षिप्त आत्मचरित्रच होय.

इथे हिरण्या नदीला छोटासा घाट बांधलेला आहे. तिथून खालीं उतरावें, स्नान अथवा मार्जन करावें आणि वर येऊन भगवंताच्या त्या चिताभूमीवर विनीत भावाने मस्तक ठेंगणें करावें.

बलराम हा श्रीकृष्णाचा थोरला बंधु. तोहि शेषाचा अवतारच. त्याने विचार केला, की ' वरिष्ठाच्या आधी कनिष्ठाचें जाणें ' हें बरें नव्हे. आपण कृष्णाच्या आधीच आपला गाशा गुंडाळावा. म्हणून त्यानेहि पश्चिम सागराच्या कुशींत शिरून लाटांच्या तांडवांत आपली अवतारसमाप्ति केली. अशा रीतीने तीं दोन्ही दिव्य जीवनें इथे समाप्त झालीं. प्रभासपाटणाला त्यांनी अलौकिकत्व मिळवून दिलें. बलरामाच्या अवतारसमाप्तीचें तें ठिकाण तिथे एका गुहेच्या रूपाने खोलगट भागांत दाखवितात. आजमितीस त्या ठिकाणीं एक प्रशस्त असें गीतामंदिर बांधलें जात आहे. एवढ्या अवधींत तें पूर्णहि झालें असेल. कुरुक्षेत्राप्रमाणेच इथेहि गीतामंदिर अवश्य हवें होतें. ती गरज आज पूर्ण होत आहे.

तिथून पुढे जावें भालुकातीर्थाला. हें तीर्थस्थान वेरावळ आणि सोमनाथ पाटण यांच्यामध्यें जरा आडरस्त्याला शेतमाळावर आहे. व्याधाचा बाण

श्रीकृष्णाच्या चरणाला तिथेंच लागला. तिथे श्रीकृष्णाची एक मूर्ति करून बसविली आहे. तिचा उजवा पाय गुडघ्यावर टेकलेला आहे. तिथेंच पद्मकुंड नांवाचें एक कुंड आहे. श्रीकृष्णाने बाणाच्या जखमेंतून भळभळा वाहणारें रक्त या कुंडांत धुतलें, असें सांगतात.

## द्वारका

सोमनाथपाटणनंतर त्याच किनाऱ्यावर श्रीहरीची द्वारका येते. तिला पाय लावल्याशिवाय सौराष्ट्राची यात्रा पुरी होऊंच शकत नाही. ती अयोध्या मथुरा माया, इत्यादि सप्त पुऱ्यांमध्ये येते अन् चारी धामांतहि गणली जाते. त्यामुळे तिथे नित्याची यात्रा असते. द्वारका हें तसें मोठें शहरहि नाही आणि जें आहे तें विशेषसें प्रसन्नहि नाही. ज्या गोमतीच्या तीरावर तें वसलें आहे, तिचा परिसरहि तसा प्रेक्षणीय नाही. सोमनाथ पाटणला जसा एक मानसोल्लास वाटतो, तसा तो द्वारकेंत मुळींच वाटत नाही. पण माणसें जातात तीं शहर पाहायला नव्हे; तर द्वारकाधीशाच्या दर्शनाला आणि आपला मोक्षमार्ग निष्कंटक करायला. द्वारकेंत पाऊल ठेवतांना भाविक माणसाच्या मनश्चक्षूंपुढे समग्र कृष्णचरित्र तरळत असतें. द्वारकेविषयींच्या रसभरित पुराणकथांतच तो मग्न असतो.

साक्षात् योगेश्वर श्रीकृष्णाने विश्वकर्म्याच्या हस्तें निर्मिलेली ही नगरी. 'सोन्याची द्वारका' ही तिची पदवी. समुद्रांत उभारली, हें तिचें अद्भुतपण! ती निर्माण करायला कारणहि तसेंच बलवत्तर घडलें. कृष्ण आणि त्याचे ज्ञातिबांधव असलेले उग्रसेनादि यादव हे तत्पूर्वी मथुरेचे राज्यकर्ते होते. त्यांच्यावर कंसाचें सावट पडलें आणि त्यांना हीनदशा आली.

श्रीकृष्णाने त्या कंसाचें कंदन केलें आणि तत्कालीन राजकारणाचीं चक्रें गरगरां उलट सुलट फिरलीं. मगधसम्राट् जरासंध हा कंसाचा सासरा. जावयाच्या वधामुळें तो खवळला आणि मथुरेवर दळभारासह लोटला. पुढे एक असा बांका प्रसंग आला, की एका बाजूने जरासंध अन् दुसऱ्या बाजूने कालयवन असें मथुरेवर दुहेरी आक्रमण झालें. त्यामुळे मथुरा जणूं खिंडींत सांपडली. मथुरेचा पाडाव होणार हें तर ठरलेंच; पण त्याहून अधिक म्हणजे समस्त यादवांचें जीवनच संशयांत पडलें.


यादवांचा नेता श्रीकृष्ण ! त्याने प्राप्त परिस्थितीचा साकल्याने विचार केला. तूर्तचा काळ आपल्याला प्रतिकूल आहे, हें त्याला पक्कें भावलें आणि मग वेळ न दवडतां त्याने मथुरेंतून समस्त यादवांचें निर्वासन केलें. त्यांना घेऊन राजस्थानमार्गें तो थेट पश्चिम सागराला येऊन भिडला. त्या सागरांतल्या एका प्रशस्त बेटावर त्याने एक नवी नगरी निर्माण केली आणि तिथे सर्व यादवांची व्यवस्था लावली. श्रीकृष्ण द्वारकेचा अनभिषिक्त राजा झाला. कालयवनाबरोबर झालेल्या युद्धांतली अमाप लूट, येतांना त्याने द्वारकेंत आणली होती. ती त्याला या नगरांतले समृद्ध, सुंदर आणि भव्य असे वाडे हुडे बांधण्याच्या कामीं उपयोगीं पडली. द्वारकेचा विस्तार बारा योजनें होता असें सांगतात. नारद एकदा तिथे गेला तेव्हा त्याला तिथे नवलाख घरें दिसलीं, असें पुराणें सांगतात. सव्वालाख सोनेरी पताका तिथे फडकत होत्या, असेंहि वर्णन आहे.

श्रीहरीने इथे सर्व प्रकारचे राजविलास भोगले. इथेच त्याने आपले पहिले आठ विवाहसमारंभ साजरे केले. विदर्भकन्या रुक्मिणी ही त्याची पट्टराणी झाली. इथूनच त्याने हस्तिनापुरचें कौरव-पांडवांचें सगळें राजकारण चालवलें. इथूनच हस्तें परहस्तें भूभारहरण केलें. श्रीकृष्णाचा पुत्र, पौत्र, प्रपौत्र असा वंशविस्तर इथेच झाला. पुढे प्रभासक्षेत्रीं त्याने अवतारसमाप्ति केल्यावर समुद्र चहूंबाजूंनी वाढून आला आणि त्याने द्वारकेला आपल्या उदरांत घेतलें.

आजचें द्वारकेंतलें श्रीकृष्णाचें मंदिर त्याचा नातू वज्रनाभ याने बांधलें असें समजतात. तें गोमतीच्या तीरावर आहे. इथे देवाला श्रीकृष्ण म्हणत नाहीत, राधाकृष्णहि म्हणत नाहीत. इथलें त्याचें नांव आहे 'रणछोड.' नांवाचा अर्थ स्पष्ट आहे. जरासंधाचें रणांगण सोडून आला, पळून आला म्हणून तो रणछोड ! वस्तुतः हा शब्द निंदाव्यंजकच आहे. एखाद्या मर्द माणसाला रणछोड म्हटलें, तर तें त्याला हिणवल्यासारखेंच होईल. रणांगण सोडून पळणें म्हणजे केवढी नामुष्की ! भारतीय परंपरेला रणांगणांत मरण मान्य आहे; पण पलायन मंजूर नाही. पण त्या योगेश्वर श्रीकृष्णाला तो अपशब्दहि बिरुदच ठरला. अलौकिक पुरुषांच्या बाबतींत शब्दांनाहि आपले अर्थ बदलावे लागतात, हेंच खरें !

रणछोडजीचें हें मंदिर भव्य आहे, उत्तुंग आहे. याचें जोतेंच मुळीं

९० X २० फूट आहे. मंदिराची उंची १७० फूट मोजलेली आहे. या उंचींत सात मजले उभारलेले आहेत. मंदिराला चार द्वारें आहेत. प्रदक्षिणामार्ग दोन भिंतींच्या मधून आहे. सभामंडपाला ६० खांब आहेत, मंदिरांत रजतपीठावर श्यामवर्णाचा चार फूट उंचीचा रणछोडजी उभा आहे.



द्वारकाधीशाचें मंदिर

लाखांचें जडजवाहिर त्याच्या अंगावर रुळत आहे. सोन्याची द्वारका बुडाली; पण देवाचें वैभव अजून कायम आहे. धाकटया भावाला मंदिरांतलें मुख्य स्थान देऊन बलराम सभामंडपाच्या एका कोपऱ्यांत जाऊन बसला आहे. वरच्या मजल्यावर अंबादेवीने आपली जागा निवडली आहे. जवळच्याच दुसऱ्या एका चौकाच्या वाड्यांत श्रीकृष्णाच्या रुक्मिणी, सत्यभामा इत्यादि अष्टनायिकांनी आपली जागा मुक्रर केली आहे. मंदिरावर विशेषशी कला-

कुसर नाही. भिंतीवर कांही हत्ती आणि माणसें कोरलेलीं दिसतात. त्यांना पंख आहेत, हें त्यांचें वेगळेपण. हा असीरियन शिल्पकलेचा प्रभाव आहे, असें म्हणतात.

मंदिराच्या दक्षिणेस देवाचें भांडार आहे. त्यावर तिथल्या शारदापीठाचें नियंत्रण आहे. शंकराचार्यांनी भारताच्या चारी दिशांना चार धर्मपीठें वेगवेगळ्या नावांनी स्थापलीं आणि त्यांच्याद्वारें अखिल भारताचें धर्मकारण चालवलें. त्यांतलेंच पश्चिमेचें हें शारदापीठ होय. आचार्यांनी इथे चिंतामणि-मंत्राने शारदाम्बेची आराधना केली. तिने त्यांना साक्षात् दर्शन दिलें. ती त्यांच्या जिव्हाग्रीं वसली. आचार्य तिच्या प्रसादामुळे चारी दिशांत विजयी झाले आणि एका नव्या दर्शनाचे प्रणेते बनले. त्यांनी इथे शारदेची प्रतिष्ठा-पना केली व तिथल्या पीठावर सुरेश्वराचार्यांची म्हणजे पूर्वाश्रमींच्या मंडन-मिश्र पंडितांची नेमणूक केली. इथली आचार्यपरंपरा याच सुरेश्वराचार्यांची आहे. त्यांच्यापासून आतापर्यंत ७८ आचार्य त्या पीठावर बसले आहेत. रामानुज, मध्व, वल्लभ, हे वैष्णव आचार्य आणि ज्ञानेश्वर, चैतन्य हे संतशिरोमणि या क्षेत्राची यात्रा करून आणि कांही काल क्षेत्रवास करून गेले होते. साध्वी मीराबाई तर घर सुटल्यावर इथेच श्रीहरीच्या सान्निध्याला येऊन राहिली. ‘ पग घुंगरू बांध मीरा नाची रे ’ ही गोष्ट याच मंदिरांत घडलेली आहे.

दंड, मुंड, दम हें इथलें यात्राविधान ! दंड म्हणजे यात्राकर भरणें, मुंड म्हणजे क्षौर करणें आणि दम म्हणजे अंगावर तप्तमुद्रा घेणें. तिसऱ्या म्हणजे तप्तमुद्रा घेण्याच्या विधानाला गायकवाड सरकारने कायद्याने बंदी केली आहे आणि तो जळता प्रकार आता इतिहासजमा झाला आहे. संस्थानें विलीन होण्याच्या पूर्वी द्वारका ही गायकवाडीच्या अमलाखाली होती, ही गोष्ट आता हळूहळू विस्मृतप्राय होणार आहे. इथले रणछोडजीचे सगळे पूजोपचार रामानुजाचार्यांनी घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणे चालतात.

द्वारकेंत अशीं अनेक मंदिरें होतीं. पण देशांत अनेक ठिकाणीं जें घडलें, तेंच इथेहि घडलें, यवनांचा विध्वंसक हात इथेहि पडला आहे. १४६० सालची गोष्ट. त्या सुमारास सुलतान महंमूद बेगडा हा अहमदाबादच्या गादीवर आला होता. रानटी बैलाला सौराष्ट्रांत बेगडा म्हणतात. हा


महंमूद तशा बैलाच्या शिंगासारख्या लांब मिशा ठेवीत असे, म्हणून त्याला लोक बेगडा म्हणूं लागले. हा अहमदाबाद सोडून जुनागड येथे राहत असे. सौराष्ट्राची हवा त्याला चांगली मानवत होती, हें त्याचें कारण. याने विजयहि खूप मिळविले आणि हिंदूंचा छळवादहि खूप केला. याची सासुरवाड होती सिंधमध्ये. एक दिवस जुनागडहून समुद्रमार्गाने आपल्या सासुरवाडीस जात असतां द्वारकेंतल्या मंदिरांचीं उत्तुंग शिखरें समुद्रांतूनच त्याला दिसलीं. तीं जणूं त्याच्या डोळ्यांतच घुसलीं. आपल्या मार्गांत हिंदूंचें असलें 'अवलक्षण' दिसावें, म्हणजे काय गोष्ट आहे! लगेच त्याने हुकूम सोडला. 'हीं शिखरें जमीनदोस्त करा!'

आणि थोड्याच दिवसांत त्याच्या हुकुमाची तामिली झाली. द्वारकेंत मंदिरें राहिलीं; पण तीं शिखरहीन अवस्थेंत. पुढे आले इंग्रज. या देशावर हळूहळू त्यांची सत्ता स्थापन झाली. आश्चर्याची गोष्ट ही, की अर्धवट उभ्या असलेल्या या मंदिरांचा पुरा विध्वंस इंग्रजांनी केला. बेगडाचा हेतु धार्मिक तर इंग्रजांचा राजकीय.

सौराष्ट्रांत वाघेर नांवाची एक जात आहे. यांना काबा असेंहि म्हणतात. श्रीकृष्ण निजधामाला गेल्यावर आणि द्वारका समुद्रांत बुडण्याच्या वेळीं अर्जुन हस्तिनापुराहून द्वारकेंत आला होता. श्रीकृष्णाच्या उरल्यासुरल्या स्त्रियांना घेऊन तो हस्तिनापुराकडे निघाला असतां वाटेंत त्याला हे काबा लोक भेटले. त्यांनी अर्जुनाचा पराभव केला आणि कृष्णस्त्रियांना पळवून नेलें. ज्या कुलीन सुकुमार नारींना श्रीकृष्णाचा अंगसंग घडला होता, त्यांनाच विपरीत काळीं या काबा लोकांच्या घरीं दासीबटकी म्हणून जीवन कंठावें लागलें. कालाचें महिमान अगाध म्हणतात तेंच खरें!

त्याच काबा लोकांचे वंशज म्हणजे हे वाघेर. लूटमारीची प्रवृत्ति पिढ्यान्-पिढ्या त्यांच्या रक्तांतच मुरली होती. ते समुद्रावर चांचेगिरीहि करीत. ओखामंडळ म्हणजेच द्वारकाप्रदेश हा त्यांचा बालेकिल्ला होता. एकोणि-साव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत सिंध-सौराष्ट्रांत समुद्रतीरावर त्यांचेंच राज्य होतें, म्हटलें तरी चालेल. देखणे, उंचनिंच आणि कसल्याहि काबाडकष्टांना न डरणारे असे हे लोक आहेत. यांच्यांत हिंदू आहेत, तसेच मुसलमानहि आहेत.

इ. स. १८१६ मध्ये ब्रिटिश फौजांनी यांच्याकडून ओखामंडळ जिंकून घेतलें. वाघेर द्वारकेंतल्या मंदिरांच्या आश्रयाने राहत, म्हणून तीं मंदिरेंहि पाडून टाकलीं. जिंकलेला प्रदेश ब्रिटिशांनी गायकवाडांना देऊन टाकला.



रणछोडजीची मूर्ति

वाघेर प्रथम थोडे दबले; पण पुन्हा बंड करून उठले. त्यांनी गायकवाड सरकारच्या फौजांना सळो का पळो करून सोडलें. उभ्या सौराष्ट्रांत त्यांनी एकच दंगल उठवून दिली. शेवटी महाप्रयासाने इ. स. १८७३ साली ब्रिटिशांनी त्यांना वठणीवर आणून सौराष्ट्रांतला त्यांचा उपद्रव शांत केला. पुढे ब्रिटिशांनी पाडलेलीं इथलीं सर्व मंदिरें गायकवाडसरकारने पुन्हा उभारलीं. आजमितीस त्याच मंदिरांचें दर्शन यात्रेकरूंना घडतें.

या भागांत अशा अनेक छोट्या छोट्या द्वारका आहेत. रणछोडजीची द्वारका ही गोमतीद्वारका. याशिवाय बेटद्वारका म्हणून एक क्षेत्र आहे. तें द्वारकेपासून १८–२० मैलांच्या अंतरावर येतें. ओखा बंदरांतून होडीने या बेटद्वारकेला जावें लागतें. कच्छच्या खाडींत हें क्षेत्र निर्माण झालें आहे. इथलीं प्रसिद्ध मंदिरें दोन: एक रणछोडजी आणि दुसरें शंखनारायण. मत्स्यावतार घेऊन शंखासुराचा वध करणारा आणि त्याने चोरलेले वेद परत मिळविणारा श्रीविष्णु, तोच हा शंखनारायण होय.

या बेटावर कित्येक लहानमोठे तलाव आहेत. द्वारकेला रामानुजपद्धतीने पूजोपचार चालतात; तर बेटद्वारकेंत ते वल्लभपंथाच्या पद्धतीने चालतात. इथली रणछोडजीची मूर्ति थेट द्वारकेच्या मूर्तीसारखीच आहे; पण ती शिळेची नसून मातीची आहे. दुसरें वेगळेंपण म्हणजे तिला डोळे नाहीत. देवस्थान श्रीमंत आहे. म्हणूनच देवाला दिवसांतून तेरा वेळां भोग मिळतो आणि नऊ वेळां त्याची आरती होते. इथे गंधापेक्षा गोपीचंदनाची प्रतिष्ठा विशेष! गोपीचंदन म्हणजे बेटांतल्याच गोपीतलावांतली माती होय. द्वारका ही भुक्ति-मुक्तिप्रदायिनी आहे. तें श्रीहरीचें परमधाम आहे. वैकुंठाधिपति भगवान् इथे सोळा कला आणि बारा मूर्ती धारण करून वास्तव्य करतो. द्वारकेची यात्रा करणें, म्हणजे जन्माचें सार्थक करणें!

## डाकोर

डाकोरला गेल्यावांचून द्वारकेची यात्रा सफळ होत नाहीं, असा संकेत आहे. डाकोरला देव आहे, तोहि रणछोडजीच. द्वारकेंतूनच तो तिथे गेला आहे. डाकोरचे लोक समजतात, की खरा रणछोडजी आपल्या इथेच आहे. द्वारकेला आहे ती त्याची नक्कल होय. आणि या गोष्टीला पुरावा म्हणून ते एक कथा सांगतात व तत्संबंधीं कांही स्थळेंहि दाखवितात–

बोडाणा नांवाचा एक राजपूत होता. तो द्वारकेच्या रणछोडजीचा भक्त होता. हातावर तुळशीचा रोपा घेऊन तो वर्षांतून दोनदा द्वारकेची वारी करी. त्या रोप्याचें तुळशीपत्र, तुलसीप्रिय भगवंताला अर्पण करून स्वत:ला धन्य समजे. ही वारी करताकरतांच तो म्हातारा झाला. त्याचें वार्धक्य बहात्तरीला येऊन थडकलें. त्या वर्षाच्या वारींत तो खूप थकला. देवापुढे

बसून त्याने दीनवाणीने म्हटलें, 'भगवंता, आता नाही चालवत. यापुढे तुझें मेघश्याम लावण्यरूप मला अंतरणार!'

त्या रात्रीं त्याला देवाचा दृष्टान्त झाला. 'माझ्या प्रिय भक्ता, यापुढे तूं येऊं नकोस; मीच तुझ्याबरोबर डाकोरला येतों. उद्या मध्यरात्रीं सारें सामसूम झाल्यावर तूं मला इथून घेऊन जा!'

बोडाण्याने दुसऱ्या रात्रीं तसें केलें. रणछोडजीची मूर्ति बैलगाडींत ठेवून तो डाकोरच्या रोखाने भरधाव निघाला. गुगळी ब्राह्मण हे द्वारकेचे पुजारी. ते पहाटे पूजेला देवळांत आले, तर गाभाऱ्यांत मूर्तीच्या नांवाने शून्याकार! ही बातमी हां हां म्हणतां सगळीकडे पसरली. सारी द्वारका घाबरली, गडबडली. प्रत्येक जण म्हणूं लागला, 'अद्‌भुत, अद्‌भुत!' मग त्यांतल्याच कोण्यातरी शहाण्याने म्हटलें.

"अद्‌भुत कसलें? हें त्या म्हाताऱ्या राजपुताचें काम आहे. त्यानेच रणछोडजीची मूर्ति गुंडाळली."

बोडाणा द्वारकेंत कुठे दिसेना; तेव्हा सर्वांना त्याचें बोलणें पटलें. लगेच त्या गुगळी ब्राह्मणांनी बोडाण्याचा पाठलाग आरंभिला. ते माग काढीत काढीत थेट डाकोरला येऊन भिडले. पण बोडाणा वस्ताद होता. त्याने ती मूर्ति तिथल्या गोमती तलावांत बुडवून ठेवली. ब्राह्मणांनी विचारलें, तेव्हा त्याने कानावर तुळशीपत्र ठेवलें. गुगळी ब्राह्मणांना त्या गोष्टीचा संशय आलाच. त्यांनी तो तलाव धांडोळला आणि मूर्ति शोधून वर काढली. एवढ्यांत बोडाण्याची धर्मपत्नी कांपत, लटपटत तिथे आली. ती त्या ब्राह्मणांना म्हणाली.


"ब्रह्मवृंद हो! मला देवाचा दृष्टान्त झाला आहे. देव इथून हालायला तयार नाही. त्यानें मला सांगितलें आहे, की तूं द्वारकेच्या ब्राह्मणांना माझ्या भारंभार सोनें दे."

द्वारकाधीशाचा दृष्टान्त! ब्राह्मणांना तो मानावाच लागला. त्यांनी विचार केला. 'देव नाही तर नाही; निदान सोनं तरी मिळेल? देवाच्या भारंभार सोनं, म्हणजे तें कांही थोडंथोडकं भरणार नाही. तें वांटून घेतलं तर आपली जन्माची ददात मिटेल.' त्यांनी लगेच तराजू उभा केला. एका पारड्यांत देवाची मूर्ति ठेवली आणि बोडाण्याच्या बायकोला म्हटलें.

"आण तुझं सोनं !"

ती कमरेंत वाकलेली, फाटक्या लुगड्यांतली, कंगाल बाई लगेच आपल्या नाकांतली सोन्याची वाळी काढूं लागली. ब्राह्मण म्हणाले.

"तुझं गुंजभर सोनं मूर्तीच्या पासंगाला तरी पुरेल का ? भिकारडी कुठली ! देव हवा ना ? जा मग, गांवांतल्या शेठसावकारांच्या बायकांचे त्रिनलाखी दागिने उतरून आण !"



**मंदिरें आणि तलाव-डाकोर**

एवढ्यांत तिने ती वाळी दुसऱ्या पारड्यांत टाकलीच. आणि काय आश्चर्य ! एकाएकीं देवाचें पारडें वर गेलें.

## रुक्मिणीने एक्या तुलसीदलाने गिरिधर प्रभु तुळिला !

तसें पुन्हा एकदा घडलें. गुगळी ब्राह्मण हिंपुटी होऊन बसले. देवहि नाहीं आणि सोनेंहि नाही, असे दोन्ही बाजूंनी ते नागवले होते. आता द्वारकेंत जायला त्यांना तोंड नव्हतें. ते तिथेच बसले. त्यांनी तिथे प्राणांतिक प्रायोपवेशन आरंभिलें. अखेर त्यांनाहि देवाचा दृष्टान्त झाला.

"तुम्ही द्वारकेला चला, सहा महिने वाट पाहा. सहा महिन्यानंतर तिथल्या सावित्रीकूपांत माझी मूर्ति तुम्हाला मिळेल. ती गाभाऱ्यांतल्या पीठिकेवर बसवा आणि तिची पूजाअर्चा चालू करा."

देव आणि बोडाणा यांनी घडवून आणलेल्या या प्रसंगावर गुजराती भाषेंत किती तरी छोटीं मोठीं काव्यें निर्माण झालीं आहेत. या काव्यांचा मागोवा घेत भूतकालाकडे जातां जातां ही घटना इ. स. ११९५ मध्ये घडली, असें वाटतें.

डाकोर क्षेत्र आणंदपासून १९ मैलांवर वसलें आहे. तें रेल्वेचें स्टेशन आहे. डाकोरनाथाचें आजचें मंदिर रा. गोपाळ जगन्नाथ टेंबेकर यांनी इ. स. १७७२ मध्ये बांधलें. हा गृहस्थ साताऱ्याचा म्हणजे महाराष्ट्रीय होता आणि तो पेशव्यांचा कारभारी किंवा सावकार असा कोणीतरी होता. त्यापूर्वी डाकोरनाथ गोमती तलावाच्या काठीं एका लहानग्या मंदिरांत होता. भक्तांच्या आणि यात्रेकरूंच्या जमावाला तें स्थान अपुरें पडूं लागलें आणि म्हणून टेंबेकराने लाख रुपये खर्चून हें नवें मंदिर उभारलें. डाकोरमधली सर्वश्रेष्ठ वास्तु हीच ! हें मंदिर विशाल आणि उत्तुंग आहे. एका उंच चौथऱ्यावर तें उभारलें आहें. त्यांत एका उच्च पीठिकेवर डाकोरनाथाची चतुर्भुज मूर्ति पश्चिमाभिमुख उभी आहे. पुढे खुलें प्रांगण आहे. सभोंवती प्रदक्षिणेसाठो प्रशस्त रस्ता आहे. इथलें वैशिष्ट्य हें, की कोणालाहि गाभाऱ्यांत जातां येतें आणि देवाच्या चरणांना स्पर्श करतां येतो. या देवस्थानाला राजे-रजवाडे आणि सरदार-जहागिरदार यांनी जमिनी लावून दिल्या आहेत. डाकोर हें गांव तर देवाचेंच आहे. त्यामुळे डाकोरनाथ 'कनकनारायण' बनला आहे. २२ रोटले, रत्तलाच्या वजनाचे ५, मध्यम आकाराचे २० आणि बारीक आकाराचे १२ इतके लाडू, १ रत्तल लोणचें आणि २ शेर मसाल्याचें दूध, ही या देवाची नुसती सकाळची न्याहारी आहे. यावरून दुपार-संध्याकाळच्या भोजनाची कल्पना करा.

हें वैष्णव क्षेत्र आहे; पण कुठल्याहि एका पंथाचें नाही. त्यामुळे वैष्णवांतल्या सर्व पंथोपपंथांचे लोक सारख्याच भक्तिभावाने इथे यात्रेला येतात. यात्रा बारमहा अखंड चालू असते. इथला गोमतीतलाव प्रशस्त आहे आणि भरलेला आहे. त्याच्या कांठावर, देवाची तुला केली ती जागा दाखवितात.

डाकोरला आजवर केवळ यात्रेचें ठिकाण म्हणूनच महत्त्व होतें. पण यापुढे त्याला शैक्षणिक महत्त्वहि लाभणार आहे. श्री. कन्हैयालाल मुन्शी यांची भारतीय विद्याभवन ही संस्था डाकोरला एक प्रचंड महाविद्यालय उभार-

ण्याच्या प्रयत्नांत आहे. त्यासाठी शेंकडों एकर जागा संस्थेने खरेदी केली असून सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय वास्तुशिल्पज्ञ प्रा. माधव आचवल यांनी त्या महाविद्यालयाचा आरा-खडा तयार करून दिला आहे. कागदावर उभा झालेला तो इमारतींचा समूह पाहूनच मन प्रसन्न होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. २१५
संग्र. शाखा



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33402 दि. 21-8-85
क्रमांक 31 नों: दि: 1